याशिवाय या समितीकडे जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या निधीतून १०% इतकी रक्कम समितीवर सोपविलेल्या कामासाठी उपलब्ध करून देण्यात येते. तसेच जिल्हा नियोजन व विकास मंडळ समितीसाठी स्वतंत्रपणे तरतूद उपलब्ध करून देण्यात येते. पन्नास लाख खर्चावरील योजना राबविण्यासाठी ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए-२०१२/प्र. क्र. ६८०/वित्त-९, दि.-३१ जानेवारी २०१३ नुसार समितीला आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांची तांत्रिक मंजुरी घेणे बंधनकारक आहे.

### २.३ हुंडा पद्धत नष्ट करण्यासाठी योजना (सर्व समावेशक महिला जिल्हा सल्लागार समिती)

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०११/प्र.क्र.२६/का-२ दिनांक २ नोव्हेंबर २०११ नुसार प्रत्येक जिल्ह्यामध्ये हुंडा पध्दतीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली **हुंडा निर्मुलन दक्षता समिती** गठीत करण्यात आली होती. परंतु जिल्हा स्तरावरील इतर समित्यांचे एकत्रिकरण करून महिला व बाल विकास विभागांतर्गत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि. २/११/२०११ अन्वये सर्व समावेशक महिला जिल्हा सल्लागार समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीकडे हुंडा पध्दती विरुध्द जाणीव जागृती करणे तसेच याबाबत जिल्ह्यामध्ये होत असलेल्या कामाचा आढावा घेण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्याचबरोबर सदरची समिती कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण, अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, महिला धोरण इत्यादीच्या अंमलबजावणीबाबतचा आढावा घेण्याची जबाबदारीही सोपविण्यात आली असून सदर समितीस दरवर्षी रूपये ४५,०००/- अनुदान देण्यात येते. या समितीकडून हुंडा पध्दती नष्ट करणे, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमांच्या कामकाजाचा आढावा घेणे, अनैतिक व्यापारात बळी पडलेल्या महिला व मुलींचे पुनर्वसन, महिलांचे सक्षमीकरण इ. क्षेत्रात प्रचार प्रसिध्दी व त्याअनुषंगाने शासनास शिफारशी करण्याचे कामकाज करण्यात येते.

शासन निर्णय दिनांक १४ डिसेंबर २०१४ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनिमांतर्गत नेमण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय संरक्षण अधिकाऱ्यांना हुंडा प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

तसेच राज्यस्तरावर आयुक्त, महिला व बाल विकास यांना, जिल्हा स्तरावर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना तर तालुका स्तरावर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना हुंडा प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

तक्ता क्रमांक ४

**हुंडा निर्मूलन २२३५-१३८-१**

| अनुक्रमांक (१) | जिल्ह्याचे नाव (२) | वर्ष (३) | खर्च (रु. हजारांत) (४) |
|---|---|---|---|
| १ | एकूण ३६ जिल्हे | २०२२-२०२३ | ४७० |
| | | २०२३-२०२४ | ३५१ |
| | | २०२४-२०२५ | ९० |

### २.४ महिला मंडळांना अनुदाने

महिला मंडळांनी केवळ महिलांकरिता मिळविलेल्या प्रशिक्षण केंद्रास अथवा सामुहिक स्वयंपाकगृह चालविण्यासाठी अनुदान देण्यात येते. सर्वसाधारणपणे ग्रामीण व शहरी भागातील आर्थिक दृष्ट्या गरीब स्त्रियांना मदत करण्याकरिता त्या स्त्रियांना व्यावसायिक शिक्षण आधारे अर्थार्जनाचे साधन उपलब्ध करून देऊन त्या स्वतःचा आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करू शकतील या उद्देशाने महिला मंडळे अथवा महिला स्वयंसेवी संस्थेस महिला प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासाठी रु. २८,५०० इतके अनावर्ती अनुदान देण्यात येते. ३० महिलांसाठीच्या एका सहा महिन्याच्या प्रशिक्षण सत्रास रु. २१,५००/- एवढे आवर्ती अनुदान वर्षातुन दोनदा देण्यात येते.

**तक्ता क्रमांक ५**

**महिला मंडळांना अनुदाने २२३५-२१३-४**

| वर्ष | एकूण महिला प्रशिक्षण केंद्रे | खर्च (रु. हजारांत) |
|---|---|---|
| २०२२-२०२३ | ०५ | ७८९ |
| २०२३-२०२४ | ०५ | ३३८ |
| २०२४-२०२५ | ०५ | ० |

## २.५ स्वयंरोजगार योजनेखाली व्यक्तिगत सहाय्य

आर्थिक दृष्ट्या कमकुवत गटातील कुटुंब प्रमुखाला नोकरी नसणे, किंवा असली तरी अपूरी मिळकत असणे, कुटुंबातील व्यक्तींची संख्या अधिक असणे या किंवा इतर कारणामुळे त्यांच्या संसारात आर्थिक समस्या निर्माण होते. अशा वेळी कुटुंब प्रमुख त्या समस्यांना तोंड देण्यास असमर्थ ठरतो किंबहुना त्यांच्या सहचारीने संसारास आर्थिक हातभार लावावा अशी अपेक्षा असते. अशा महिलांना स्वयंरोजगार मिळवता यावा म्हणून आर्थिक सहाय्य देण्यात येते. खाद्य पदार्थ तयार करून विकणे, मण्याच्या वस्तू करणे, भाजीपाला व फळे विकणे इ. व्यवसाय करण्यासाठी प्रत्येकी ५००/- रु. आर्थिक मदत देण्यात येते. सदरहू योजना शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र. एसडब्ल्यूआर १०८५-२०८९१-(८८)-सीए-३, दिनांक २१ ऑक्टोबर १९८५ अन्वये १ एप्रिल १९८५ पासून लागू करण्यात आली. हे अनुदान एका महिलेस एकदाच देण्यात येते. सदर अनुदान अदा करण्याचे अधिकार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. सदरची योजना सध्या जिल्हा नियोजन व विकास समिती (डी पी डी सी) यांच्यामार्फत राबविली जाते.

## २.६ बहुउद्देशीय महिला केंद्रे स्थापन करणे

महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शा.नि.क्र.एसडब्ल्युआय १०९४/प्र.क्र. ५२२/का-२, दि. ०३ ऑक्टोबर १९९४ नुसार शासनाने ही नवीन योजना कार्यान्वित केली आहे.

### योजनेचा उद्देश

महिलांचा विकास व उन्नतीकरिता जी चळवळ चालू आहे त्याची महिलांना माहिती उपलब्ध होण्याची व ती समजण्याची नितांत गरज आहे. मोकळ्या वातावरणात परस्परांशी विचारविनिमय करून विचारांची देवाणघेवाण करणे, महिलांना व्यावसायिक प्रशिक्षणासंदर्भात मार्गदर्शन व कायदेविषयक सल्ला देणे, आपदग्रस्त महिलांना आधार देण्याबाबत मदत करणे, वाचनालयासारख्या सुविधा पुरविणे इ. सेवा बहुउद्देशीय महिला केंद्रामार्फत पुरविण्यात येतात.

### कार्यक्षेत्र

प्रत्येक जिल्ह्यात १ याप्रमाणे एकूण ३५ केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. सन १९९४-९५ मध्ये प्रथम विभागीय स्तरावरील जिल्ह्यात प्रत्येकी १ याप्रमाणे ५ केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत.

### अनुदान

सदरहू केंद्रे स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येतात. त्यासाठी संस्थांना वार्षिक रुपये १,३७,६००/- आवर्ती व रु. २,७४,५००/- अनावर्ती अनुदान मंजूर करण्यात येते.

## २.७ देवदासी प्रतिबंध व पुनर्वसन योजना

### अ. - देवदासींना निर्वाह अनुदान :-

सदरची योजना शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१०/प्र. क्र. २१५ (भाग-२)/का-२ दिनांक १५ फेब्रुवारी २०११ अन्वये संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजनेमध्ये वर्ग करण्यात आली.

शासनातर्फे ४० वर्षावरील देवदासींना उदर निर्वाहाकरीता दरमहा रु. ६०० इतके निर्वाह अनुदान या योजने अंतर्गत देण्यात येते. परंतु सदरची योजना संजय गांधी निराधार अनुदान योजनेत व आता श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजनेमध्ये वर्ग दिनांक १५/२/२०११ च्या शासन निर्णयान्वये १/४/२०११ पासून वर्ग करण्यात आली आहे. ही वैयक्तीक लाभाची योजना असून देवदासींचे प्राबल्य असणाऱ्या ११ जिल्ह्यामध्ये (मुंबई, मुंबई उपनगर, सिंधुदूर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नांदेड, लातूर व उस्मानाबाद) जिल्हा स्तरावरून राबविण्यात येते.

**ब. - देवदासींच्या कल्याणाचे काम करणाऱ्या समाजसेवकास व संस्थेस दिवंगत लताताई सकट पुरस्कार :-**

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०११/प्र.क्र.२४२(भाग-१)/का-२, दि. १ मार्च २०१२ नुसार कार्यान्वीत पूर्वी शासन निर्णय क्रमांक डीआरएस-१०९३/प्र.क्र.३९६/का-२ दि. २९ ऑगस्ट १९९४ नुसार देवदासींची प्रथा नष्ट करण्यासाठी समाज प्रबोधनाचे कार्य करणाऱ्या संस्थेस प्रोत्साहनपर अनुदान वार्षीक रु. १०,०००/- अनुदान देय होते.

देवदासींची अनिष्ट प्रथा नष्ट करण्यासाठी समाज प्रबोधनाचे कार्य प्रभावीपणे करीत असलेल्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांना वर्षभराच्या कार्यक्रमांना व त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे म्हणून शासनातर्फे रु. १०,०००/- प्रोत्साहनपर अनुदान वर्षातून एकदा देण्यात येत होते. यामध्ये सुधारणा करून देवदासी कल्याणाचे काम करणाऱ्या दिवंगत लताताई सकट यांच्या नावाने राज्य स्तरावर व्यक्तीला रू. १,००,०००/- चा पुरस्कार तसेच दोन संस्थांना रू. ५०,००० चा पुरस्कार याप्रमाणे पुरस्कार योजना शासन निर्णय दि. १/३/२०१२ अन्वये करण्यात आलेली आहे.

**क. - देवदासींच्या मुला-मुलींकरीता वसतिगृह योजना :-**

देवदासींच्या मुला मुलींना योग्य शिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यातील कोल्हापूर व सांगली या दोन जिल्ह्यांत देवदासींच्या मुला-मुलींकरिता वसतिगृह ही योजना राबविण्यात येत होती. सद्यःस्थितीमध्ये सदर संस्थेमध्ये कोणत्याही देवदासींची मुले / मुली प्रवेशित दाखल नाहीत.

**२.८ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार**

महिला व बाल विकास क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या समाजसेविकांच्या व संस्थांच्या कामाची दाद घ्यावी व इतर समाजसेविकांना, संस्थांना त्यापासून प्रेरणा मिळावी जेणेकरून महिला व बालकांच्या उन्नतीसाठी समाजसेविका व संस्था सरसावून पुढे याव्यात यासाठी महिला व बाल विकास क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या राज्यातील समाजसेविकांना व संस्थांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार शासनाने शासन निर्णय; क्रमांक संकीर्ण १०९५/प्र. क्र. २७२/का-२, दि. १९ जून १९९६ अन्वये सन १९९६-९७ पासून पुरस्कार देण्यास मान्यता दिलेली आहे.

दरवर्षी प्रत्येक जिल्ह्यातील एका महिला समाजसेविकेस एक पुरस्कार असे ३५ जिल्हास्तर महिला समाजसेविका व राज्यातील ६ विभागातील प्रत्येक विभागातून, एक याप्रमाणे संस्थांना हा पुरस्कार देण्यात येतो. त्याचप्रमाणे एक राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतो.

**पुरस्काराचे स्वरूप :** महिला व समाजसेविकांकरिता

(अ) राज्यस्तरीय वैयक्तिक

(१) शासनाने दिलेले सन्मानपत्र

(२) रु. १,००,००१/- (रु. एक लाख एक फक्त) रोख रक्कम

(३) एक शाल व श्रीफळ

(ब) जिल्हास्तरीय वैयक्तिक

(१) शासनाने दिलेले सन्मानपत्र

(२) रु. १०,००१/- (रु. दहा हजार एक फक्त) रोख रक्कम

(३) एक शाल व श्रीफळ

(क) विभागीय स्तर (संस्थेसाठी)

(१) शासनाने मान्यता दिलेली सन्मानपत्र

(२) ज्यावर संस्थेचे नाव असेल असे स्मृतिचिन्ह

(३) रु. २५,००१/- (रु. पंचवीस हजार एक फक्त) रोख रक्कम

(४) एक शाल व श्रीफळ

## २.९ भूकंपग्रस्त भागातील बहुउद्देशिय महिला केंद्र २२३५-२५७३

सदरची योजना सन १९९३ मध्ये लातूर व उस्मानाबाद जिल्ह्याच्या परिसरामध्ये झालेल्या भूकंपानंतर भूकंपग्रस्त भागातील उध्वस्त कुटूंबातील महिला व बालके यांच्या सामाजिक व आर्थिक पुनर्वसन करण्याच्या हेतूने भूकंपग्रस्त भागातील बहुउद्देशिय महिला केंद्र स्थापन करण्यात आली. सदर केंद्रांच्या मुलभूत सुविधेचा सुयोग्य उपयोग होण्यासाठी सदरची बहुउद्देशिय केंद्र जिल्हा परिषदांकडे शासन निर्णय क्र. संकीर्ण १०९६/प्र.क्र.६९/का-२, दिनांक २५, एप्रिल २००८ अन्वये हस्तांतरीत करण्यात आली. सदर केंद्रांना दरवर्षी रु. ४६,४००/- आवर्ती अनुदान देय आहे.

## २.१० महिला समुपदेशन केंद्र

सदरची योजना सन १९९४ मध्ये सुरु झालेली आहे. महिलांवर होणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने प्रामुख्याने ज्या सुचना दिल्या होत्या त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यामध्ये महिलांवर होणाऱ्या अत्याचारासाठी कृती दलाची स्थापना (टास्क फोर्स) अप्पर मुख्य सचिव (गृह विभाग) यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आली आहे. टाटा इन्सिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेमार्फत बृहन्मुंबई पोलिस आयुक्त यांचे कार्यालय, दादर पोलीस स्टेशन व कांदिवली पोलिस स्टेशन यांचे आवारात १९९४ पासून तीन महिला समुपदेशन केंद्र चालविली जात होती. ती २००१ ला शासनाकडे चालविण्यासाठी आली व शासनाने आणखी ७ समुपदेशन केंद्रे चालविण्यास घेतली व अशी १० केंद्रे सुरु झाली. शासन निर्णय दिनांक संकीर्ण २००४/प्र.क्र.१९/का-२ दि. ५/१२/२००५ नुसार आणखी १० समुपदेशन केंद्रे सुरु करण्यात आली. शासन निर्णय संकीर्ण २००९/प्र.क्र.३०६/का-२ दिनांक ३० जून २०१० नुसार १९ समुपदेशन केंद्रे सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यात एकूण १४४ समुपदेशन केद्रांना मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी सद्य:स्थितीत १३५ समुपदेशन केंद्रे कार्यरत आहेत.

तक्ता क्रमांक ७

**महिला समुपदेशन केंद्र**

| वर्ष | खर्च | कार्यरत केंद्र |
|---|---|---|
| २०२२-२०२३ | ३७९८३ | १२६ |
| २०२३-२०२४ | ४१९८६ | १२६ |
| २०२४-२०२५ | ३६९२० | १३५ |

## २.११ शुभमंगल सामुहिक विवाह योजना

विदर्भातील अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत, याचे प्रमुख कारण शेतकऱ्यांनी त्यांच्या मुलींच्या विवाहाच्या वेळी जास्त दराने घेतलेले कर्ज फेडणे शक्य न झाल्याने आर्थिक विवंचनेला कंटाळून आत्महत्या केल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यास अनुसरून अमरावती विभागातील सर्व जिल्हे तसेच नागपूर विभागातील वर्धा जिल्ह्यातील शेतकरी मुलींच्या विवाहासाठी कर्जबाजारी होऊ नये, तसेच या सहा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाने शासन निर्णय, क्र. संकीर्ण-२००५/प्र. क्र. २४२/का-२, दिनांक १७ फेब्रुवारी २००६ अन्वये सामुहिक विवाह योजना कार्यान्वित केली आहे.

दिनांक ७ मे २००८ च्या शासन निर्णयान्वये सदरची योजना अधिक्रमित करण्यात आली असून, राज्यातील सर्व जिल्ह्यातील शेतकरी/शेतमजुरांच्या कुटुंबातील मुलींच्या सामुहिक विवाहाकरिता हिच योजना '' शुभमंगल सामुहिक विवाह योजना'' या नावाने लागू करण्यात आली आहे. यामध्ये लाभार्थ्यांना रु. १०,०००/- व विवाहसोहळा आयोजित करणाऱ्या संस्थेस प्रती जोडपे रु. १,०००/- च्या ऐवजी रु. २,०००/- असे एकूण प्रती जोडपे रु. १२,०००/- अनुदान देण्यात येत होते.

महिला व बालविकास विभागाचा शासन निर्णय क्र. मबावा २०२४/प्र.क्र.५८/का-२, दि. १४ मार्च २०२४ अन्वये, या योजनेअंतर्गत मुलींच्या विवाहासाठी आवश्यक असलेल्या वस्तूची खरेदी करण्यासाठी देण्यात येणाऱ्या प्रती जोडपे अनुदानात वाढ करून प्रती जोडपे रु.२५,०००/- इतके अनुदान देण्यास तसेच सामुहिक विवाह राबविणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस प्रती जोडपे रु. २,५००/- एवढे प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. सदर अनुदानाची रक्कम थेट लाभार्थी हस्तांतरण पध्दतीने संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत संबंधित लाभार्थ्यींच्या खाती जमा करण्यात यावी, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाह योजना, सुधारित स्वरूपात जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत राबविण्याबाबत**

शुभमंगल सामुहिक विवाह योजनेबाबत नियोजन व वित्त विभागाने दिलेल्या निर्देशानुसार जिल्ह्याच्या स्तरावर योजना राबविण्याच्या दृष्टिने करावयाच्या उपाययोजना इत्यादींच्या अनुषंगाने घेतलेल्या आढाव्याच्या वेळी योजनेच्या गुणवत्तेबाबत काही सुधारणा करून सुधारित शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाहयोजना, संपूर्णपणे जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC) मार्फत राबविणेबाबतचा शासन निर्णय, दि. ३० सप्टेंबर २०११ रोजी विभागाने निर्गमित केलेला आहे. यात सदरची योजना राबविण्याकरिता दि. ७ मे २००८ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

१. सुधारित शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाह योजना, संपूर्णपणे जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC) मार्फत राबविण्यात यावी.

२. सुधारित शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाह योजने अंतर्गत, सरळ विवाह नोंदणी कार्यालयात जाऊन नोंदणीकृत विवाह करतील, त्यांनाही रु.२५,०००/- इतकी योजनेचे अनुदान देण्यात यावे. याकरिता स्वंयंसेवी संस्थेस प्रोत्साहनपर अनुदान मिळणार नाही.

**योजनेचे निकष :**

१. वधू महाराष्ट्रातील संबंधीत जिल्ह्याची स्थानिक अधिवासी असावी.

२. योजनेच्या अनुदानास पात्र ठरण्यासाठी वार्षिक कमाल उत्पन्न मर्यादा रुपये १,००,०००/- इतकी राहील.

३. योजना, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० किंवा सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था किंवा महाराष्ट्र सहकारी संस्थेचे अधिनियम, १९६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था यांचेमार्फत राबविण्यात यावी.

४. एका सोहळ्यात किमान ५ व कमाल १०० जोडप्यांचा समावेश करण्यात यावा.

५. एका स्वयंसेवी संस्थेस वर्षात दोनदाच सामुहिक विवाह सोहळ्याकरिता अनुदान देय राहील, त्यापेक्षा अधिकच्या सोहळ्याकरिता अनुदान देय राहणार नाही.

६. स्वयंसेवी संस्थेने विवाह सोहळ्यापूर्वी, किमान एक महिना अगोदर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

७. योजनेचे लाभार्थ्यांचे अनुदान संस्थेमार्फत अदा न करता, परस्पर लाभार्थ्यांचे बँक खात्यात जमा करण्यात यावे.

८. विवाह सोहळ्याचे व्हिडीओ शुटींग व विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच स्वयंसेवी संस्थेस प्रोत्साहनपर अनुदान अदा करावे.

९. योजने अंतर्गत मिळणारे रु. १०,०००/- एवढे अनुदान वधुच्या आईच्या नावाने, आई हयात नसल्यास, वडिलांच्या नावाने व आई-वडील दोघेही हयात नसल्यास, वधुच्या नावाने देण्यात येईल.

१०. या योजने अंतर्गत अनुदान मिळण्यासाठी अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील दांपत्ये पात्र राहणार नाहीत. कारण त्यांच्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच आदिवासी विभागामार्फत स्वतंत्र योजना राबविण्यात येत आहे.

**२.१२ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ ची अंमलबजावणी**

सदरचा कायदा केंद्र शासनाचा असून सदर कायद्याची अंमलबजावणी राज्यात २६/१०/२००६ पासून सुरू आहे. राज्य शासनाने पूर्णवेळ संरक्षण अधिकाऱ्याच्या सेवा जिल्हास्तरावर उपलब्ध करून देण्यासाठी नवीन ३७ संरक्षण अधिकाऱ्यांची, ३७ विधी सल्लागारांची व ३७ डाटा एन्ट्री ऑपरेटरची पदे निर्माण केली असून तालुका स्तरावर २१६ आणि १४२ याप्रमाणे कनिष्ठ संरक्षण अधिकाऱ्यांची पदे निर्माण करून पद भरली आहेत. तसेच तालुका स्तरावर सहाय्यक व बहुउद्देशिय कर्मचारी या पदाची कामे (३५८ सहाय्यकाची व ३५८ बहुउद्देशिय कर्मचाऱ्याची पदे) बाह्य यंत्रणेद्वारे भरून घेण्यासाठी उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि. ११ जून २०१४ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे आऊट सोर्सींगद्वारा कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

या कायद्यांतर्गत राज्यातील सर्व राज्यगृहे, आधारगृहे, स्वाधारगृहे व अल्प मुदती निवासगृहे आश्रीत घर म्हणून घोषीत केले आहेत. टाटा सामाजिक विज्ञान संस्था यांच्या समन्वयाने राज्यात कार्यरत असलेली व नविन मान्यता प्राप्त अशी एकूण २० महिला समुपदेशन केंद्रे आणि शासन निर्णय दिनांक ३०/०६/२०१० अन्वये मान्यता दिलेल्या १९ समुपदेशन केंद्रांना सेवा पुरविणारे म्हणून घोषित करण्यात आले. तसेच महाराष्ट्र राज्य समाज कल्याण बोर्ड, मुंबई यांची जी ६२ कौटुंबिक समुपदेशन केंद्रे आहेत त्यांना सेवा पुरविणारे म्हणून घोषित करण्यात आले आहे.

**जनजागृती, प्रसिद्धी, प्रशिक्षण आणि मूल्यमापन :**

महिला व बाल विकासाच्या योजनांची व कायद्यांची प्रसिद्धी व प्रचार करणेसाठी, करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना, जसे, बसेस वरील जाहिराती, मोबाईल व्हॅनसद्वारे प्रचार, रेडिओ जिंगल्स् इ. साठी खर्च करण्यात येतो. तसेच कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी, विविध प्रशिक्षण व कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते.

**२.१३ केंद्रशासनाच्या निर्देशाप्रमाणे राज्यात महिला हेल्प लाईन ''१८१'' या टोल फ्री क्रमांकाची** Women Helpline **सुरू करण्याबाबत.**

संकटात सापडलेल्या महिलांसाठी, तसेच कौटुंबिक हिंसाचारासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारींसाठी, महिला व बाल विकास विभागामार्फत, राज्यात ''१८१'' या टोल फ्री क्रमांकाची Women Helpline सुरू करण्याबाबत दि. १२ जानेवारी २०२३ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी दिलेली असून, सदरचा टोल फ्री क्रमांक कार्यान्वित आहे.

# '१८१' टोल फ्री क्रमांक (महिलांसाठी कॉल सेंटर)



## २.१४ मनोधैर्य योजना

महाराष्ट्र शासनाने बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार तसेच ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या पिडितांच्या पुनर्वसनासाठी राज्यात दिनांक ०२/१०/२०१३ पासून ''मनोधैर्य योजना'' योजना सुरु केली आहे दिनांक ०१/८/२०१७ व दिनांक ३०/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये सन २०१३ च्या मनोधैर्य योजनेत सुधारणा करुन राज्यात ''नवीन सुधारित मनोधैर्य योजना'' अंमलात आणण्यात आली आहे. सुधारीत मनोधैर्य योजनेतील ॲसीड हल्ल्यामध्ये बळी पडलेल्या/जखमी झालेल्या पिडिताप्रमाणे ज्वालाग्रही/ज्वलनशील पदार्थामुळे (पेट्रोल, डिझेल, रॉकेल स्वयंपाकाचा गॅस इत्यादी) झालेल्या हल्ल्यातील पिडितांचा देखील सुधारीत मनोधैर्य योजनेत समावेश करण्यात आला आहे.

### योजनेचा उद्देश

बलात्कार / बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला करणाऱ्या गुन्हेगारांना गंभीर शिक्षा देणे आवश्यक असताना या पिडीत महिला व बालकांना प्रतिष्ठा व आत्मविश्वास पूर्ण स्थिती परत मिळवून देणे हे तितकेच आवश्यक आहे. बलात्कार बालकांवरील लैंगिक अत्याचार/ॲसीड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला/बालके व त्यांच्या वारसदारांना आर्थिक मदत व मानसोपचार तज्ज्ञांची सेवा देणे, अशा महिला व बालकांना शारीरिक आणि मानसिक आघातातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न, वित्तिय सहाय, समुपदेशन, निवारा, वैद्यकीय सेवा व कायदेशिर मदत देणे. अशा हल्ल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांना प्रतिष्ठा आणि आत्मविश्वास परत मिळवून देणे.

शासन निर्णय क्र. मबवि-२०२०/प्र.क्र.१६५/का-२ दिनांक ०१-०१-२०२४ अन्वये नवीन सुधारीत मनोधैर्य योजना कार्यान्वीत करण्यात येत आहे.

**मनोधैर्य योजनेच्या नवीन निकषानुसार मंजूर करावयाच्या सुधारित अर्थसहाय्याचा तपशील**

| अ. क्र. | घटनेचे विवरण | अर्थसहाय्य | शेरा |
|---|---|---|---|
| १. | **बलात्कार :-** | | |
| | अ) घटनेचा परिणाम स्वरुप मानसिक धक्का बसून महिलेस कायमचे मतिमंदत्व/शारीरिक अपंगत्व आले असेल, तर | रु. १०,००,०००/- पर्यंत | मंजूर अर्थसहाय्यापैकी ७५% रक्कम १०वर्षासाठी पीडिताच्या नावे बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येईल. तर २५% रक्कमेचा धनादेश पीडितास तात्काळ अदा करण्यात येईल. (यामध्ये वैद्यकीय खर्चासाठी रू. ३० हजार इतक्या रकमेचा समावेश आहे.) |
| | आ) सामुहिक बलात्कार व अशा प्रकरणी महिलेस गंभीर व तीव्र स्वरुपाची शारीरिक इजा झाली असेल तर | रु. १०,००,०००/- पर्यंत | वरील प्रमाणे |
| | इ) बलात्काराच्या घटनेमुळे महिलेचा मृत्यू झाल्यास, | रु. १०,००,०००/- पर्यंत | वरील प्रमाणे |
| | ई) बलात्काराच्या गुन्ह्यातील वरील ''अ'' ''आ'' व ''इ'' मधील प्रकरणे वगळून इतर घटनांमधील पिडीत महिला असेल तर | रु. ३,००,०००/- पर्यंत | वरील प्रमाणे |
| २. | POCSO **अंतर्गत बालकावरील लैंगिक अत्याचार :-** | | |
| | अ) घटनेमध्ये पीडित बालकास लिंगभेद न करता कायमस्वरूपी मतिमंदत्व किंवा अपंगत्व आल्यास | रु. १०,००,०००/- पर्यंत. | मंजूर अर्थसहाय्यापैकी ७५% रक्कम १० वर्षासाठी पीडिताच्या नावे बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येईल. तर २५% रक्कमेचा धनादेश पीडितास तात्काळ अदा करण्यात येईल. (यामध्ये वैद्यकीय खर्चासाठी रू. ३० हजार इतक्या रकमेचा समावेश आहे.) |

| अ. क्र. | घटनेचे विवरण | अर्थसहाय्य | शेरा |
|---|---|---|---|
| | आ) घटनेमुळे बालकाचा मृत्यु झाल्यास | रु. १०,००,०००/- पर्यंत | वरील प्रमाणे |
| | इ) बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील ''अ'' येथील नमूद प्रकरणे वगळून इतर घटनांमधील पिडीत बालक असेल तर, | रु. ३,००,०००/- पर्यंत | वरील प्रमाणे |
| ३. | **ॲसिड हल्ला :-** | | |
| | अ) घटनेमध्ये पीडित महिला/बालकाचा चेहरा विद्रुप झाल्यास, शारीरिक कोणत्याही भागाची हानी झाल्यास, कायमचे अपंगत्व आल्यास | रु. १०,००,०००/- पर्यंत | मंजूर अर्थसहाय्यापैकी ७५% रक्कम १०वर्षासाठी पीडिताच्या नावे बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येईल. तर २५% रक्कमेचा धनादेश पीडितास तात्काळ अदा करण्यात येईल. (यामध्ये वैद्यकीय खर्चासाठी रू. ३० हजार इतक्या रकमेचा समावेश आहे.) |
| | आ) घटनेमुळे महिला/बालकाचा मृत्यू झाल्यास | रु. १०,००,०००/- पर्यंत | वरील प्रमाणे |
| | इ) ॲसिड हल्ल्याच्या ''अ'' व ''आ'' येथील नमूद प्रकरणे वगळून इतर घटनांमधील पिडीत महिला/बालक असेल तर, | रु. ३,००,०००/- पर्यंत | वरील प्रमाणे |
| ४. | **ज्वालाग्रही /ज्वलनशील (पेट्रोल, डिझेल, रॉकेल, स्वयंपकाचा गॅस) पदार्थाद्वारे हल्ला :-** | | |
| | अ) घटनेमध्ये पीडित महिला/बालकाचा चेहरा विद्रुप झाल्यास, शारीरिक कोणत्याही भागाची हानी झाल्यास, कायमचे अपंगत्व आल्यास | रु. १०,००,०००/- पर्यंत. | मंजूर अर्थसहाय्यापैकी ७५% रक्कम १० वर्षासाठी पीडिताच्या नावे बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येईल. तर २५% रक्कमेचा धनादेश पीडितास तात्काळ अदा करण्यात येईल. (यामध्ये वैद्यकीय खर्चासाठी रू. ३० हजार इतक्या रकमेचा समावेश आहे.) |
| | आ) घटनेमुळे महिला/बालकाचा मृत्यू झाल्यास | रु. १०,००,०००/- पर्यंत | वरील प्रमाणे |
| | इ) ज्वालाग्रही /ज्वलनशील (पेट्रोल, डिझेल, रॉकेल, स्वयंपकाचा गॅस) पदार्थाद्वारे हल्ल्याच्या गुन्ह्यातील ''अ'' व ''आ'' येथील नमूद प्रकरणे वगळून इतर घटनांमधील पिडीत महिला/बालक असेल तर, | रु. ३,००,०००/- पर्यंत | वरील प्रमाणे |

**मनोधैर्य योजनेची प्राप्त तरतूद व खर्च (रुपये हजारात)**

**तक्ता क्र. ९**

| अ. क्र. | वर्ष | प्राप्त तरतूद | खर्च |
|---|---|---|---|
| १. | २०२१-२०२२ | ५०,००० | निरंक |
| २. | २०२२-२०२३ | १,५०,००० | १,५०,००० |
| ३. | २०२३-२०२४ | ४८,००,०० | ४८,००,०० |
| ४. | २०२४-२०२५ | ५४,७४,२२ | ५४,७४,२२ |

## २.१५
## अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६

**अनैतिक व्यापार म्हणजे :**

महिला व मुलींची अनैतिक व्यवसायाकरिता वाहतूक करणे आणि व्यवसायाच्या प्रयोजनासाठी लैंगिक छळ करणे, अशी अनैतिक व्यापाराची व्याख्या करण्यात येते. हा व्यापार महिलांपुरता मर्यादित नसून व्यापारी प्रयोजनासाठी लैंगिक छळास बळी पडलेल्या पुरुष, मुले व मुली यांचाही यामध्ये समावेश आहे. व्यक्तींची वेश्या व्यवसायात होत असलेली पिळवणूक यास प्रतिबंध करण्यासाठी दिनांक ९ मे १९५० रोजी झालेल्या आंतरराष्ट्रीय करारानुसार अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ अस्तित्वात आला. या कायद्याची अंमलबजावणी करताना येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी १९८६ मध्ये कायद्यांत सुधारणादेखील करण्यात आल्या आहेत.

**कायद्याचा उद्देश :**

(१) महिला व बालकांचे लैंगिक शोषणास प्रतिबंध करणे.

(२) बाजारू लैंगिक शोषणाच्या विळख्यात अडकलेल्या महिला व मुलींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी पुनर्वसनाचे पर्याय उपलब्ध करून देणे.

(३) अनैतिक मानवी व्यापार व त्या अनुषंगाने गुन्हा करणाऱ्या दलाल, मध्यस्त यांच्यावर कठोर कायदेशीर उपाययोजना करणे आणि बळीत पीडित व्यक्तींना न्याय देणे.

(४) कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढविणे.

**कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी**

| कलम | गुन्हा | दंड | शिक्षा | वर्गीकरण |
|---|---|---|---|---|
| ३ (१) | कुंटणखाना चालविणे किंव चालविण्यास परवानगी देणे, व्यवस्था पाहणे इत्यादी. | २,००० | १ वर्षांपेक्षा कमी नसेल, जास्तीत जास्त ५ वर्षे | अजामीनपात्र |
| ४ | वेश्याव्यवसायाच्या कमाईवर उपजिविका करणे. | १,००० | (अ) अज्ञान व्यक्तीच्या वेश्याव्यवसायाशी संबंधित असेल तर कमीत कमी ७ वर्षे, जास्तीत जास्त १० वर्षे<br>(ब) सज्ञान व्यक्तीच्या वेश्याव्यवसायाशी संबंधित असेल तर जास्तीत जास्त २ वर्षे | अजामीनपात्र (अज्ञान व्यक्तीच्या बाबत) |
| ५ | वेश्याव्यवसाय करण्यासाठी प्रवृत्त करणे, किंवा करावयास लावणे | २,००० | कमीत कमी ३ वर्षे, जास्तीत जास्त आजीवन कारावास | अजामीनपात्र |
| ६ | वेश्याव्यवसाय ज्या जागेत चालतो तिथे व्यक्तीला अडकवून ठेवणे | --- | कमीत कमी ७ वर्षे, जास्तीत जास्त आजीवन कारावास | अजामीनपात्र |
| ७ | सार्वजनिक ठिकाणी किंवा जवळपास चालणारा वेश्याव्यवसाय | --- | कमीत कमी १ दिवस, जास्तीत जास्त ३ महिने | जामीनपात्र |
| | सार्वजनिक ठिकाणी वेश्याव्यवसाय करताना जर अज्ञान व्यक्ती आढळली तर | ५०० | कमीत कमी ७ वर्षे, जास्तीत जास्त आजीवन कारावास | अजामीनपात्र |
| ८ | वेश्याव्यवसाय प्रयोजनार्थ फितवणे/ मोह घालणे | ५०० | जास्तीत जास्त १ वर्ष | जामीनपात्र |
| ९ | अभिरक्षेतील व्यक्तीला/फितवणे | --- | कमीत कमी ७ वर्षे, जास्तीत जास्त १० वर्षे | अजामीनपात्र |

कलम-१ अन्वये सुटका झालेल्या व्यक्तीची अभिरक्षा करण्याची तरतूद आहे.

**शासनाने अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६, प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी**

(१) फेब्रुवारी २००५ मध्ये अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी राज्यस्तरीय सल्लागार समिती आणि सप्टेंबर २००६ मध्ये जिल्हा-स्तरीय सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समिती सन २०१७ मध्ये पुनर्गठीत करण्यात आली.

(२) ऑक्टोबर २००७ मध्ये अनैतिक व्यवसायातून पिडीत व्यक्तीची सुटका, न्याय प्रक्रिया व पुनर्वसन करताना पाळावयाच्या शिष्टाचाराबाबत नियमावली तयार करण्यात आली आहे.

(३) मानवी वाहतूक रोखण्यासाठी फेब्रुवारी २००८ मध्ये राज्य कृती आराखडा मंजूर करण्यात येवून तो २०१४ मध्ये पुनर्गठीत करण्यात आला.

(४) महाराष्ट्र मॉड्युल बांग्लादेशाच्या मुलीच्या प्रत्यार्पणासाठी कार्यप्रणाली/राज्यस्तरीय कृती दलाची स्थापना मार्च २००९ मध्ये करण्यात आली आहे.

(५) वेश्या व्यवसायात गुंतलेल्या महिलांसाठी जुलै २०११ मध्ये व्यावसायिक प्रशिक्षणाची विशेष योजना कार्यान्वित करण्यात आली.

(६) महिला व बालकाच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्याकरिता केंद्र शासनाच्या मदतीने १२ प्रमुख जिल्ह्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (Anti Trafficking Cell) स्थापन करण्यात आले आहेत.

(७) मानवी वाहतूक रोखण्यासाठी कृति दलाची स्थापना २००९ मध्ये केली व त्याची कार्यकक्षा २०१३ मध्ये वाढविण्यात आली. अनैतिक व्यवसायातून सुटका करण्यात आलेल्या महिलासाठी संरक्षण गृह आणि मुलींसाठी विशेष पुनर्वसन केंद्र/बालगृह स्थापन करण्यात आले आहेत या संस्थांमधील प्रवेशितांची सद्यःस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

(८) अनैतिक व्यापारातुन सुटका केलेल्या पश्चिम बंगाल येथील प्रवेशितांना स्वगृही रवानगी करणे व केसेसचा पाठपुरावा करण्यासाठी तसेच गृह चौकशी करिता पश्चिम बंगाल व महाराष्ट्र शासन यांच्यात सन २०१४ मध्ये सामंज्यस करार करण्यात आला आहे.

(९) ४३ महिला राजगृह आणि संरक्षण गृहात येणाऱ्या सर्व प्रवेशितांची माहिती सध्या लिखित स्वरुपात घेतली जात आहे. ही माहिती एखाद्या प्रणाली मध्ये डिजीटल स्वरुपात घेण्यात आली तर शासनाच्या विविध माहिती विश्लेषण स्वरुपात मिळू शकते. त्यासाठी प्रवेशितेचे बोटांचे ठसे, तिचा फोटो सुध्दा घेतला जात आहे. जेणेकरुन कुठल्याही गृहात पुन्हा प्रवेशित झाल्यास लक्षात येईल व सन २०१९ पासून एकूण ६९०० सर्व प्रकारच्या पिडीत प्रवेशितांची माहिती संबंधित प्रणालीवर भरण्यात आलेली आहे.

तक्ता क्रमांक १०

| अ. क्र. | संरक्षणगृहाचे नांव | मंजूर संख्या | दाखल प्रवेशित | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | २०२२-२०२३ | २०२३-२०२४ | २०२४-२०२५ |
| १. | नवजीवन महिला वसतिगृह, चेंबूर | १०० | ५३२ | ४१० | २६५ |
| २. | करुणा महिला वसतिगृह, नागपूर | १०० | १९६ | २४० | ८७ |
| ३. | माझे घर महिला वसतिगृह, पुणे | १०० | ७३ | २६ | ७८ |
| ४. | रेस्क्यु फौंडेशन, पुणे | ५० | ५० | ७५ | १०० |
| ५. | शांतीसदन महिला वसतिगृह, ठाणे | १०० | २३ | ३० | १५२ |
| ६. | आशाकिरण महिला वसतिगृह, सातारा | १०० | ०५ | ०१ | २७ |
| | एकूण | ५५० | ८७९ | ७८२ | ७०९ |

**२.१६ नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह.** [Working Women Hostel] : **सखी निवास**

सदरची योजना ही केंद्रशासनाची असून नोकरी करणाऱ्या, एकट्या, अविवाहित, विधवा, घटस्फोटीत, विभक्त, पतीबाहेरगावी असलेल्या स्त्रियांची संरक्षणाच्या दृष्टीने रहाण्याच्या जागेची सोय करण्यासाठी सदर योजना राबविली जाते. सदर योजनेच्या अटी व शर्ती मध्ये केंद्र शासनाने २७ नोव्हेंबर, २०१७ पासून सुधारणा केलेली आहे. नोकरी करणाऱ्या, एकट्या, विवाहीत किंवा घटस्फोटीत, विधवा यांच्यासाठी तिचे मासिक उत्पन्न महानगरासाठी रुपये ५०,०००/- आणि इतर शहरांसाठी रुपये ३५,०००/- जास्त नसेल अशा महिलांना प्रवेश देण्यात येतो. यामध्ये ज्या महिलांना मुले आहेत त्यांची १८ वर्षापर्यंतची मुलगी व १२ वर्षापर्यंतच्या मुलास सोबत ठेवता येते.

या वसतीगृहात राहणाऱ्या महिलेकडून १ बेडच्या रुमसाठी तिच्या ग्रॉस सॅलरीच्या १५ टक्के, दोन बेडच्या रुमसाठी १० टक्के इतके भाडे तसेच डॉरमेटरीसाठी ७.५ टक्के ईतकी रक्कमेपेक्षा जास्त रक्कम आकारता येत नाही. सद्यस्थितीत ७१ नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतीगृह कार्यरत असुन शासन निर्णय दिनांक १२ मे, २०२३ अन्वये राज्यात नविन ५० नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतीगृहांना मान्यता मिळाली आहे. सदर योजना केंद्र शासनाची असल्या कारणाने या योजनेचे प्रस्ताव जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यामार्फत आयुक्तालयास प्राप्त होतात व आयुक्तालयामार्फत राज्य शासनास सादर होऊन राज्य छाननी समितीने मंजूर केलेले प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजूरी करिता पाठविले जातात.

केंद्र शासनाच्या दिनांक १४ जुलै, २०२२ च्या पत्रान्वये ''मिशन शक्ती'' या उपयोजनेंतर्गत ''संबल'' व ''सामर्थ्य'' या दोन उप योजना असून ''सामर्थ्य'' या उपयोजनेंतर्गत ''नोकरी'' करणाऱ्या महिलांचे वसतीगृह या योजनेचे नाव ''सखी निवास'' असे करण्यात आले आहे. सदर योजनेंतर्गत केंद्र : राज्य यांचे ६० : ४० याप्रमाणे अनुदान ठरवून देण्यात आले आहे. याप्रमाणे सखी निवास या योजनेस भाडे या घटकासाठी रुपये ४,५०,०००/- प्रतिवर्ष, Management Cost रुपये १०,०८,०००/- प्रतिवर्ष, आणि ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या सखी निवास साठी Crest Establishment रुपये ९०,६००/- याप्रमाणे ६०:४० या प्रमाणात आर्थिक अनुदान देण्यात येणार आहे. सन २०२४-२५ मध्ये ११ आणि सन २०२५-२६ मध्ये १४ स्वंयसेवी संस्थांना सखीनिवास योजना नव्याने कार्यान्वित करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

**२.१७ शक्तीसदन (स्वाधार उज्वला) :-**

राज्यातील वंचित, संकट ग्रस्त महिलांसाठी केंद्रपुरस्कृत उज्वला व स्वाधार या योजनेंची अमलबजावणी सन २०१६ पासून करण्यात येत आहे. शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२०८/का-२ दिनांक २३.०३.२०१८ अन्वये केंद्र पुरस्कृत स्वाधार योजनअंतर्गत राज्यातील निराधार, निराश्रीत, नैसिर्गिक आपत्तीत/ कौटुंबिक हिंसाचारामध्ये बेघर झालेल्या महिला व त्यांच्या बालकांना अन्न,वस्त्र,निवारा व वैद्यकीय मदत, कायदेविषयक समुपदेशन तसेच हेल्पलाईन द्वारे मार्गदर्शन उपलब्ध करुन दिले जाते. तसेच शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. युजेजे-२०१४/प्र.क्र.१८८/का-०३ दिनांक २४.०३.२०१८ अन्वये अनैतिक व्यापरास प्रतिबंध करणेसाठी उज्वला योजना राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत लैंगिक शोषनाला बळी पडलेल्या, वेश्या व्यवसायातून पोलिसांनी सुटका केलेल्या महिला व मुलींचे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून संगोपन, शिक्षण व प्रशिक्षण देवून पुनर्वसन केले जाते.

महिलांची सुरक्षितता व सक्षमीकरणासाठी केंद्रशासनाकडून मिशन शक्ती हा एकात्मिक महिला सबलीकरण कार्यक्रम १५ व्या वित्त आयोगाच्या सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीमध्ये सुरु करणेत आला आहे. केंद्र शासनाच्या दिनांक १४.०७.२०२२ च्या पत्रान्वये, दिनांक १ एप्रिल,२०२२ पासून राज्यामध्ये मिशन शक्ती या योजनअंतर्गत संबल व सामर्थ्य या दोन उपयोजना राबविण्यात येत आहेत. यापैकी सामर्थ्य उपयोजनेअंतर्गत महिलाच्या सक्षमीकरणावर भर देण्यात आलेला आहे. याउपयोजनेअंतर्गत पूर्वीच्या स्वाधार व उज्वला दोन केंद्र पुरस्कृत योजना प्रशासकीय कारणासाठी एकत्रित करुन शक्ती सदन ही योजना महिलांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येत आहे. राज्य शासनाच्या शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. केपूयो-२०२२/प्र.क्र.१२५/का-०३ दिनांक २९.०३.२०२३ अन्वये आर्थिक वर्षे २०२२-२३ पासून राज्यामध्ये शक्ती सदन योजना राबविण्यास तसेच या योजनेकरीता केंद्र व राज्य शासनाकडून ६०:४० प्रमाणात खर्च करण्यात मान्यता देणेत आली आहे. शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग दि.१३.०३.२०२५ अन्वये २१ शक्तीसदन संस्थांना मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

**२.१८ वन स्टॉप सेंटर, महाराष्ट्र :-**

- महिलांवर होणारे शारीरिक व मानसिक अत्याचार, आर्थिक छळवणूक, समाजाकडून होणारा त्रास, अवहेलना, अशा संकटांसाठी त्या महिलेस व तिच्या कुटुंबियास न्याय मिळण्यासाठी तथा वैद्यकीय उपचारांसाठी शासनाच्या विविध विभांगामध्ये जावे लागत असल्याने अशा संकटग्रस्त महिलांसाठी आवश्यक उपचार व मदत एकाच छताखाली मिळण्यासाठी केंद्र शासनाने ''Sakhi'' One Stop Centre ही योजना सुरु केली असून सद्यस्थितीत राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये एकूण ६७ केंद्रे कार्यरत आहेत.
- या योजनेसाठी केंद्र शासनाचे १००% अनुदान असुन, त्यात नविन ईमारतीचे बांधकाम अनुदान रु.६०.०० लाख, आवर्ती अनुदान रु.२८.२० लाख, तसेच अनावर्ती खर्चासाठी प्रती वर्ष रु.४.८९ लाख इतके वार्षिक अनुदानाची तरतूद आहे. सदरचे अनुदान केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयामार्फत PFMS कार्यप्रणालीव्दारे राज्याच्या SNA बँक खात्यात येते व तद्नंतर आवश्यकतेनुसार जिल्ह्यांना PFMS व्दारे वितरीत करण्यात येते.
- माहे जानेवारी २०२५ ते ऑक्टोबर २०२५ अखेर पर्यंत राज्यात कार्यरत असलेल्या एकूण ५५ केंद्रांमध्ये कौटुंबीक हिंसाचार, बलात्कार, लैंगिकछळ, ॲसीड ॲटॅक, अमानवीय वाहतुक, अपहरण, सायबर गुन्हे, बाल विवाह, हुंडाबळी व इतर अशा प्रकरणांची नोंद करण्यात आली असून सदरच्या प्रकरणांमध्ये ८०२५ महिलांना कायदेविषयक सल्ला, समुपदेशन, वैद्यकिय सहाय्य, पोलीस सहाय्य, तात्पुरता निवारा, मनोसामाजिक सहाय्य/समुपदेशन, इतर योजनेचा लाभ देण्यासाठी अशा विविध सेवांचा लाभ देण्यात आला.
- राज्यात कार्यरत असलेल्या वन स्टॉप सेंटरचे कामकाज अधिक प्रभाविपणे होण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, वन स्टॉप सेंटरचे केंद्र प्रशासक यांची वेळोवेळी बैठक आयोजित करुन त्यांना आयुक्तालय

स्तरावरुन आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येत आहे. जिल्ह्यांकडून प्राप्त झालेली माहितीची पडताळणी करुन त्यात आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्यासंभर्त आयुक्तालय स्तरावरुन संबंधीत जिल्हाधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, वन स्टॉप सेंटरचे केंद्र प्रशासक यांना वेळोवेळी पत्र/परिपत्रके देऊन सदरची योजना अधिक प्रभावीपणे कार्यान्वीत करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

* नाशिक, अहिल्यानगर, पुणे-१, सातारा, अमरावती, नागपूर, यवतमाळ, ठाणे, अकोला, जळगाव, नांदेड, वर्धा, चंद्रपूर जिल्ह्यासाठीची नविन इमारतींचे बांधकाम पूर्ण होऊन त्या ठिकाणी वन स्टॉप सेंटर सुरु आहेत.
* २५ जिल्ह्यातील वन स्टॉप सेंटरच्या इमारतीच्या बांधकामाबाबतची प्रक्रीया सुरु आहे व ११ केंद्राचे बांधकाम अद्याप सुरु झालेले नाही.
* सद्यस्थितीत सदरचे केंद्र हे जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या तयार इमारतीमध्ये कार्यरत आहेत.
* त्यापैकी १७ केंद्र हे जिल्ह्याचे शासकिय रुग्णालय परिसरातील उपलब्ध इमारतींमध्ये कार्यरत आहेत.

**२.१९ महिला सक्षमीकरण केंद्र –**

**योजनेचे उद्देश :**

केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या मिशन शक्ती या एकछत्रीत योजनेतील एक महत्वाची घटक योजना असुन यासाठी केंद्र व राज्याचा ६०:४० प्रमाणात अनुदानाचा हिस्सा आहे. केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्य व जिल्हास्तरीय महिला सक्षमीकरण केंद्रांमार्फत राज्यातील सर्व जिल्ह्यातील गरजू महिलांची नोंदणी करुन या महिलांची समस्या, आवश्यकता, क्षमता इ. बाबी विचारात घेऊन त्यांना आवश्यकते सहाय्य मिळवून देण्याचे कार्य या केंद्रांमार्फत केले जाते. केंद्र व राज्य शासनाचे सर्व विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था इ. यंत्रणेमार्फत महिलांची सुरक्षा, संरक्षण व सक्षमीकरणासाठी राबविण्यात येत असलेल्या सर्व योजनांचे अभिसरण होऊन या योजनांचा लाभ गरजु महिलांपर्यंत पोहोचविण्याचे महत्वाचे कार्य या केंद्रांमार्फत करण्यात येत आहे. महिला सक्षमीकरण केंद्र हे मिशन शक्ती या एकछत्रीत योजने अंतर्गत असलेल्या सर्व योजनांचे राज्य व जिल्हास्तरावरील प्रकल्प संनियंत्रण कक्ष (PMU- Project) Monitoring Unit म्हणून देखील कार्यरत आहे. केंद्र/राज्य/ जिल्हास्तरावरील महिलांसाठी असलेल्या योजना व कार्यक्रमाचे अभिसरण करुन महिलांची संपूर्ण क्षमता जागृत होण्यासाठी वातावरण निर्माण करणे, देशातील जिल्हा/तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील महिलांना आरोग्य सेवा, उच्च प्रतीचे शिक्षण, व्यवसाय उभारणी, व्यवसायिक समुपदेशन, वित्तीय नियोजन, उद्योजकता, बॅकवर्ड व फॉरवर्ड दुवा, कामगार वर्गाचे आरोग्य व सुरक्षितता, सामाजिक सुरक्षितता आणि डिजिटल साक्षरता क्षेत्रात विविध संस्थांत्मक स्तरावर नियोजनबध्दरित्या सक्षम करण्यासाठी तसेच विकास करण्यासाठी महिला सक्षमीकरण केंद्राव्दारे मार्गदर्शन करणे इत्यादी उद्देश या महिला सक्षमीकरण केंद्राचे आहे.

**सद्यस्थिती :**

राज्यस्तरीय महिला सक्षमीकरण केंद्र महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे येथे कार्यान्वित करण्यात आले असुन यासाठी ८ पदांपैकी राज्य समन्वयक व इतर दोन पदांवर आणि राज्यातील केवळ सात जिल्ह्यांमध्ये आठ पदांवर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थीतीत जिल्हास्तरीय महिला सक्षमीकरण केंद्राच्या जिल्हा समन्वयक पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रत्येक जिल्ह्यातील वन स्टॉप सेंटरच्या केंद्र प्रशासकांकडे देण्यात आलेला असुन राज्यस्तरीय महिला सक्षमीकरण केंद्राच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय महिला सक्षमीकरण केंद्राचे कार्य सुरु आहे. योजनेसाठीच्या मार्गदर्शक सुचनेनुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन योजनेचे पुर्ण क्षमतेने कार्य करावयाचे आहे.

राज्यातील एकही महिला शासनाच्या योजनांपासुन वंचित राहणार नाही यासाठी गरजू महिलांची माहिती घेऊन त्यांची नोंदणी करणे, योजनांचा प्रचार व प्रसार करणे, गाव, तालुका, जिल्हा पातळीवर बैठका, संमेलने आयोजित करणे, संबंधीतांना प्रशिक्षण देणे. महिलांपर्यंत योजनांचा लाभ पोहचविणे व त्यावर देखरेख ठेवणे इत्यादी महत्वाची कार्ये या महिला सक्षमीकरण केंद्रांव्दारे करण्यात येत आहे.

१०० दिवसीय कार्यक्रम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये १,३७२ विविध उपक्रम /कार्यक्रम राबविण्यात आले व त्याव्दारे १,७४,७९१ महिला १०,३१० शासकीय अधिकारी, ४,५७६ स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, ३,३४१ लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचले आहेत. याव्दारे एकूण ३१,२७२ लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

१० दिवसीय कार्यक्रम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये २८९ विविध उपक्रम / कार्यक्रम राबविण्यात आले व त्याव्दारे ५३५२ महिला, शासकीय अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधींपर्यंत माहिती पोहचली, याव्दारे एकूण ८९४६ लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आलेली आहे

## २.२० मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्यातील महिलांमध्ये ॲनिमियाचे प्रमाण ५० पेक्षा जास्त आहे. तसेच राज्यातील श्रमबल पाहणीनुसार पुरुषांची रोजगाराची टक्केवारी ५९.१० टक्के व स्त्रीयांची टक्केवारी २८.७० टक्के इतकी आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता. महिलांच्या आर्थिक, आरोग्य परिस्थितीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

महिलांचे आरोग्य व पोषण आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी राज्यात विविध योजना राबविण्यात येत आहेत. महिलांचा श्रम सहभाग पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. ज्यामुळे त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर परिणाम होतो. सदर परिस्थिती लक्षात घेऊन, राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी, महाराष्ट्र राज्याची ''मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजना'' ही दिनांक २८ जून, २०२४ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १ जुलै, २०२४ पासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सुरु करण्यात आली आहे.

**१. योजनेचा उद्देश**

(१) राज्यातील महिला व मुलींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मितीस चालना देणे

(२) त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे

(३) राज्यातील महिला स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे

(४) राज्यातील महिलांच्या व मुलींच्या सशक्तीकरणास चालना देणे.

(५) महिला आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा

**२. योजनेचे स्वरुप**

पात्रता कालावधी दरम्यान प्रत्येक पात्र महिलेला दिनांक १ जुलै २०२४ पासून तिच्या स्वत:च्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) सक्षम बँक खात्यात दरमहा रु.१,५००/- इतका आर्थिक लाभ दिला जाईल. तसेच केंद्र / राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेव्दारे रु.१,५००/- पेक्षा कमी लाभ घेत असेल तर फरकाची रक्कम या योजनेव्दारे पात्र महिलेस देण्यात येईल.

**३. योजनेचे लाभार्थी**

महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ या वर्ष वयोगटातील एका कुटुंबातील विवाहित व एक अविवाहित महिला, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या आणि निराधार महिला.

**४. योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता**

(१) लाभार्थी महिला महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक आहे.

(२) राज्यातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला.

(३) किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत

(४) सदर योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे.

(५) लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु.२.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

**५. अपात्रता**

(१) ज्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख रुपयांपेक्षा अधिक आहे.

(२) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे.

(३) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत. परंतु बाह्य यंत्रणेव्दारे कार्यरत असलेले तथा स्वयंसेवी कामगार आणि कर्मचारी योजनेअंतर्गत अपात्र ठरणार नाहीत.

(४) सदर लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेव्दारे रु.१,५००/- पेक्षा जास्त लाभ घेतला असेल

(५) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार/आमदार आहे.

(६) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड/कॉर्पोरेशन/बोर्ड/उपक्रमाचे/अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक/सदस्य आहेत.

(७) ज्यांच्याकडे चारचाकी वाहने (ट्रॅक्टर वगळून) त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत आहेत. सदर योजनेच्या पात्रता व अपात्रता निकषामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्यास नियोजन व वित्त विभागाचे अभिप्राय घेवून शासन मान्यतेने कार्यवाही करण्यात येईल.

**६. सदर योजनेमध्ये लाभ मिळण्याकरिता खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे-**

(१) योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज

(२) लाभार्थ्यांचे आधार कार्ड

(३) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र/महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला.(अधिवास प्रमाणपत्र नसल्यास, त्याऐवजी १५ वर्षापूर्वीचेरेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला या चार पैकी कोणताही पुरावा ग्राह्य धरण्यात येईल.)

(४) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमंखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य), (ज्या कुटुंबाकडे पिवळे किंवा केशरी रेशनकार्ड असेल अशा कुटुंबाना उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देण्यात येईल.)

(५) बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.

(६) पासपोर्ट आकाराचा फोटो.

(७) रेशनकार्ड.

(८) सदर योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

(९) सदर योजने अंतर्गत पात्र महिला-भगिनींना दि.३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत सक्षम अधिकारी यांचे कडे ऑनलईन पध्दतीने अर्ज करता येईल.

**७. लाभार्थी निवड :-**

''मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण'' योजनेच्या लाभार्थीची पात्रता अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका/मुख्यसेविका/सेतू सुविधा केंद्र/ग्रामपंचायत/ग्रामसेवक/ वार्ड अधिकारी यांनी खातरजमा करुन ऑनलाईन प्रमाणित करुन ऑनलाईन प्रमाणित केल्यानंतर लाभार्थ्यांचा अर्ज सक्षम अधिकारी यांच्याकडे सादर करावा. सक्षम अधिकारी यांनी या कामकाजावर नियंत्रण ठेवावे. त्यानुसार सदर योजनेकरिता अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका/मुख्यसेविका/सेतू सुविधा केंद्र/ग्रामपंचायत/ग्रामसेवक/वार्ड अधिकारी व सक्षम अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्षेत्र | लाभार्थ्यांची स्वीकृती/तपासणी /पोर्टलवर अपलोड करणे. | अर्ज पडताळणी करुन सक्षम अधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी सादर | अंतिम मंजूरी देण्याकरिता सक्षम अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रामीण भाग | अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका/सेतू सुविधा केंद्र/ग्रामपंचायत/ग्रामसेवक | संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती |
| २. | नागरी भाग | अंगणवाडी सेविका/मुख्यसेविका/वार्ड अधिकारी/सेतू सुविधा केंद्र | | |

**८. नियंत्रण अधिकारी**

आयुक्त,महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य,पुणे हे सदर योजनेसाठी ''नियंत्रण अधिकारी'' राहतील, तसेच आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई हे ''सहनियंत्रण अधिकारी'' राहतील.

सदर योजनेसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उपलब्ध होईपर्यंत या विभागाच्या लेक लाडकी या योजनेसाठी अस्तित्वात असलेल्या लेखाशिर्ष २२३५-डी- ५२४ मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या आर्थिक तरतूदीमधून खर्च भागविण्यात आला होता. परंतु सद्यस्थितीत मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजनेसाठी २२३५ डी ६३१ या नवीन उपलब्ध लेखाशिर्षामधून खर्च भागविण्यात येत आहे.

**२.२१ पिंक ई-रिक्षा**

महाराष्ट्र राज्यात रोज अनेक महिला व मुली नोकरीनिमित्ताने मोठ्या शहरात वास्तव्यास आहेत. नोकरीच्या निमित्ताने त्यांना अनेक वेळा एकटीने प्रवास करावा लागतो. अशावेळी महिला व मुलींच्या दृष्टीने सुरक्षित प्रवासाकरिता महिलांनी चालविल्या जाणाऱ्या पिंक-ई रिक्षा उपलब्ध करुन दिल्यास अनेक महिलांना नोकरीच्या विशिष्ट पाळ्यांमध्ये काम करताना सुरक्षित प्रवास करता येईल तसेच अनेक नवीन स्त्रिया ज्यांच्याकडे काम करण्याची क्षमता आहे परंतु सुरक्षित प्रवासासाठी ज्यांच्या मनात साक्षंकता आहे अशा महिला, मुली निश्चितच या महिलांव्दारे चालविल्या जाणाऱ्या पर्याय उपलब्ध करुन दिल्यास त्या आत्मनिर्भर होतील. तसेच या रिक्षा फक्त महिलांनीच चालविल्या जाणार असल्याने ज्या महिलांना रिक्षा चालवून प्रवासी वाहतुक, व्यवसाय करुन आत्मनिर्भर पिंक-ई रिक्षा व्हायचे आहे. परंतु ज्यांच्याकडे आर्थिक अडचण आहे अशा महिलांकरिता पिंक-ई रिक्षा उपलब्ध करुन देणार आहे.

**योजनेचा तपशील**

(१) राज्यातील होतकरु मुली व महिलांना स्वावलंबी व आत्मनिर्भर होता येईल.

(२) राज्यातील महिला व मुली यांना सुरक्षित प्रवास करता येईल.

(३) राज्यातील महिलांना व मुलींना सशक्तीकरण चालना मिळेल.

राज्यातील प्रमुख शहरात जेथे नोकरीच्या निमित्ताने महिलांना रात्री-बेरात्री प्रवास करावा लागतो. अशा नोकरी, रोजगाराच्या जास्त संधी असलेल्या पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, कोल्हापूर, सोलापूर, अहिल्यानगर या शहरात इच्छुक महिलांना पिंक-ई रिक्षा खरेदी करण्यासाठी व चालविण्यासाठी खालीलप्रमाणे अर्थसहाय्य व इतर सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

- महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रातील प्रमुख शहरात पहिल्या टप्प्यात १०००० युवतींना कमी व्याजदरामध्ये रिक्षा किंमतीच्या ७० टक्के कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.
- राज्य शासन २० टक्के आर्थिक भार उचलेल
- योजनेची लाभार्थी युवती १० टक्के आर्थिक भार उचलेल
- कर्जाची परतफेड ५ वर्षे (६० महिने)
- रिक्षाची किंमतीवरील रोड टॅक्स, जी.एस.टी.शासन भरेल.
- रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षण, वाहन परवाना एजन्सी मार्फत मोफत उपलब्ध करुन देण्यात येईल.

**२.२२ बेटी बचाओ बेटी पढाओ :**

केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाचे पत्र क्र. NHEW/२७/२०२३-NHEW(e-१०७९९२) दि.२३.०१.२०२४ च्या पत्रान्वये बेटी बचाव बेटी पढाव योजना केंद्र पुरस्कृत मिशन शक्ती या एकछत्री योजनेतील संबल या उपयोजनेच्या महिला सक्षमीकरण केंद्र या घटक योजनेअंतर्गत राबविण्यात यावे असे सुचीत केले आहे. मिशन शक्ती या योजनेअंतर्गतच्या योजना या आयुक्तालयामार्फत राबविण्यात येत असल्याने त्यातील महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत बेटी बचाव बेटी पढाव ही योजना राबविण्यासाठी या आयुक्तालयस्तरावर स्वतंत्र SNA बँक खाते उघडण्यात आले होते, आता SNA SPARSH खाते उघडण्यात आले आहे.

केंद्र शासनाने ''बेटी बचाव बेटी पढाव'' हे अभियान दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ पासून मुलींचा जन्मदर कमी असलेल्या देशातील १०० जिल्ह्यांत सुरु केलेले होते. सदर योजना केंद्रपुरस्कृत असुन १००% अनुदान केंद्र शासनाकडून दिले जाते. यामध्ये शासन निर्णय दि.१९ सप्टेंबर,२०२४ अन्वये महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमाची उद्दिष्टे (१) लिंग निवडीस प्रतिबंध करणे, (२) बालिकेच्या जीवनमानाच्या सुरक्षेबद्दल खात्री देणे, (३) बालिकेच्या शिक्षणाबाबत खात्री देणे, ठरविण्यात आलेली आहेत, मिशन शक्ती या एकछत्री योजनेच्या संबल या उपयोजनेचा ''बेटी बचाव बेटी पढाव'' या घटक योजनेचा समावेश करण्यात आला आहे.

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.०६.०८.२०१८ अन्वये ''बेटी बचाव बेटी पढाव'' ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. ''बेटी बचाव - बेटी पढाव'' या कार्यक्रमांतर्गत जी उद्दिष्टिये निश्चित करण्यात आली आहेत ती संबंधित विभागाने राबवावयाची आहेत.

या योजनेंतर्गत मुलींचा जन्मदर वाढविण्याच्या दृष्टिकोनातून जनजागरण मोहिमे अंतर्गत अनेक कार्यक्रम करण्यात येत आहेत. जसे की, गर्भवती मातांची नोंदणी, मुलींच्या जन्माचे स्वागत करण्याबाबत जनजागृती, वाढदिवस साजरा करणे, आरोग्य शिबिरे आयोजित करणे, मुलगी वाचवा- मुलगी शिकवा याबाबत मार्गदर्शन, गुड्डा-गुड्डी बोर्ड त्यावर मुला-मुलींची जन्मसंख्या लिहून ते सार्वजनिक ठिकाणी लावणे, पथनाट्ये इ. कार्यक्रम जिल्हाधिकारी यांच्यामार्फत आयोजित करणेबाबत शासननिर्णयामध्ये नमूद केलेले आहे.

**या अभियानांतर्गत कार्यरत असणारे विभाग :**

(१) आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, (२) महिला व बाल विकास विभाग, (३) सामाजिक न्याय विभाग, (४) शिक्षण विभाग, (५) पंचायतराज, (६) ग्रामविकास, (७) विधी व न्याय विभाग, (८) इंडियन मेडिकल असोसिएशन यांचे प्रतिनिधी, (९) स्वयंसेवी संस्था

**२.२३ आदिशक्ती अभियान आदिशक्ती पुरस्कार**

राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबविणे व आदिशक्ती पुरस्कार प्रदान करण्यासाठी दिनांक २२ मे, २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित झालेला आहे.

**अभियानाचे उद्देश :**

१. ग्राम चळवळीतून महिलांच्या समस्यांचे महत्व जाणुन घेणे व त्यांच्या आरोग्य समस्यांचे संवेदनशीलपणे निवारण करणे.

२. कुपोषण, बालमृत्यु, माता मृत्युचे प्रमाण कमी करण्याकरीता सक्षम समाज निर्माण करणे.

३. लिंग भेदात्मक विचारसरणीला आव्हान देऊन किशोरवयीन मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढविणे व बाल विवाह मुक्त समाज निर्माण करणे.

४. लैंगिक, शारीरिक अत्याचाराला प्रतिबंध करुन हिंसाचार मुक्त कुटुंब व समाज निर्माण करणे व अनिष्ट रुढींचे निर्मुलन करणे.

**अभियानाची कार्यप्रणाली :**

अभियान यशस्वीपणे ग्रामस्तर, तालुकास्तर, जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरावर विशेष समित्यांचे गठण करण्यात येईल.

**ग्रामस्तरीय समिती :**

| | |
|---|---|
| १. ग्राम सभेने निवडलेली महिला प्रतिनिधी | अध्यक्ष |
| २. पुरुष प्रतिनिधी (महिला व बाल विकास क्षेत्रात सक्रिय) | सदस्य |
| ३. पुरुष प्रतिनिधी (सामाजिक क्षेत्रात सक्रिय) | सदस्य |
| ४. आशा स्वयंसेविका | सदस्य |
| ५. महिला शिक्षीका /महिला तलाठी/महिला पोलीस पाटील | सदस्य |
| ६. ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी | सदस्य |
| ७. पोलीस पाटील | सदस्य |
| ८. अंगणवाडी सेविका | सदस्य सचिव |

**तालुकास्तरीय समिती :**

| | |
|---|---|
| १. गट विकास अधिकारी | अध्यक्ष |
| २. तालुक्यातील जेष्ठ अंगणवाडी पर्यवेक्षिका | सदस्य |
| ३. तालुक्यातील आरोग्य अधिकारी (महिला आरोग्य अधिकाऱ्यास प्राधान्य) | सदस्य |
| ४. महिलांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी (महिला) | सदस्य |
| ५. तालुका संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) | सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय समिती :**

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हापरिषद | सदस्य |
| ४. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हापरिषद | सदस्य |
| ५. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | सदस्य |
| ६. जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बाल विकास, (जि.प.) | सदस्य सचिव |

**विभागस्तरीय समिती :**

| | |
|---|---|
| १. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे | अध्यक्ष |
| २. व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ | सदस्य |
| ३. सदस्य सचिव, महाराष्ट्र महिला आयोग | सदस्य |
| ४. विभागिय उपआयुक्त, महिला व बाल विकास (सर्व) | सदस्य |
| ५. उपआयुक्त (अंगणवाडी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना | सदस्य |
| ६. उपआयुक्त (महिला विकास), महिला व बाल विकास, पुणे | सदस्य सचिव |

**राज्यस्तर समिती :**

| | |
|---|---|
| १. मा. मंत्री, महिला व बाल विकास विभाग | अध्यक्ष |
| २. मा. राज्यमंत्री, महिला व बाल विकास विभाग | सदस्य |
| ३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ४. प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ५. प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग | सदस्य |
| ६. सचिव/प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग | सदस्य |
| ७. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे | सदस्य सचिव |

**समित्यांची कार्यकक्षा व अभियानाची नियमावली :**

**कार्यकक्षा :**

१. महिला विकास विषयक :

२. महिला सक्षमीकरण विषयक :

३. जाणीव जागृती :

४. ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यरत करणे :

५. सामाजिक सुरक्षिततेकरीता कार्यक्रम :

६. आरोग्यविषयक :

७. शिक्षणविषयक :

८. पर्यावरणविषयक :

**नियमावली :**

१. राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभागी होणे अनिवार्य राहील.

२. सर्व ग्रामपंचायतींनी विशेष ग्राम सभा घेऊन प्रत्येक ग्रामस्ताला विशेषतः महिलांना या अभियानाबाबत माहिती देणे बंधनकारक.

३. आदिशक्ती पुरस्कारासाठी ग्राम पंचायतींची निवड करणे.

४. प्रत्येक स्तरावरील समितीने प्रत्येक ग्रामपंचायतीची तपासणी करुन ग्रामपंचायतींच्या शेरे पुस्तकात नोंदी करणे.

५. प्रत्येक समिती सदस्यांना ग्रामपंचायतीने केलेल्या कामाची तपासणी व मुल्यांकन नि-पक्षपाती पणे करणे.

६. अभियानाच्या प्रत्येक स्तरावर दिलेले निर्णय अंतिम असेल, त्यावर अपील करता येणार नाही.

७. पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींना पुढील वर्षी पुन्हा स्पर्धेत भाग घेऊ शकतील परंतु पुढील पाच वर्ष. अभियानांतर्गत कोणत्याही स्तरावर पुरस्कार देय राहणार नाही. परंतु विशेष प्रमाणपत्र देण्यात येईल.

८. तपासणी मध्ये तपासणी दरम्यान दोन तृतियांश सदस्य तपासणी करण्याकरिता पूर्णवेळ हजर असणे आवश्यक असेल.

**पुरस्कारांची रक्कम :**

| | | |
|---|---|---|
| १. तालुकास्तरीय पुरस्कार | प्रथम | रु. १ लाख |
| | व्दितीय | रु. ५० हजार |
| | तृतीय | रु. २५ हजार |
| २. जिल्हास्तरीय पुरस्कार | प्रथम | रु. ५ लाख |
| | व्दितीय | रु. ३ लाख |
| | तृतीय | रु. १ लाख |
| ३. राज्यस्तरीय पुरस्कार | प्रथम | रु. १० लाख |
| | व्दितीय | रु. ७ लाख |
| | तृतीय | रु. ५ लाख |

- तीन ग्रामपंचायतींची निवड तालुका स्तरीय समिती करेल.
- प्रत्येक तालुक्यातील प्रथम, व्दितीय व तृतीय पुरस्कार मिळालेल्या ग्रामपंचायतींमधुन गुणवत्तेनुसार जिल्हास्तरीय समिती जिल्हास्तरीय प्रथम, व्दितीय व तृतीय पुरस्कारासाठी निवड करेल
- प्रत्येक जिल्ह्यातील प्रथम पुरस्कार मिळालेल्या प्रथम, व्दितीय व तृतीय पुरस्कार जिल्हानिहाय प्रस्ताव विभागस्तरीय समिती एकत्र करेल व या निवडलेल्या विजेत्यांमधून गुणवत्ते नुसार राज्यस्तरीय प्रथम, व्दितीय व तृतीय पुरस्कार जाहीर करेल

**२.२४ नारी अदालत :**

ग्रामपंचायत स्तरावर महिलांना भेडसावणाऱ्या किरकोळ स्वरुपाच्या (छेडछाड, हिंसाचार, हक्क डावलने इ.) या प्रकरणांचे निराकरण करण्यासाठी महिलांना पर्यायी तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध करुन देण्यासाठी नारी अदालत हा एक नवीन घटक टप्याटप्याने कार्यान्वित केला जाणार आहे. त्यासाठी निवडलेल्या गावातील प्रतिष्ठीत, आदर्श व सामाजिक जाण असलेल्या महिलांचा समुह गट नारी अदालत म्हणून तयार करावयाचे आहेत. महिलांसंबंधीचे कायदे, अधिकार, योजनांची माहिती इ. बाबत जनजागृती करणे, किरकोळ वाद गाव पातळीवरच मिटविणे यामुळे शक्य होणार आहे. या नारी अदालत गटास ग्रामीण विकास मंत्रालय व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयामार्फत चालविल्या जाणाऱ्या कॉमन सर्विस सेंटर्स (CSCs) सोबत संलग्न करण्यात येणार आहे. यासाठी पुढील प्रमाणे अनुदान असणार आहे.

| Sr. No. | Particulars | Amount in Rs.per year |
|---|---|---|
| 1. | Meeting/out of pocket Expenses @3000 per meeting | 1,44,000 |
| 2. | Uniform @800 once in 2 years annual | 800 |

केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयामार्फत सुरुवातीला केवळ जम्मु व काश्मीर या राज्यात ही योजना लागू केली होती. परंतु आता मा. सचिव, केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील अ.शा.पत्र क्र.१/१/२०२३ NariAdalat dtd. ०६.०१.२०२५ नुसार सदरची योजना प्रायोगिक तत्वावर राज्यात राबविण्यासाठी राज्यातील १० ग्राम पंचायतींमध्ये नारी अदालत गठीत करण्या संबंधीचे प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यास कळविले आहे. त्यानुसार प्रथम वर्षामध्ये ज्या ग्राम पंचायतीचे प्रमुख निर्वाचीत महिला आहेत अशा राज्यातील १० ग्रामपंचायतींचे (प्रत्येक ग्राम पंचायती मधुन ७ ते ११ महिला सदस्य) प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनास सादर करावयाचे आहेत.

**३. महाराष्ट्र राज्य महिला आयोग**

भारताच्या संविधानाचे अनुच्छेद १४, १५ व १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधात खाली देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता संविधानाच्या अनुच्छेद ३८, ३९, ३९-अ व ४२ मध्ये प्रतिष्ठापित केलेल्या तत्त्वांना प्रत्यक्षात आणण्याच्या ध्येयाने महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९९३ रोजी केली.

स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या सुधारात्मक उपाययोजना करण्यासाठी किंवा सुचविण्यासाठी, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरित्या सनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी, स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे व उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला शिफारस करण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली.

**आयोगाची रचना :**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ मधील कलम ३(२) नुसार महिलांच्या कल्याणासाठी स्वतःला वाहून घेतलेली मान्यवर स्त्री आयोगाची अध्यक्षा असते. तसेच महिलांच्या विकाससंबंधीच्या बाबीच्या प्रशासनाचा किंवा महिलांचे संरक्षण, त्यांचा दर्जा उंचावणे किंवा त्यांच्या सर्वसाधारण हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन यासाठी कार्य करणाऱ्या श्रमिक संघटनांचे किंवा महिला स्वयंसेवी संघटनांचे नेतृत्व करण्याचा अनुभव असणाऱ्या समर्थ प्रामाणिक व प्रतिष्ठित व्यक्तीमधून राज्य शासन ६ पेक्षा अधिक अशा महिलांची 'अशासकीय सदस्य' म्हणून नियुक्ती करते. महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक हे आयोगाचे पदसिद्ध सदस्य असून, सचिव दर्जाची राज्य नागरी सेवेत किंवा अखिल भारतीय सेवेत असलेली किंवा राज्याच्या अखत्यारितील सह सचिवांच्या किंवा त्याहून वरच्या दर्जाचे नागरी पद धारण करणारी व समुचित अनुभव असलेल्या महिला अधिकाऱ्याची सदस्य सचिव म्हणून राज्य शासन नियुक्ती करते.

**आयोगाची कार्ये :**

भारताचे संविधान आणि महिलांना संरक्षण देण्यासाठी महिलांशी संबंधित असलेले अधिनियम यामध्ये आवश्यक त्या सुधारणा सुचविणे, तसेच कायद्याच्या अंमलबजावणीत काही त्रुटी असल्यास त्याबाबत शासनाला अहवाल सादर करणे, महिलांचे संरक्षण करणाऱ्या अधिनियमाच्या उल्लंघनाच्या बाबतीत समुचित न्यायाधिकरणाकडे तक्रार दाखल करणे. न्यायालय, लोक न्यायालय व न्यायालयीन गुप्त चौकशीस उपस्थित राहणे व बाजू मांडण्याचा हक्क आयोगाला आहे. स्त्रियांच्या मोठ्या गटावर परिणाम करणारे प्रश्न किंवा स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या संविधानातील किंवा अन्य कोणत्याही तरतुदीच्या अर्थउकलीवर परिणाम करणारे प्रश्न अशा बाबीशी संबंधित अहवाल राज्य शासनाला सादर करणे. गरीब पिडीत महिलांवर झालेल्या कोणत्याही अन्यायाविरुद्ध योग्य ती कार्यवाही दाखल करण्यासाठी अशा गरीब पिडीत महिलांना मोफत कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन देणे, महिलांवर अन्याय हुंडाबळी, लैंगिक छळवणूक इ. प्रकरणात चौकशी करणे, पोलीस कारवाई करणे व आवश्यक असल्यास या प्रकरणात अन्वेषण करणे.

महिलांच्या सामाजिक/आर्थिक विकासासाठी नियोजन प्रक्रियेत सहभाग घेणे. त्यात मदत करणे व सल्ला देणे, महिलांचा सर्वांगीण विकास, तंत्रज्ञान व्यवसायातून होणारे रोग, शैक्षणिक सुविधांचा अभाव, समान व किमान वेतन, कुटुंबाकडून होणारी छळवणूक, कामाच्या ठिकाणी होणारी लैंगिक छळवणूक इ. बाबत अभ्यास करून शासनाला महिलांसाठी धोरण तयार करण्यासाठी सूचना करणे. सुधारगृहे, तुरुंगे व महिला संस्थांची पहाणी करून दिसून येणाऱ्या त्रूटीबाबत सुधारात्मक कार्यवाही इत्यादी आयोगाची कार्ये असून, आयोगाच्या मुख्यालयात एक समुपदेश व मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र कार्यान्वित आहे. आयोग कार्यालयामध्ये समुपदेशन केंद्रासाठी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रस्तावांची नोंदणी करण्यात येत आहे. आयोगाची कार्ये आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शासनाकडून आयोगास सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात येते. सदर अनुदानातून मेळावे, परिषदा, अभ्यासगट यावरील व आस्थापनेवरील खर्च करण्यात येतो. राज्यभरातील पीडित महिलांना दूरध्वनीव्दारे संपर्क साधता यावा यासाठी सुहिता ही हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. १५५२०९ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत महिलांना संपर्क करता येतो.

तक्ता क्रमांक ११

**महाराष्ट्र राज्य महिला आयोगास शासनाकडून प्राप्त सहाय्यक अनुदान व आस्थापनेवरील आणि आयोग कार्यप्रणालीवर झालेला खर्च तपशील**

| अ. क्र. | | वित्तीय वर्ष | प्राप्त सहाय्यक अनुदान | खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | सुधारित | २०१३-२०१४ | १,५१,८५ | १,४१,८७ |
| २. | सुधारित | २०१४-२०१५ | १,८०,७२ | १,७०,५१ |
| ३. | सुधारित | २०१५-२०१६ | १,५९,२९ | १,४५,८६ |
| ४. | सुधारित | २०१६-२०१७ | ६,१४,७५ | ३,५१,४९ |
| ५. | सुधारित | २०१७-२०१८ | ६,४५,२७ | ६,५३,३७ |
| ६. | सुधारित | २०१८-२०१९ | ८,१४,९८ | ७,९४,५९ |
| ७. | सुधारित | २०१९-२०२० | ८,४२,०१ | ९,०८,१२ |
| ८. | सुधारित | २०२०-२०२१ | ४,२६,९८ | ३,७८,३४ |
| ९. | सुधारित | २०२१-२०२२ | ४,६७,२२ | ४,२६,५६ |
| १०. | सुधारित | २०२२-२०२३ | ५,२८,३३ | ३,६२,९३ |
| ११. | सुधारित | २०२३-२०२४ | ४,६३,१२ | ३,८४,६५ |
| १२. | सुधारित | २०२४-२०२५ | ५,८३,०७ | ५,८३,०७ |

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयामध्ये समुपदेशन केंद्राशी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या स्वयंसेवी संस्थाच्या प्रस्तावांची नोंदणी करण्यात येत आहे.

तक्ता क्रमांक १२

समुपदेशन शाखा

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालायातील समुपदेशन शाखेतील वर्षनिहाय प्रकरणांचा तपशील**

(१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५)

| अ. क्र. | तपशील | (अ) एकूण मागील प्रलंबित तक्रारी | (ब) एकूण नोंद झालेल्या तक्रारी | (अ+ब) एकूण तक्रारी | निकाली निघालेल्या तक्रारी | कार्यवाहीस्तव तक्रारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वैवाहिक समस्या | ८३६ | ३९०० | ४७३६ | ३७३५ | १००१ |
| २. | न्यायालयीन प्रलंबित दावा | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | हुंडाबळी | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | सामाजिक समस्या बलात्कार इत्यादी | ३०९ | ३५७१ | ३८८० | ३४२२ | ४५८ |
| ५. | मालमत्तेविषयक समस्या | १५५ | १०३४ | ११८९ | ९९३ | १९६ |
| ६. | कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | २५ | ७८ | १०३ | ६४ | ३९ |
| ७. | कामाच्या ठिकाणी होणारा छळ | ९८ | ९१६ | १०१४ | ८५७ | १५७ |
| ८. | इतर | २७८ | ४२३६ | ४५१७ | ४१९७ | ३२० |
| | एकूण | १७०१ | १३७३८ | १५४३९ | १३२६८ | २१७१ |

तक्ता क्रमांक १३

**महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची मंजूर पदे व वेतनश्रेणी दर्शविणारे विवरणपत्र**

| अ. क्र. | पदनाम | वर्ग | मंजूर पद संख्या | सातव्या वेतना नुसार वेतनस्तर | सन २०२३-२०२४ | | सन २०२४-२०२५ सद्यःस्थिती | | सन २०२५-२०२६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | कार्यरत पदसंख्या | रिक्त पदे | कार्यरत पदसंख्या | रिक्त पदे | कार्यरत पदसंख्या | रिक्त पदे |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १. | सदस्य सचिव | अ | १ | एस-३० | ० | १ | १ | ० | १ | ० |
| २. | उप सचिव | अ | १ | एस-२५ | ० | १ | ० | १ | १ | ० |
| ३. | प्रशासकीय अधिकारी | ब | १ | एस-१६ | १ | ० | ० | १ | १ | ० |
| ४. | लेखा अधिकारी | ब | १ | एस-१६ | १ | ० | १ | ० | १ | ० |
| ५. | कार्यकारी संपादक | ब | १ | एस-१५ | १ | ० | १ | ० | १ | ० |
| ६. | विधी तज्ज्ञ (एकत्रित वेतनावर) | ब | १ | एकत्रित वेतन | १ | ० | १ | ० | १ | ० |
| ७. | वरिष्ठ समुपदेशक | ब | २ | एस-१५ | ० | २ | ० | २ | ० | २ |
| ८. | उच्चश्रेणी लघुलेखक | क | ३ | एस-१५ | २ | १ | २ | १ | २ | १ |
| ९. | निम्नश्रेणी लघुलेखक | क | २ | एस-१४ | ० | २ | ० | २ | ० | २ |
| १०. | समुपदेशक-नि-प्रकल्प अधिकारी | क | ३ | एस-१४ | ३ | ० | ३ | ० | ३ | ० |
| ११. | सहाय्यक | क | ३ | एस-१४ | २ | १ | २ | १ | २ | १ |
| १२. | लेखा सहाय्यक | क | १ | एस-१४ | १ | ० | १ | ० | १ | ० |
| १३. | लिपिक नि टंकलेखक | क | ५ | एस-०६ | १ | ४ | १ | ४ | १ | ४ |
| १४. | वाहन चालक | क | २ | एस-०६ | १ | १ | १ | १ | १ | १ |
| १५. | नाईक | ड | २ | एस-०३ | १ | १ | १ | १ | १ | १ |
| १६. | शिपाई | ड | ६ | एस-०१ | २ | ४ | २ | ४ | २ | ४ |
| | **एकूण –** | | **३५** | | **१७** | **१८** | **१७** | **१८** | **१९** | **१६** |

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयातील समुपदेशन शाखेतील वर्षनिहाय प्रकरणांचा तपशील**

(१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२)

| तपशील | (अ) एकूण प्रलंबित तक्रारी | (ब) एकूण नोंद झालेल्या तक्रारी | (अ + ब)= एकूण तक्रारी | निकाली निघालेल्या तक्रारी | कार्यवाहीस्तव |
|---|---|---|---|---|---|
| वैवाहिक समस्या | १९०६ | २२९४ | ४२०० | १८२६ | २३७४ |
| न्यायालयीन प्रलंबित दावा | ० | ० | ० | ० | ० |
| हुंडाबळी | ० | ० | ० | ० | ० |
| सामाजिक समस्या, बलात्कार इत्यादी | ११९७ | २६५८ | ३८५५ | २१९६ | १६५९ |
| मालमत्तेविषयक समस्या | २९३ | ७४० | १०३३ | ७१० | ३२३ |
| कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | ३३ | २४ | ५७ | २४ | ३३ |
| कामाच्या ठिकाणी होणारा छळ | ३८१ | ४२५ | ८०६ | ४०४ | ४०२ |
| इतर | १०१६ | १५४५ | २५६१ | १४८६ | १०७५ |
| **एकूण** | **४८२६** | **७६८६** | **१२५१२** | **६६४६** | **५८६६** |

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयातील समुपदेशन शाखेतील वर्षनिहाय प्रकरणांचा तपशील**

(१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३)

| तपशील | (अ) एकूण प्रलंबित तक्रारी | (ब) एकूण नोंद झालेल्या तक्रारी | (अ + ब)= एकूण तक्रारी | निकाली निघालेल्या तक्रारी | कार्यवाहीस्तव |
|---|---|---|---|---|---|
| वैवाहिक समस्या | २३७४ | २८१९ | ५१९३ | २८४१ | २३५२ |
| न्यायालयीन प्रलंबित दावा | ० | ० | ० | ० | ० |
| हुंडाबळी | ० | ० | ० | ० | ० |
| सामाजिक समस्या, बलात्कार इत्यादी | १६५९ | २८०३ | ४४६२ | ३०२० | १४४२ |
| मालमत्तेविषयक समस्या | ३२३ | ९०९ | १२३२ | ८८८ | ३४४ |
| कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | ३३ | ३७ | ७० | २० | ५० |
| कामाच्या ठिकाणी होणारा छळ | ४०२ | ५४८ | ९५० | ५२५ | ४२५ |
| इतर | १०७५ | ३०३० | ४१०५ | २८७८ | १२२७ |
| **एकूण** | **५८६६** | **१०१४६** | **१६०१२** | **१०१७२** | **५८४०** |

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयातील समुपदेशन शाखा व विधी शाखे मधील मागील प्रलंबित + चालू महिन्याच्या प्रकरणांचा तपशील**

(१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४)

| तपशील | २०२२-२३ मागील एकूण प्रलंबित तक्रारी | १४-०२-२०२४ रोजीच्या बोर्ड मिटींगमध्ये निर्लेखित केलेल्या तक्रारी | (अ) एकूण मागील प्रलंबित तक्रारी | (ब) एकूण नोंद झालेल्या तक्रारी | (अ + ब) एकूण तक्रारी | निकाली निघालेल्या तक्रारी | कार्य-वाहीस्तव तक्रारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वैवाहिक समस्या | २३५२ | १३८९ | ९६३ | ३०९६ | ४०५९ | ३२२३ | ८३६ |
| न्यायालयीन प्रलंबित दावा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| हुंडाबळी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| सामाजिक समस्या, बलात्कार इत्यादी | १४४२ | १०२३ | ४१९ | २५२१ | २९४० | २६३१ | ३०९ |
| मालमत्तेविषयक समस्या | ३४४ | २१८ | १२६ | ८४२ | ९६८ | ८१३ | १५५ |
| कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | ५० | १९ | ३१ | ३८ | ६९ | ४४ | २५ |
| कामाच्या ठिकाणी होणारा छळ | ४२५ | ३४२ | ८३ | ५८४ | ६६७ | ५६९ | ९८ |
| इतर | १२२७ | ८१४ | ४१३ | २९०३ | ३३१६ | ३०३८ | २७८ |
| **एकूण** | **५८४०** | **३८०५** | **२०३५** | **९९८४** | **१२०१९** | **१०३१८** | **१७०१** |

मा. आयोग कार्यालयाच्या दिनांक १४-०२-२०२४ रोजीच्या बोर्ड मीटींगमध्ये विषय क्र. ३३ नुसार सन २०१८ ते सन २०२० या आर्थिक वर्षातील तक्रारी सर्वानुमते बंद करण्यात आल्या आहेत.

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयातील समुपदेशन शाखा व विधी शाखे मधील मागील प्रलंबित + चालू महिन्याच्या प्रकरणांचा तपशील**

(१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५)

| अ. क्र. | तपशील | (अ) एकूण प्रलंबित तक्रारी | (ब) एकूण नोंद झालेल्या तक्रारी | (अ + ब)= एकूण तक्रारी | निकाली निघालेल्या तक्रारी | कार्यवाहीस्तव |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वैवाहिक समस्या | ८३६ | ३९०० | ४७३६ | ३७३५ | १००१ |
| २. | न्यायालयीन प्रलंबित दावा | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | हुंडाबळी | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | सामाजिक समस्या, बलात्कार इत्यादी | ३०९ | ३५७१ | ३८८० | ३४२२ | ४५८ |
| ५. | मालमत्तेविषयक समस्या | १५५ | १०३४ | ११८९ | ९९३ | १९६ |
| ६. | कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | २५ | ७८ | १०३ | ६४ | ३९ |
| ७. | कामाच्या ठिकाणी होणारा छळ | ९८ | ९१६ | १०१४ | ८५७ | १५७ |
| ८. | इतर | २७८ | ४२३९ | ४५१७ | ४१९७ | ३२० |
| | **एकूण** | **१७०१** | **१३७३८** | **१५४३९** | **१३२६८** | **२१७१** |

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयातील समुपदेशन शाखा व विधी शाखे मधील मागील प्रलंबित + चालू महिन्याच्या प्रकरणांचा तपशील**

**(१ एप्रिल २०२५ ते ३१ सप्टेंबर २०२५)**

| अ. क्र. | तपशील | (अ) एकूण प्रलंबितं तक्रारी | (ब) एकूण नोंद झालेल्या तक्रारी | (अ + ब)= एकूण तक्रारी | निकाली निघालेल्या तक्रारी | कार्यवाहीस्तव तक्रारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वैवाहिक समस्या | १००१ | २८३६ | ३८३७ | २९८५ | ८५२ |
| २. | सामाजिक समस्या, बलात्कार इत्यादी | ४५८ | २४७६ | २९३४ | २३६० | ५७४ |
| ३. | मालमत्तेविषयक समस्या | १९६ | ९१६ | १११२ | ८८३ | २२९ |
| ४. | कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | ३९ | ४९ | ८८ | ५२ | ३६ |
| ५. | कामाच्या ठिकाणी होणारा छळ | १५७ | ५४१ | ६९८ | ५६७ | १३१ |
| ६. | इतर | ३२० | २०९२ | २४१२ | २०९० | ३२२ |
| | **एकूण** | **२१७१** | **८९१०** | **११०८१** | **८९३७** | **२१४४** |

तक्ता

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयातील**

(१ एप्रिल २०२२ ते

| अ. क्र. | तपशील | २०२२-२०२३ | | | | | २०२३-२०२४ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मागील प्रलंबित तक्रारी (अ) | दाखल तक्रारी (ब) | एकूण तक्रारी (अ)+(ब) | निकाली तक्रारी | एकूण कार्य-वाहीस्तव तक्रारी | मागील प्रलंबित तक्रारी (अ) | दाखल तक्रारी (ब) | एकूण तक्रारी (अ)+(ब) | निकाली तक्रारी | एकूण कार्य-वाहीस्तव तक्रारी |
| १. | वैवाहिक समस्या | २३७४ | २८१९ | ५१९३ | २८४१ | २३५२ | ९६३ | ३०९६ | ४०५९ | ३२२३ | ८३६ |
| २. | न्यायालयीन प्रलंबित दावा | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ३. | हुंडाबळी | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ४. | सामाजिक समस्या बलात्कार इत्यादी | १६५९ | २८०३ | ४४६२ | ३०२० | १४४२ | ४१९ | २५२१ | २९४० | २६३१ | ३०९ |
| ५. | मालमत्तेविषयक समस्या | ३२३ | ९०९ | १२३२ | ८८८ | ३४४ | १२६ | ८४२ | ९६८ | ८१३ | १५५ |
| ६. | कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | ३३ | ३७ | ७० | २० | ५० | ३१ | ३८ | ६९ | ४४ | २५ |
| ७. | कामाच्या ठिकाणी होणारा छळ | ४०२ | ५४८ | ९५० | ५२५ | ४२५ | ८३ | ५८४ | ६६७ | ५६९ | ९८ |
| ८. | इतर | १०७५ | ३०३० | ४१०५ | २८७८ | १२२७ | ४१३ | २९०३ | ३३१६ | ३०३८ | २७८ |
| | **एकूण –** | **५८६६** | **१०१४६** | **१६०१२** | **१०१७२** | **५८४०** | **२०३५** | **९९८४** | **१२०१९** | **१०३१८** | **१७०१** |

मा. आयोग कार्यालयाच्या दिनांक १४ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या बोर्ड मिटिंगप्रमाणे विषयानुसार सन २०१८ ते सन २०२० या वार्षिक वर्षातील तक्रारी सर्वानुमते बंद करण्यात आल्या आहेत.

क्रमांक १४

**समुपदेशन शाखा व विधी शाखेतील वर्षनिहाय प्रकरणांचा तपशील**

३१ मार्च २०२५)

| २०२४-२०२५ | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण मागील प्रलंबित तक्रारी (अ) | एकूण नोंद झालेल्या तक्रारी (ब) | एकूण तक्रारी (अ)+(ब) | निकाली निघालेल्या तक्रारी | एकूण कार्यवाहीस्तव तक्रारी |
| ८३६ | ३९०० | ४७३६ | ३७३५ | १००१ |
| ० | ० | ० | ० | ० |
| ० | ० | ० | ० | ० |
| ३०९ | ३५७१ | ३८८० | ३४२२ | ४५८ |
| १५५ | १०३४ | ११८९ | ९९३ | १९६ |
| २५ | ७८ | १०३ | ६४ | ३९ |
| ९८ | ९१६ | १०१४ | ८५७ | १५७ |
| २७८ | ४२३९ | ४५१७ | ४१९७ | ३२० |
| **१७०१** | **१३७३८** | **१५४३९** | **१३२६८** | **२१७१** |

## महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) हा महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम आहे. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने २४ फेब्रुवारी १९७५ साली या महामंडळाची स्थापना झाली. महिलांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व व महामंडळाची या कामातील तज्ञता ध्यानी घेऊन महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र माविम-२००१/प्र. क्र.१०/ का-१० दिनांक २० जानेवारी २००३ नुसार महामंडळाला महिला विकासाची राज्यस्तरीय ''शिखर संस्था'' म्हणून घोषित केले आहे.

**ध्येय :**

चिरंतन विकास प्रक्रियेतून महिलांसाठी सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय प्रस्थापित करणे.

**उद्देश :**

१. ग्रामीण भागातील महिलांचे संघटन करणे.

२. महिलांच्या क्षमता विकसित करणे.

३. महिलांमध्ये आत्मविश्वास वाढविणे.

४. उद्योजकीय विकास घडवून आणणे.

५. रोजगाराच्या संधी व बाजारपेठ यांची सांगड घालणे.

६. महिलांचा शिक्षण, संपत्ती व सत्तेत सहभाग वाढविणे.

७. स्थायी विकासासाठी स्वयंसहाय्य बचत गटांना संस्थात्मक स्वरूप देऊन बळकट करणे.

**माविमच्या कार्यप्रणालीचे स्वरूप :**

१. केंद्र व राज्य शासन पुरस्कृत महिलांसाठीच्या विविध विकासात्मक योजनांकरिता राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून कार्य करणे.

२. स्वयंसहाय्य बचत गट, वित्तीय संस्था, स्वयंसेवी संस्था व शासनाचे संबंधित विभाग यांच्यामध्ये समन्वयक संस्था या नात्याने राज्यस्तरावर कार्य करणे.

**माविमची प्रशासकीय रचना :**

**माविम मुख्यालय ते जिल्हा कार्यालय :**

महिला आर्थिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे स्थित असून, माविमची मुंबईसह ग्रामीण भागात ३४ जिल्हा कार्यालये आहेत. माविममार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांची अंमलबजावणी माविम जिल्हा कार्यालयामार्फत होत असते. या जिल्हा कार्यालयाचा प्रमुख म्हणून जिल्हा समन्वय अधिकारी काम पाहतात. त्याचबरोबर सहा. जिल्हा समन्वय अधिकारी, सहा. संनियंत्रण अधिकारी, लेखाधिकारी, लिपिक असा अधिकारी व कर्मचारी वर्ग कार्यरत आहे.

**महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)**

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. माविम-२००२/प्र.क्र.१०६/का-१०, दि. ५ फेब्रुवारी २००७

संवर्गनिहाय नियमित रिक्त पदांचा वेतनश्रेणीसह तपशिल

| अ. क्र. | संवर्ग | पदांचा तपशिल | वेतनश्रेणी (सहाव्या वेतन आयोगानुसार) | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक (भाप्रसे) | शासन नियमानुसार | १ | १ | ० |
| १. | अ | महाव्यवस्थापक | ७१०००-२११९०० S-२४ | १ | १ | ० |
| | | व्यवस्थापक | ६७७००-२०८७०० S-२३ | ४ | ३ | १ |
| २. | ब | उपव्यवस्थापक / वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी | ४१८००-१३२३०० S-१५ | ११ | ७ | ४ |
| ३. | क | वरिष्ठ लेखाधिकारी/विकास अधिकारी/ जिल्हा समन्वय अधिकारी/व्य. सं. चे स्वीय सहा./ अध्यक्षांचे स्वीय सहा. | ३५४००-११२४०० S-१३ | १६ | ६ | १० |
| | | सहा. जिल्हा समन्वय अधिकारी/संनियंत्रण अधिकारी/प्रशासकीय सहाय्यक/ सहा. लेखापाल | २९२००-९२३०० S-१० | १३ | १ | १२ |
| | | लघुटंकलेखक / सहा. संनियंत्रण अधिकारी | २५५००-८११०० S-८ | १५ | २ | १० |
| | | लिपिक-टंकलेखक/लेखालिपिक/प्रशासकीय सहाय्यक/सहा. लेखापाल वाहनचालक | १९९००-६३२०० S-६ | २६ | ८ | १८ |
| ४. | ड | कार्यासन मदतनीस | १५०००-४७६०० S-१ | २३ | ५ | १८ |
| | | **एकूण –** | | **११०** | **३७** | **७३** |

## महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. माविम-२००२/प्र.क्र. १०६/का-१०, दि. ५ फेब्रुवारी २००७ संवर्गनिहाय करारतत्वावरील रिक्त पदांचा एकत्रित मानधनासह तपशिल

| अ. क्र. | संवर्ग | पदांचा तपशिल | एकत्रित मानधन | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अ | वरिष्ठ सल्लागार (सदर पद खारिज करण्यात आले आहे) | | १ | ० | १ |
| | | महाव्यवस्थापक | ७०१४२ | १ | १ | ० |
| | | व्यवस्थापक | ५१८२१ | १ | ० | १ |
| २. | ब | उपव्यवस्थापक | ५३०४२ | ४ | २ | २ |
| ३. | क | वरिष्ठ लेखाधिकारी/विकास अधिकारी/ जिल्हा समन्वय अधिकारी/स्वीय सहा. | ३५१७७ | २५ | १७ | ८ |
| | | सहा. जिल्हा समन्वय अधिकारी/लेखाधिकारी/ लाईव्हलीहुड ऑफिसर | २५२३३ | ७३ | ४३ | ३० |
| | | लघुटंकलेखक / सहा. संनियंत्रण अधिकारी | ३२२१४ | २१ | १० | ११ |
| | | लिपिक तथा सहा./प्रशासकीय अधिकारी/ कम्युनिकेशन ऑफिसर/वाहनचालक | १८५०० | ३४ | २२ | १२ |
| ४. | ड | कार्यासन मदतनीस | | ० | ० | ० |
| | | **एकूण –** | | **१६०** | **९५** | **६५** |

**स्वयंसहाय्य बचत गट हे सक्षमीकरणाचे प्रभावी माध्यम :**

महिला सक्षमीकरणात महिलांचे संघटन हे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. महिलांना संघटित करण्यासाठी स्वयंसहाय्य बचत गट हे माध्यम अत्यंत उपयुक्त असून, सर्व क्षेत्रातून त्यास मान्यता मिळालेली आहे. स्वयंसहाय्य बचत गटाच्या माध्यमातून महिला केवळ संघटीत होत नाहीत. तर स्वतःच्या कष्टातून काही बचत करतात व त्यामधून एकमेकींना अडीअडचणीत आर्थिक मदत करतात. यातूनच पुढे छोटे-मोठे व्यवसाय करून आर्थिक उन्नतीकडे वाटचाल करतात. या सर्व प्रक्रियेतून एकंदरीत महिलांना स्वतःच्या अस्तित्वाची व स्वत्वाची जाणीव होते. सुरुवातीस केवळ 'मी' चाच विचार करणाऱ्या महिला कालांतराने 'आम्ही' चा विचार करू लागतात. त्याचबरोबर कुटुंब व गाव विकासाचाही त्या विचार करू लागतात व त्यात पुढाकार घेतात म्हणूनच एकंदरीत महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत स्वयंसहाय्य बचत गटाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

**स्वयंसहाय्य बचत गट संकल्पनेवर आधारित कार्यक्रम :**

माविममार्फत सन १९९४ ते २००२ या दरम्यान राबविण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रमाला मिळालेला प्रतिसाद व त्याचे महिला सक्षमीकरणावरील परिणाम या सर्व बाबींचा विचार करून माविमने सन २००१ सालापासून या पूर्वी करीत असलेल्या सर्व व्यापारी तत्त्वांवरील योजना बंद करून केवळ स्वयंसहाय्य बचत गटावरील कार्यक्रम राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. या विविध योजनांतर्गत माविमने साध्य केलेल्या भौतिक प्रगतीचा सप्टेंबर, २०२४ पर्यंतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | एकूण तालुके | ३०० |
| २. | एकूण गावे | १०,४९५ |
| ३. | एकूण बचत गट | १,६६,६३० |
| ४. | एकूण महिला | १८.३६ लाख |
| ५. | एकूण महिलांची बचत | १५८३.०० कोटी |
| ६. | अंतर्गत कर्जाची रक्कम | ४१४७.०० कोटी |
| ७. | विविध बँकांमार्फत बचत गटांना प्राप्त कर्ज | ११७९२.०० कोटी |

तक्ता क्रमांक १५

**सद्य:स्थितीमध्ये माविममार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा तपशील खालीलप्रमाणे**

सन २०२५-२०२६

| अ. क्र. | योजनेचे नाव | कार्यक्षेत्र | कार्यक्रम कालावधी (वर्ष) | अर्थसहाय्य करणाऱ्या संस्थेचे नाव | अर्थ संकल्पीय निधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | अल्पसंख्याक महिला सक्षमीकरण कार्यक्रम Phase-1. | मुंबई सह ११ जिल्ह्यात | २०२० ते २०२५ | अल्पसंख्याक विकास, महाराष्ट्र शासन विभाग | १२०० लाख प्रस्तावित आहेत. |
| २. | अल्पसंख्याक महिला सक्षमीकरण कार्यक्रम Phase-2. नवीन पुढील कार्यक्रम विस्तारित घेण्यास शासन स्तरावर प्रस्ताव प्रक्रियेत | १४ CMRC निर्मिती १४ जिल्हे | २०२१-२२ ते २०२७-२८ | अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, | ३७५ लाख |
| ३. | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) | ०३ जिल्ह्यातील ०६ तालुके | २०१३ ते २०२३ | महाराष्ट्र शासन शहरी विकास विभाग, | ८००.०० लाख |
| ४. | नव तेजस्विनी | ३४ जिल्हे | २०२०-२०२१ ते २०२६-२०२७ | महाराष्ट्र शासन नवतेजस्विनी योजना महिला व बाल विकास विभाग | ९५००.०० लाख |

**महिला सक्षमीकरणाचे विविध घटक आणि महिलांचा सहभाग :**

महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत अनेक घटकांचा समावेश आहे. जसे आर्थिक, सामाजिक, राजकीय, आरोग्य, शैक्षणिक इ. या सर्व घटकाचे महिला सक्षमीकरणासाठी महत्त्व ओळखून माविमने बनविलेल्या प्रत्येक गटात या घटकांचा समावेश करण्याचा प्रयत्न केला आहे.

**आर्थिक :**

महिलांचे उत्पन्न वाढविण्यासाठी विविध छोट्या-मोठ्या उद्योगधंद्यांची निर्मिती करण्यावर भर दिला जातो. शेतीवर आधारित कुकुटपालन,शेळीपालन, फलोत्पादन, भाजी विकण्याचा व्यवसाय, बी-बियाणे विकण्याचा व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, अशा विविध उद्योगांमध्ये सहभाग घेतलेला आहे. बिगर शेतांवर आधारित किराणा दुकान, शिवणकाम, मंडप डेकोरेशनचा व्यवसाय, लॉन्ड्री व्यवसाय, सायकल रिपेअरचे दुकान, रेडीमेड गारमेंट, हॉटेल खाणावळ, मिरची कांडप, बांगड्या विक्री अशा उद्योगांमध्ये महिला सहभागी झाल्या आहेत.

**सामाजिक :**

आर्थिक व्यवहारासोबत माविमने जाणिवपूर्वक स्वयंसहाय्य बचत गटामध्ये सामाजिक घटकावर भर दिलेला आहे. सामाजिक घटकांतर्गत गटात सहभाग घेतल्यावर स्त्रियांना घरात व समाजात मानाचे स्थान मिळत आहे. त्याचबरोबर समाजातील वाईट प्रवृत्ती, जसे दारू, हुंडा बाल विवाह अशा व इतर प्रथांना आळा घालण्यास गटाचा पुढाकार असतो.

**गाव विकासात महिला :**

महिला स्वतः सोबत कुटुंबाचा व त्याचबरोबर गावाचा विकास असा विचार करू लागल्या आहेत आणि म्हणून ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, सामुहिक शौचालय बांधणी, बंधारे बांधणे सारख्या बाबी त्या हाती घेऊ लागल्या आहेत.

**राजसत्ता :**

महिला सक्षमीकरणात महिलांचा राजसत्तेतील सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरतो. गाव पातळीवर ग्रामपंचायतीमध्ये महिलांचा सहभाग वाढू लागल्यानंतर चांगल्या सुधारणा होत असल्याचे दिसून येत आहे. एवढेच नव्हे तर गाव पातळीवरच्या राजसत्तेतील महिलांचा सहभाग महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यास महत्त्वपूर्ण ठरत आहे. माविमच्या आतापर्यंतच्या विविध गटातील २६,४०९ महिला सरपंच/पंचायत समिती जिल्हा परिषद सदस्य अथवा सभापती व विविध स्थानिक समित्यांवर निवडून आल्या आहेत.

**लोकसंचलित साधन केंद्र (सी. एम. आर. सी.)**

बचत गटाची चळवळ कायमस्वरुपी टिकून राहावी म्हणूनच आयफॅड सहाय्यीत तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत लोकसंचलित साधन केंद्र या सारख्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. आजमितीस २९५ लोकसंचलित साधन केंद्राची नोंदणी करण्यात आली आहे. या कार्यपद्धतीत साधारण २५० ते ३०० गटाची मिळून एक लोकसंख्या तयार करून या संस्थेला नोंदणीकृत करण्यात येत आहेत. आजमितीस ३६१ लोकसंचलित साधन केंद्राची नोंदणी करण्यात आली आहे.

या संस्थेची जबाबदारी, बचत गटांना प्राथमिक सदस्य करून घेऊन त्यांच्यामधून कार्यकारी सदस्याची निवड करून त्यांच्याकडे दिली जाईल. हा दररोजचा कारभार पाहण्यासाठी प्रशिक्षित स्टाफ लोकसंचलित साधन केंद्राकडे आहे.

लोकसंचलित साधन केंद्राच्या मार्फत स्वयंसहाय्य बचत गटांना विविध प्रकारच्या सेवा जसे उपजिवीका विकासासाठी कौशल्यपर प्रशिक्षण, उत्पादित मालाला बाजारपेठ मिळवून देणे, महिला सक्षमीकरणासोबत महिलांचे शारीरिक कष्ट कमी करण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम राबविणे, गटाच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी बँक लिंकेजेसवर भर देणे व तातडीचे कर्ज पुरवठ्यासाठी सूक्ष्म पतपुरवठा या सारखे कार्यक्रम राबविणे. या साधन केंद्रामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा व त्यांच्या मिळणाऱ्या सेवाशुल्कातून साधन केंद्राचा आर्थिक भार उचलला जातो.

## इतर योजना

**अल्पसंख्यांक महिला सक्षमीकरण कार्यक्रम :-**

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभाग व अल्पसंख्यांक आयोग यांच्या मदतीने एकूण ११ अल्पसंख्यांक बहुल शहरांमध्ये सन २०२०-२१ ते २०२४-२५ या (मुंबई-धारावी, चांदिवली, ट्रॉम्बे, ठाणे-भिवंडी, मुंब्रा-कौसा, नाशिक-मालेगांव, औरंगाबाद-परभणी, नांदेड, वाशिम-कारंजा, नागपूर, पुणे व सांगली-मिरज) अमरावती एकूण ०५ वर्षाच्या कालावधीमध्ये सप्टेंबर-२०२३ पर्यंत या कार्यक्रमांतर्गत ४४९५ स्वयंसहाय्य बचत गटाची स्थापना करण्यात आलेली असून ५१,२३५ महिलांचा समावेश करण्यात आला आहे. आज रोजी अल्पसंख्याक योजनेअंतर्गत असणाऱ्या सर्व जिल्ह्यांमध्ये मिळून एकूण ६० Micro Livelihood Plan (MLP) चालू आहेत. यामध्ये शिवणकाम, शेळीपालन, गारमेंट, मसाले बनविणे या उपक्रमांचा समावेश असून सुमारे १,५०० महिला यामध्ये सहभागी आहेत. आतापर्यंत ६५९४ गटांच्या अंगावर कर्ज चालू आहे त्यांच रक्कम रु. २०६.३० कोटी इतकी आहे. सुमारे १५,७३४ महिलांना या योजनेद्वारे रोजगार व स्वयंरोजगार प्राप्त झाला आहे.

### महिला आर्थिक विकास महामंडळ
### अल्पसंख्यांक महिला सक्षमीकरण कार्यक्रम
### मासिक प्रगती अहवाल - सप्टेंबर-२०२४ पर्यंत

PHASE-1

| सारांश अहवाल | | |
|---|---|---|
| १. | एकूण बचत गट | ४८५९ |
| २. | एकूण सभासद संख्या | ५४९६२ |
| ३. | एकूण बचत (रु) | ४९४.२० कोटी |
| ४. | एकूण अंतर्गत कर्जाची रक्कम (व्याजासहित) | २२६७.२४ कोटी |
| ५. | एकूण अंतर्गत रक्कम परतफेड | १४२१.३१ कोटी |
| ६. | बँक कर्ज घेतलेल्या गटांची संख्या | ७३५८ |
| ७. | बँक कर्ज घेतलेल्या महिलांची संख्या | ८०७२९ |
| ८. | बँकेकडून घेतलेल्या कर्जाची एकूण रक्कम | ३६५.०७ कोटी |
| ९. | बँक कर्जाची एकूण परतफेड (व्याज सहित) | २५०.८९ कोटी |

| कार्यक्षेत्राचा तपशील | | |
|---|---|---|
| १. | अल्पसंख्यांक कार्यक्रमाचे एकूण जिल्हे - मुंबई, ठाणे, पुणे, सांगली, औरंगाबाद, परभणी, नांदेड, वाशिम, नागपुर, नाशिक. | १० जिल्हे |
| २. | अल्पसंख्यांक कार्यक्रमाची एकूण शहरे - धारावी, ट्रॉबे, चांदिवली, भिवंडी, मुंब्रा, सांगली, औरंगाबाद, परभणी, नांदेड, कारंजा, नागपूर, मालेगांव, पुणे. | १३ शहरे |
| ३. | एकूण लोकसंचलित साधन केंद्र | १३ |

Enclosed Minority Paese II MPR
Enclosed MSRLM MPR

**केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान** (NULM) :-

महिला आर्थिक विकास महामंडळ या प्रकल्पामध्ये संसाधन संस्था म्हणून भूमिका बजावेल व सदर प्रकल्प राज्याच्या ३५ जिल्ह्यांतील २५९ शहरांत राबविण्यात येत आहे.

**महिला आर्थिक विकास महामंडळाची भूमिका व जबाबदारी :-**

या प्रकल्पांतर्गत प्रकल्प कार्यक्षेत्रात किमान ३६,२४० स्वयंसहाय्य बचत गट निर्मिती व त्यांची क्षमता बांधणी करणे, पात्र गटांचे ग्रेडेशन करणे व त्यांचा दर्जा राखणे प्रकल्प कालावधीत किमान ४०% स्वयंसहाय्य बचत गटांना बँक लिंकेज करता येतील. प्रकल्पातील ८०% स्वयंसहाय्य बचत गटांना उद्योग उभारणीबाबत जाणीव जागृती करणे, स्वयंसहाय्य बचत गटांचे वस्ती स्तर (ALF) व शहर स्तरावरील संघ (CLF) बाबत संकल्पना रुजविण्यात येईल. प्रकल्पातील जे बचत गट सहा महिने कालावधीत पूर्ण करतील व पंचसूत्रीचे पालन करतील अशा पात्र गटांना प्रतवारी निकषानुसार फिरता निधी देण्यासाठी शिफारस करण्यात येईल.

तक्ता क्र. १६

**NULM कार्यक्रमाचा सप्टेंबर - २०२४ पर्यंतचा भौतिक प्रगतीचा तपशील खालीलप्रमाणे :**

| सारांश अहवाल | | |
|---|---|---|
| अ.क्र. | विषय | एकूण साध्य (सप्टेंबर २०२४) |
| १. | एकूण बचत गट | ६५२७४ |
| २. | SC सभासदांची संख्या | १,७०,८०२ |
| ३. | ST सभासदांची संख्या | ३६,२३५ |
| ४. | इतर सभासद | ६,५३,५७९ |
| ५. | एकूण सभासद | ९,२२,४४३ |
| | **अल्पसंख्यांक सभासद माहिती** | |
| ६. | मुस्लीम | ७३९०० |
| ७. | बौद्ध | १३२२१ |
| ८. | ख्रिश्चन | १४०५ |
| ९. | जैन | १५२९ |
| १०. | सिख | १०२ |
| ११. | पारसी | २७९ |
| १२. | एकूण अल्पसंख्यांक सभासद | ९०४३६ |
| १३. | दिव्यांग सभासदांची संख्या | १,८१७ |
| १४. | एकूण सदस्यांमधून महिला सभासद | ६,५२,७५१ |
| १५. | एकूण सदस्यामधून शहरी गरीब सदस्य (बीपीएल) | ३,४८,५३९ |
| | **फिरता निधी** | |
| १६. | फिरता निधी मिळलेल्या गटांची संख्या | ४८,१८२ |
| १७. | फिरता निधी रक्कम | ४८,०१,००,००० |
| १८. | एकूण बचत | ३,७२,२५,००,००० |
| | **अंतर्गत कर्ज** | |
| १९. | अंतर्गत कर्ज घेतलेल्या गटांची संख्या | ६५७९१ |
| २०. | अंतर्गत कर्ज घेतलेल्या महिलांची संख्या | ४६०४९२ |
| २१. | अंतर्गत कर्जाची रक्कम | ६२९.२३ कोटी |
| २२. | अंतर्गत कर्ज परतफेड (व्याजासकट) | ५६१.७० कोटी |
| | **बँक कर्ज** | |
| २३. | बँकेशी लिंक झालेल्या गटांची संख्या | ५७८६४ |
| २४. | बँकेतून कर्ज घेतलेल्या महिलांची संख्या | १८७७७३० |
| २५. | बँक कर्ज रक्कम | २०२४६.४२ कोटी |
| २६. | बँक कर्ज परतफेड (व्याजासकट) | १५३८७.३० कोटी |

## महिला महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM)

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत ठाणे (भिवंडी, शहापूर), सोलापूर (माळशिरस, मोहोळ) व गोंदिया (सालेकसा, तिरोडा) या तीन जिल्ह्यांमध्ये एकूण सहा तालुक्यांकरिता तीन वर्षासाठी तांत्रिक तज्ञ व अंमलबजावणी संस्था म्हणून निवड करण्यात आलेली आहे. सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी माहे मार्च २०२४ पर्यंत राहील.

मासिक प्रगती अहवाल - सप्टेंबर २०२४ पर्यंत :

| सारांश अहवाल | | |
|---|---|---|
| १. | एकूण बचत गट | १७३४७ |
| २. | एकूण सभासद संख्या | १९१७३६ |
| ३. | एकूण SC गट (SC महिला >=50%) | २१४९ |
| ४. | एकूण ST गट (ST महिला >=50%) | १८५५ |
| ५. | एकूण इतर गट | १२९४२ |
| ६. | एकूण बचत (रु.) | १९८६०६४०५७ |
| ७. | एकूण बचत गटांना RF दिले | १४४८२ |
| ८. | एकूण RF ची रक्कम (रु.) | २८८५९०००० |
| ९. | एकूण बचत गटांना CIF दिले | १३१३९ |
| १०. | एकूण CIF ची रक्कम (रु.) | २३२६६८६००० |
| ११. | बँक कर्ज घेतलेल्या गटांची संख्या (Repeat Linkage) | २५९३१ |
| १२. | बँक कर्जाची एकूण रक्कम (रू.) | ३८८७६३०९५०९ |

## अल्पसंख्यांक महिला सक्षमीकरण कार्यक्रम (फेज-२)

अंल्पसंख्यांक विभागाने फेज-२ मध्ये महामंडळाकडे वर्ष २०२१-२२ ते २०२७-२८ करिता या कार्यक्रमाला विस्तारीत करून अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, हिंगोली, जालना, उस्मानाबाद, लातूर, चंद्रपूर, बीड, वर्धा, भंडारा, गोंदिया व गडचिरोली या १४ जिल्ह्यांची जबाबदारी दिलेली आहे. १४ जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी २०० बचत गटांची स्थापना करणे व गटांना क्षमतावृध्दी प्रशिक्षण देणे ही प्रमुख जबाबदारी माविमवर देण्यात आलेली आहे.

मासिक प्रगती अहवाल - सप्टेंबर २०२३ पर्यंत :

| सारांश अहवाल | | |
|---|---|---|
| १. | एकूण बचत गट | २७७६ |
| २. | एकूण सभासद संख्या | २८८५३ |
| ३. | एकूण बचत (रू.) | १२.०० कोटी |
| ४. | एकूण अंतर्गत कर्जाची रक्कम (व्याजासहित) (रू.) | ८.२० कोटी |
| ५. | एकूण अंतर्गत रक्कम परतफेड | ४.७२ कोटी |
| ६. | बँक कर्ज घेतलेल्या गटांची संख्या | १७०४ |
| ७. | बँक कर्ज घेतलेल्या महिलांची संख्या | १५०३९ |
| ८. | बँकेकडून घेतलेल्या कर्जाची एकूण रक्कम | ६९.९८ कोटी |
| ९. | बँककर्जाची एकूण परतफेड (व्याजा सहित) | ३१.९० कोटी |

| कार्यक्षेत्राचा तपशील | | |
|---|---|---|
| १. | अल्पसंख्यांक कार्यक्रमाचे एकूण जिल्हे - लातूर, उस्मानाबाद, जालना, बीड, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा, वर्धा | १४ जिल्हे |
| २. | अल्पसंख्यांक कार्यक्रमाचे एकूण शहरे - अकोला, अमरावती, बीड, भंडारा, साकोली, बुलढाणा, चंद्रपूर, बललरपूर, अहेरी, भामरागड, शिरोंचा, हिंगोली, मंठा, जालना, लातूर, उस्मानाबाद, वर्धा, यवतमाळ, गोंदिया | १९ शहरे |

प्रकरण ७

# बाल विकास

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारित अधिनियम २०२१ व महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ अन्वये बाल संरक्षण कार्यक्रम हा काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके व विधी संघर्षग्रस्त बालके यांच्यासाठी राबविला जातो. यामध्ये प्रामुख्याने विधी संघर्ष ग्रस्त, काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी निवासी संस्था व बालकांना वैयक्तिक लाभाच्या योजना अशी विभागणी होते.

या कायद्याअंतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके यामध्ये अनाथ, निराधार, निराश्रित, बेघर, विशेष काळजीची गरज असलेली, एचआयव्ही बाधित बालके, संकटग्रस्त व अत्याचारीत बालके, दुर्धर आजारी पालकांची मुले, कैद्यांची मुले इत्यादी बालकांचा समावेश होतो. या बालकांना बालकल्याण समितीसमोर सादर केले जाते आणि त्यांच्या आदेशानुसार बालकांची काळजी घेणाऱ्या मान्यताप्राप्त शासकीय अथवा स्वयंसेवी संस्थामध्ये दाखल करण्यात येते.

१८ वर्षे वय पूर्ण नसलेली पोलिसांच्या मार्फत ताब्यात घेतलेली विधीसंघर्षग्रस्त बालके यांचा या कायद्याअंतर्गत समावेश होतो. या बालकांना बाल न्याय मंडळासमोर सादर केले जाते आणि त्यांच्या आदेशानुसार अधिनियम व नियम यातील तरतुदीनुसार न्यायिक चौकशी करिता निरीक्षणगृहांमध्ये दाखल करण्यात येते.

बालकांची काळजी घेणाऱ्या शासकीय व स्वयंसेवी अशा दोन प्रकारच्या संस्था कार्यरत आहेत. यामध्ये बालगृह, निरीक्षणगृह, विशेषगृह, सुरक्षित जागा यांचा समावेश होतो. या संस्थांमध्ये दाखल बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकीय सेवा, शिक्षण, प्रशिक्षण, समुपदेशन इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात व भावी आयुष्यात जबाबदार नागरिक बनविण्याच्या हेतूने उपाय योजना केली जाते.

बालकांना प्रत्यक्ष वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनाअंतर्गत निधी, अनाथ बालकांसाठी अनाथ प्रमाणपत्र व शैक्षणिक संस्थांमध्ये तसेच नोकऱ्यांमध्ये १% अनाथ आरक्षण या योजनांचा समावेश होतो.

## १. शासकीय बालगृहे

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील कलम २ (१४) मध्ये नमूद केलेल्या काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या ० ते १८ वर्षे वयोगटातील अनाथ, निराधार, निराश्रित, बेघर, विशेष काळजीची गरज असलेली, एचआयव्ही बाधित बालके, संकटग्रस्त व अत्याचारीत बालके, दुर्धर आजारी पालकांची मुले, कैद्यांची मुले अशा काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना पोलिस, बालकल्याण पोलिस अधिकारी, लोकसेवक, बालकल्याण अधिकारी, परिवीक्षा अधिकारी, सामाजिक कार्यकर्ता, चाईल्ड लाईन आणि स्वत: बालक तसेच परिचारिका, वैद्यकीय अधिकारी, संबंधित सुश्रुषागृहाचे व्यवस्थापक, दवाखाने, किंवा प्रसूतीगृह यांच्याकडून बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात येते. बालकल्याण समितीच्या आदेशानुसार संबंधित १८ वर्षे वयापर्यंतच्या मुलांना या बालगृहामध्ये प्रवेश देण्यात येतो. या मुलांचे / मुलींचे बाबतीत वयाच्या १८ वर्षापर्यंत बालगृहात शिक्षण, संगोपन, संरक्षण देण्यात येऊन मुलांना भावी जबाबदार नागरिक म्हणून आपला चरितार्थ योग्यरीतीने चालविण्यासाठी सक्षम होण्याकरिता उपययोजना केली जाते. बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वेद्यकीय सेवा, शिक्षण, प्रशिक्षण, समुपदेशन इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर ज्या मुलांचे / मुलींचे पालन, नातेवाईक असतील त्यांना बाल कल्याण समितीच्या आदेशाने पालकांच्या, नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात येते. तसेच ज्या मुलांचे / मुलींचे बाबतीत हे शक्य नाही व ज्यांचे शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षण इत्यादी पूर्ण झाले नसेल व राहण्याची सोय नसेल अशा मुले / मुलीना अनुरक्षणगृहात प्रवेश दिला जातो. या योजनेकरिता कर्मचारी वेतनावर व १००% प्रवेशितांवर संस्थेत होणाऱ्या खर्चाप्रमाणे अनुदान शासनाकडून अदा करण्यात येते.

## २. शासकीय विशेषगृहे व सुरक्षित ठिकाण

बाल न्याय मुला (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील कलम २ (१३) मध्ये नमूद केलेल्या १८ वर्षे वयोगटाखालील विधी संघर्षग्रस्त बालकांना बाल न्याय मंडळासमोर सादर करून त्यांच्या आदेशानुसार अधिनियम व नियम यातील तरतुदीनुसार न्यायिक चौकशीकरिता निरीक्षणगृहांमध्ये दाखल करण्यात येते. या बालकांची चौकशी संपल्यानंतर दोष सिद्ध होत असल्यास बाल न्याय मंडळामार्फत पुढील पुनर्वसनाकरिता विशेषगृहामध्ये या बालकास शिक्षण, व्यवसायिक प्रशिक्षण, समुपदेशनाच्या माध्यमातून त्यांचे वर्तन सुधारण्यासाठी प्रयत्न केले जातात. राज्यात ३ शासकीय संस्थापैकी येरवडा, पुणे या एका संस्थेत मुलांकरिता निरीक्षणगृह, विशेषगृह, सुरक्षित ठिकाण अशी मान्यता आहे. मुंढवा, पुणे, आणि देवनार, मुंबई या २ मुलींच्या शासकीय संस्थाना मुलींकरिता बालगृहे, विशेषगृह, निरीक्षणगृह अशी मान्यता आहे. येरवडा, पुणे या एका शासकीय संस्थेत १० मुलांकरिता व नागपूर येथे एका शासकीय संस्थेस १० मुलांकरिता सुरक्षित ठिकाण अशी मान्यता आहे.

या योजनेकरिता कर्मचारी वेतनावर १००% व प्रवेशितांवर संस्थेत होणाऱ्या खर्चाप्रमाणे अनुदान अदा करण्यात येते.

तक्ता क्रमांक १८

**शासकीय बालगृहे व विशेषगृहे**

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | जिल्हा | वर्ष | बालगृहांची संख्या | | | सामावण्याची क्षमता | | | प्रवेशितांची हजर संख्या | पुनर्वसन | | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | | मुले | मुली | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| | एकूण | २०१७-१८ | ०२ | १ | ०३ | २०० | १०० | ३०० | १९२ | ६७ | ४१ | १३,०९,८० |
| | | २०१८-१९ | २४ | ०१ | २५ | २०० | १०० | ३०० | १९५ | — | — | १९,०२,०६ |
| | | २०१९-२० | २४ | ०१ | २५ | २०० | १०० | ३०० | २२८ | २५ | १४ | ७,८९,८७ |
| | | २०२०-२१ | २४ | ०१ | २५ | २०० | १०० | ३०० | २८० | ४७ | २७ | — |
| | | २०२१-२२ | २४ | ०१ | २५ | २०० | १०० | ३०० | २८० | ४३ | १४ | — |
| | | २०२२-२३ | १५ | ०७ | २२ | ६२५ | ४०० | ११७५ | २८० | ३७ | ०९ | — |
| | | २०२३-२४ | १५ | ०७ | २२ | ६२५ | ४०० | ११७५ | २८० | ३७ | ०९ | — |
| | | २०२४-२५ | १५ | ०७ | २२ | ६२५ | ४०० | ११७५ | २८७ | ४३ | ८९ | — |

**टीप :** कार्यरत संस्था एकात्मिक बाल संरक्षण योजनेमध्ये मिशन वात्सल्य अंतर्गत समाविष्ट झाल्या आहेत.

## ३. शासकीय निरीक्षणगृहे / बालगृहे

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत ही योजना कार्यरत आहे. १८ वर्षे वयाखालील पोलिसांच्या मार्फत ताब्यात घेतलेल्या विधी संघर्षग्रस्त बालकांना बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात येते. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम १७ व १८ मध्ये नमूद असलेल्या आदेशांसह बाल न्याय मंडळ त्यास योग्य वाटतील असे पुढील आदेश देतात. प्रकरण परत्वे सादर केलेले दस्तऐवज व अभिलेखे पाहून बालक विधी संघर्षग्रस्त आढळून आले नाही किंवा बालक किरकोळ अपराधामध्ये गोवले असल्याचे सिद्ध झाले तर प्रकरण निकाली काढतात. बालकास काळजी व संरक्षणाची गरज आहे असे दिसून आले तर बाल कल्याण समितीकडे सोपवतात, बालकास पुढील तारखेस चौकशीकरिता हजर राहण्याच्या निर्देशासह योग्य व्यक्ती किंवा योग्य संस्था किंवा परिवीक्षा अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली सोडून दिले जाते, प्रलंबित चौकशी आवश्यक असल्यास बालकास चौकशीकरिता निरीक्षणगृहांमध्ये दाखल करण्यात येते.

सदर कालावधी प्रकरण परत्वे बाल न्याय मंडळ यांचे आदेशानुसार ठरविण्यात येतो. तसेच सदर संस्थांना बालगृहाची मान्यता असल्याने बाल कल्याण समितीमार्फत देखील काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके दाखल करण्यात येतात. सदर संस्था वास्तव्य कालावधीमध्ये मुलांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकीय सेवा, शिक्षण, प्रशिक्षण, समुपदेशन इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. या योजनेकरिता कर्मचारी वेतनावर १००% व प्रवेशितांवर संस्थेत होणाऱ्या खर्चाप्रमाणे अनुदान शासनाकडून अदा करण्यात येते.

तक्ता क्रमांक १९

**शासकीय निरीक्षण गृहे**

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | जिल्हा | वर्ष | निरीक्षण गृहांची संख्या | | | सामावण्याची क्षमता | | | वर्षारंभीची संख्या | वर्षातील प्रवेशित संख्या | एकूण प्रवेशित संख्या | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| | एकूण | २०१७-१८ | ११ | १ | १२ | ५५० | ५० | ६०० | १७ | १७७ | १७७ | ० |
| | | २०१८-१९ | ११ | १ | १२ | ६०० | ५० | ६५० | ६५ | १५८ | १५८ | ० |
| | | २०१९-२० | ११ | १ | १२ | ६०० | ५० | ६५० | ६९ | २१४ | २१४ | ० |
| | | २०२०-२१ | ११ | १ | १२ | ६०० | ५० | ६५० | — | १६५ | १६५ | ० |
| | | २०२१-२२ | ११ | १ | १२ | ६०० | ५० | ६५० | — | — | — | ० |
| | | २०२२-२३ | ११ | ०४ | १५ | ४७० | १५० | ५५० | — | १२७ | १२७ | |
| | | २०२३-२४ | ११ | ०४ | १५ | ४७० | १५० | ५५० | — | १२७ | १२७ | — |
| | | २०२४-२५ | ११ | ०४ | १५ | ४०० | १५० | ५५० | — | १३२ | १३२ | — |

**टीप :** कार्यरत संस्था एकात्मिक बाल संरक्षण योजनेमध्ये समाविष्ट झाल्या आहेत.

## १. स्वयंसेवी बालगृहे

स्वयंसेवी बालगृहे ही स्वयंसेवी संस्थामार्फत कार्यरत असतात. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील कलम ४१ अन्वये या संस्थाना मान्यता देण्यात येते. काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या ० ते १८ वर्षे वयोगटातील अनाथ, निराधार, निराश्रित, बेघर विशेष काळजीची गरज असलेली एचआयव्ही बाधित बालके, संकटग्रस्त व अत्याचारीत बालके, दुर्धर आजारी पालकांची मुले, कैद्यांची मुले अशा व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना पोलिस बालकल्याण पोलिस अधिकारी, लोकसेवक, बालकल्याण अधिकारी, परिवीक्षा अधिकारी, सामाजिक कार्यकर्ता, चाइल्ड लाइन आणि स्वतः बालक तसेच परिचारिका, वैद्यकीय अधिकारी, संबंधित सुश्रुषागृहाचे व्यवस्थापन, दवाखाने किंवा प्रसूतीगृह यांच्याकडून बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात येते. बालकल्याण समितीच्या आदेशानुसार १८ वर्षे वयापर्यंतच्या मुलांना या बालगृहामध्ये प्रवेश देण्यात येतो. संस्थेत बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकीय सेवा, शिक्षण, प्रशिक्षण, समुपदेशन इत्यादी सूविधा उपलब्ध करून देण्यात येतात. राज्यशासनमार्फत दरमहा दरडोई प्रति लाभार्थी रुपये १५००/- परिपोषण खर्च व प्रशासकीय खर्च रु. ५००/- असे एकूण २०००/- याप्रमाणे या बालगृहांना सहाय्यक अनुदान देण्यात येते. शासन निर्णय क्र. बीसीएच-२०२४/प्र.क्र.६२/शिक्षण-२१ दि. १५/१०/२०२४ पासून रु. १५०० वरून २२०० वाढ केली असून सदर वाढ १६/०८/२०२४ पासून लागू केली आहे.

तक्ता क्रमांक २०

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | बालगृह संस्थांची संख्या | मंजूर प्रवेशित | सरासरी उपस्थिती | सामावण्याची क्षमता मुले |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | बालगृह | २०१८-२०१९ | ७५० | ६२,३१६ | २०,००० | ३,१७,१८७ |
| २ | बालगृह | २०१९-२०२० | ७४९ | ७१,७४७ | १८,७४१ | ३,३५,५०६ |
| ३ | बालगृह | २०२०-२०२१ | ३०३ | १७,०८२ | ९,२९७ | ३,२१,५६४ |
| | बालगृह | २०२१-२०२२ | ३०३ | १७,०८२ | ९,२९७ | १,२५,११२ |
| | बालगृह | २०२२-२०२३ | ३१४ | १२,४९६ | ९,६४८ | ४,४८,५८० |
| | बालगृह | २०२३-२०२४ | ३१३ | १२,८८७ | ९,२०४ | ३८१५६० |
| | बालगृह | २०२४-२०२५ | ३०७ | १८,१११ | १०,३५० | ५९३६१६ |
| | बालगृह | २०२५-२०२६ | ३३६ | २०,५३२ | ९४१५ | - |
| | बालगृह | २०२६-२०२७ | ३३६ | २०,५३२ | ९४१५ | - |

## २. स्वयंसेवी निरीक्षणगृहे / बालगृहे

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत ही योजना कार्यरत आहे. १८ वर्षे वयोगटाखालील पोलिसांच्या मार्फत ताब्यात घेतलेल्या विधी संघर्षग्रस्त बालकांना बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात येते. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम १७ व १८ मध्ये नमूद असेलेल्या आदेशांसह बाल न्याय मंडळ त्यास योग्य वाटतील असे पुढील आदेश देतात. प्रकरण परत्वे सादर केलेले दस्त ऐवज व अभिलेखे पाहून बालक विधी सूंघर्षग्रस्त आढळून आले नाही किंवा बालक किरकोळ अपराधामध्ये गोवले असल्याचे सिद्ध झाले तर प्रकरण निकाली काढतात. बालकांस काळाजी व संरक्षणाची गरज आहे असे दिसून आले तर बाल कल्याण समितीकडे सोपवतात, बालकास पुढील तारखेस चौकशीकरीता हजर राहण्याच्या निर्देशासह योग्य व्यक्ति किंवा योग्य संस्था किंवा परिवीक्षा अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली सोडून दिल जाते, प्रलंबित चौकशी आवश्यक असल्यास बालकास चौकशीकरिता निरीक्षणगृहांमध्ये दाखल करण्यात येते. सदर कालावधी प्रकरण परत्वे बाल न्याय मंडळ यांचे आदेशानुसार ठरविण्यात येतो. तसेच सदर संस्थांना बालगृहाची मान्यता असल्याने बाल कल्याण समितीमार्फत देखील काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके दाखल करण्यात येतात. सदर संस्था वास्तव्य कालावधीमध्ये मुलांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकीय सेवा, शिक्षण, प्रशिक्षण, समुपदेशन इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. या योजनेकरिता कर्मचारी वेतनावर १००% व दरमहा दरडोई प्रति लाभार्थी रुपये १५००/- परिपोषण खर्च व रु. ५००/- प्रशासकीय खर्च असे एकूण रु. २०००/- याप्रमाणे अनुदान देण्यात येते.

तक्ता क्रमांक २१

**स्वयंसेवी निरीक्षणगृहे/बालगृहे**

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | जिल्हा | वर्ष | स्वयंसेवी निरीक्षणगृहांची संख्या | | | सामावण्याची क्षमता | | | वर्षारंभीची संख्या | वर्षातील प्रवेशित संख्या | एकूण प्रवेशित संख्या | पुनर्वसन | | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | | | | मुले | मुली | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (७) | (८) | (१३) |
| | एकूण | २०१७ | ३२ | १६ | ४८ | ३०५० | १२०० | ४२५० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | २०१८ | ३२ | १८ | ४८ | ३०५० | १२०० | ४२५० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | २०१९ | ३१ | १६ | ४८ | ३५० | १२०० | ४२५० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | २०२० | २५ | १६ | ४१ | २००० | १०५७ | ३०५७ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | २०२१ | २४ | १६ | ४० | १३०३ | ७४६ | २०४४ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | २०२२ | २१ | १६ | ३७ | ११६३ | ९४६ | २१०९ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | २०२३ | २१ | १६ | ३७ | ११६३ | ९४६ | २१०९ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | २०२४ | २३ | १७ | ४० | १२२८ | ९४६ | २१०९ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | २०२५ | २३ | १७ | ४० | १२२८ | ९४६ | २१०९ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |

**टीप :** कार्यरत संस्था एकात्मिक बाल संरक्षण योजनेमध्ये समाविष्ट झाल्या आहेत.

### ३. योग्य व्यक्ती अथवा योग्य सुविधा

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ च्या कलम ५१ आणि ५२ नुसार आपत्कालिन परिस्थितीमध्ये किंवा बालकाच्या गरजेनुसार एखादी व्यक्ती अथवा संस्थेस तात्पुरत्या कालावधीसाठी बालकांचा सांभाळ करण्यासाठी योग्य व्यक्ती व योग्य सुविधा म्हणून घोषित करण्याचे अधिकार संबंधित बाल कल्याण समितीला प्राप्त आहेत. एखादी व्यक्ती किंवा संस्थेत योग्य व्यक्ती अथवा सुविधा घोषित करण्यापुर्वी बाल कल्याण समिती ही जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांचेकडून त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्राप्त करून घेवून आदेश पारित करते.

### ४. स्वयंसेवी संस्थेकडून चालविले जाणारे बाल मार्गदर्शन केंद्र

वरील कार्यक्रम हा उन्मार्गी मुलांच्या वागण्यास प्रतिबंध करण्याच्या हेतूने आखलेला आहे. हे सांस्कृतिक केंद्र असून तेथे खेळ साहित्य व करमणुकीचे साहित्य मुलांना पुरविले जाते. ही सर्व सोय फावल्या वेळेचा उपयोग कसा करावा असा प्रश्न ज्या मुलांमध्ये असतो अशा मुलांसाठी केली आहे. ही केंद्रे साधारणपणे मोठ्या शहरातील गलिच्छ वस्त्यांमधून सुरू केलेली आहेत.

या केंद्रामध्ये येणाऱ्या मुलांना करमणुकीचे साहित्य, वाचनासाठी पुस्तके, खेळण्याचे साहित्य पुरविते. सध्या राज्यातील गलिच्छ वस्त्यांमधून स्वयंसेवी संस्थांमार्फत १ बाल मार्गदर्शन केंद्र कार्यान्वित आहे. प्रत्येक केंद्रावर सरासरी ७५ ते १०० मुले या योजनेचा फायदा घेतात.

झोपडपट्टीतील मुलांना नेमका असा कामधंदा, शिक्षण वगैरे कार्यक्रम नसतो. काहींचा पूर्ण वेळ निकामी जातो आणि त्यामुळे ही मुले वाईट मार्ग अवलंबिण्याचा धोका जास्त असतो. बाल गुन्हेगार प्रवृत्तीची वाढ ह्या मुलांमध्ये होऊ नये म्हणून प्रतिबंधक स्वरूपाचे कार्यक्रम या केंद्रामधून केले जातात व ते फलदायी ठरत आहेत. सदर योजनेचे प्रस्ताव छाननी करून संस्थेस अनुदान मंजूर करण्याचे अधिकार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना सुपूर्द करण्यात आले आहेत. एका केंद्रास वर्षाला रु. ३,००० आवर्ती अनुदान म्हणून देण्यात येते. तसेच संस्थेस मान्यता देतेवेळी फर्निचर खरेदीसाठी रु. १,००० अनावर्ती अनुदान देण्यात येते.

तक्ता क्रमांक २२

(रुपये हजारांत)

| अनुक्रमांक (१) | जिल्हा (२) | वर्ष (३) | केंद्रांची संख्या (४) | एकूण अनुदान (५) | लाभार्थी (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण | २०१७-२०१८ | १ | ३ | १०० |
| | | २०१८-२०१९ | १ | ३ | १०० |
| | | २०१९-२०२० | १ | ३ | १०० |
| | | २०२०-२०२१ | १ | ३ | १०० |
| | | २०२१-२०२२ | १ | ३ | १०० |
| | | २०२२-२०२३ | १ | ३ | १०० |
| | | २०२३-२०२४ | १ | ३ | १०० |
| | | २०२४-२०२५ | १ | ३ | १०० |
| | | २०२५-२०२६ | १ | ३ | १०० |
| | | २०२६-२०२७ | १ | ३ | १०० |

**५. बाल मार्गदर्शन चिकित्सा केंद्र**

सर्वसाधारण शारीरिक वा मानसिक वर्तनापेक्षा वेगळ्या प्रकाराने मुले वागू लागली तर त्यांना ताबडतोब कोठल्याही संस्थेत दाखल करण्याची गरज नाही. तर त्यास चिकित्सा केंद्रात मार्गदर्शनासाठी न्यावे व त्याच्या वर्तणुकीमागील समस्या समजावून घ्यावी. त्यामागे शारीरिक मानसिक व भावनात्मक कारण काय आहे हे समजू शकते. कारण घरगुती नात्यातील मुलांशी वागण्याबाबतचा असमतोल व बाह्य परिस्थितीचा पगडा या दोन कारणांमुळे प्रामुख्याने मुलांमध्ये समस्या निर्माण होतात.

या प्रश्नांचा अभ्यास या केंद्रात केला जातो. मानसोपचार-मानसिक समस्या, व्यक्ती चिकित्सा, सल्लामसलत इत्यादी विविध मार्गांनी मार्गदर्शन केले जाते. तसेच केंद्रांतील इतर कर्मचारीवर्गाबरोबरही मुलांचे प्रश्नासंबंधात चर्चा केली जाते.

ही केंद्रे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून काम करतात व मुलांच्या प्रश्नाच्या वेळी अभ्यास व चिकित्सा केल्यामुळेच त्यास संस्थेत अथवा दवाखान्यामध्ये जाण्याची वेळ येत नाही. सध्या महाराष्ट्रात १ स्वयंसेवी संस्था अशी केंद्रे चालवित आहे. या कार्यासाठी स्वयंसेवी संघटनांना वार्षिक रु. १०,००० सहाय्यक अनुदान म्हणून दिले जातात.

तक्ता क्रमांक २३

**बाल मार्गदर्शन केंद्र (चिकित्सालये)**

(रुपये हजारांत)

| अनुक्रमांक (१) | जिल्हा (२) | वर्ष (३) | चिकित्सा केंद्रे (४) | लाभार्थी (५) | अनुदान (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण | २०१७-२०१८ | २ | ७०० | १० |
| | | २०१८-२०१९ | २ | ७०० | २० |
| | | २०१९-२०२० | २ | ७०० | २० |
| | | २०२०-२०२१ | २ | ७०० | २० |
| | | २०२१-२०२२ | २ | ७०० | २० |
| | | २०२२-२०२३ | २ | ७०० | २० |
| | | २०२३-२०२४ | २ | ७०० | २० |
| | | २०२४-२०२५ | २ | ७०० | २० |
| | | २०२५-२०२६ | २ | ७०० | २० |
| | | २०२६-२०२७ | २ | ७०० | २० |

**४. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना :**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ सुधारित अधिनियम २०२१ कलम २ (१४) व महाराष्ट्र राज्याचे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम,२०१८ नुसार अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या ० ते १८ वयोगटातील मुलां-मुलींना संस्थेत दाखल करण्याऐवजी पर्यायी कुटुंब उपलब्ध देणे व संस्थेतील वातावरणाऐवजी कौटुंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास घडवून आणणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सदर योजना ही संस्थाबाह्य योजना असून या योजनेअंतर्गत ० ते १८ वयोगटातील मुलामुलींना थेट पर्यायी कुटुंबात संगोपनाकरिता ठेवता येते. अनाथ, निराधार, निराश्रित, बेघर, दुर्धर आजारी पालकांची मुले कैद्यांची मुले या योजनेचा लाभ घेतात. प्रत्यक्ष जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी अथवा स्वयंसेवी संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते हे गृहचौकशी करुन संबंधित बाल कल्याण समितीस अहवाल सादर करतात. त्या अहवालाच्या आधारे बाल कल्याण समितीकडून दाखल आदेश घेवून लाभार्थ्यांस जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे मार्फत बालसंगोपन या योजनेचा लाभ देण्यात येतो. सद्यस्थितीत राज्यामध्ये कोविड-१९ इ. कारणांमुळे पालक मृत पावल्याने अनाथ झालेल्या बालसंगोपन योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या वाढत आहे.

त्यामुळे एकाच कुटुंबातील दोन पेक्षा जास्त बालकांना लाभ देण्याबाबत, दोन पेक्षा जास्त बालके एकाच कुटुंबात संगोपनासाठी देण्याबाबत तसेच कार्यरत स्वयंसेवी लाभार्थी संख्या वाढ, नविन संस्थांना मान्यता व संस्था निवडीचे निकष, अनुदान वितरण पद्धती निश्चित करुन याबाबत यापूर्वीचे सर्व शासन निर्णय / परिपत्रक अधिक्रमित करुन शासननिर्णय दि. ३०.०५.२०२३ अन्वये सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सदर शासन निर्णयान्वये बालसंगोपन योजनेचे नाव बदलून **''क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना''** असे करण्यात आले आहे.

**बालसंगोपन योजनेसाठी पात्र लाभार्थी :**

१. अनाथ किंवा ज्यांच्या पालकांचा पत्ता लागत नाही व जी बालके दत्तक देणे शक्य नाही अशी बालके

२. एक पालक असलेली बालके, (एका पालकाचा मृत्यू, घटस्फोट, पालक विभक्ती करण, परित्याग, अविवाहित मातृत्व, गंभीर आजार, पालक रुग्णालयात असणे इ. कारणांमुळे कुटुंब विघटीत झालेली, एक पालक असलेली बालके )
३. कुटुंबातील तणाव / तंटे / वादविवाद / न्यायालयीन वाद अशा सारख्या कौटुंबिक संकटात बाधित बालके (Family Crisis)
४. कुष्ठरुग्ण पालकांची बालके, जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची बालके, तुरुंगात असलेल्या पालकांची बालके, एच.आय. व्ही. ग्रस्त पालकांची बालके, कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराने बाधित पालकांची बालके.
५. तीव्र मतीमंद बालके, एच.आय.व्ही. ग्रस्त किंवा कॅन्सरग्रस्त बालके ४०% पेक्षा अधिक अपंगत्व असलेली, अंध, दिव्यांग बालके, भिक्षा मागणारी बालके, पोक्सो अधिनियमांतर्गत बळी पडलेली बालके , तीव्र कुपोषित बालके, सॅमबालके, दुर्धर आजार असलेली बालके, व्यसनाधिन बालके, विविध प्रकारच्या दंगलीनी प्रभावित झालेली बालके, कोविड सारख्या रोगाच्या प्रादुर्भावाने दोन्ही / एक पालक गमावलेली बालके, नैसर्गिक आपत्तीमध्ये दोन्ही / एक पालक गमावलेली बालके , बालविवाहाला बळी पडू शकणारी बालके, विधी संघर्षग्रस्त बालके.
६. दोन्ही पालक दिव्यांग असलेली बालके.
७. रस्त्यावर राहणारी, शाळेत न जाणारी, बालकामगार बालके.
८. कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात गुंतलेल्या पालकांची बालके.
९. ''भिक्षेकरी गृहात'' दाखल पालकांची बालके (याबाबत भिक्षेकरी गृहाच्या अधिक्षक यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.)

**बालसंगोपन योजनेअंतर्गत मिळणारा लाभ :**

शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.बालसं-२०२१/प्र.क्र.७६/का-८, दिनांक १७.०२.२०२३ अन्वये बालसंगोपन योजना अंतर्गत प्रती बाल दरमहा देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात अनुक्रमे रु.११००/- वरुन रु.२२५०/- व स्वयंसेवी संस्थेच्या सहायक अनुदानात रु.१२५/- वरुन रु.२५०/- अशी वाढ करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानातून बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, वैद्यकीय सुविधा इ. सुविधा संबंधित कुटुंबांमार्फत पुरविण्यात येतात. बालसंगोपन योजनेसाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून नवीन लेखाशिर्ष (२२३५-बी-९०६) प्राप्त करण्यात आले आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी स्तरावरील लाभार्थी व शासनाने मान्यता दिलेल्या स्वयंसेवी संस्थांनी लाभार्थ्यांची गृह चौकशी करुन प्रत्येक लाभार्थ्यांचे प्रकरणासंबंधीची संपूर्ण नस्ती, लाभार्थीची यादी अध्यक्ष/सदस्य बालकल्याण समिती यांना सादर करावयाची आहे.

बालकल्याण समितीने जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांना व संस्था स्तरावरील लाभार्थ्यांना दाखल आदेश द्यावयाचे आहेत

शासन निर्णय दि. १३-०२-२०२४ व दि. १२-०६-२०२४ नुसार (शासन परिपत्रक दि. ०३-०१-२०१७ नुसार) बालसंगोपन योजनेचा निधी थेट लाभार्थ्यांचे खात्यामध्ये रक्कम जमा करणेबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे. तसेच कोरोना-१९ च्या संसर्गामुळे अनाथ झालेल्या बालकांना सुध्दा बालसंगोपन योजनेचा लाभ देण्याबाबत सूचना असल्यामुळे लाभार्थी संख्येत वाढ झालेली आहे. बालसंगोपन योजनेचा निधी DBT (Direct Benifit Transfer) या पद्धतीद्वारे लाभार्थी यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येतो.

तक्ता क्रमांक २४

**बालगृहे व जोपासना (फोस्टर केअर)**

(रुपये हजारांत)

| अनुक्रमांक (१) | जिल्हा (२) | वर्ष (३) | मुले सांभाळणाऱ्या कुटुंबांची संख्या (४) | अनुदान (५) |
|---|---|---|---|---|
| | एकूण | २०१७-२०१८ | १७,८४६ | ७४,७५१ |
| | | २०१८-२०१९ | १६,१९५ | २,३६,१२३ |
| | | २०१९-२०२० | १४,६९० | २८,७८३ |
| | | २०२०-२०२१ | १२,९६१ | ७६५९० |
| | | २०२१-२०२२ | १२,९६१ | ४८३४२८ |
| | | २०२२-२०२३ | ३८६४१ | ७२६८८६ |
| | | २०२३-२०२४ | ५४७१७ | १९०९७४३ |
| | | २०२४-२०२५ | ८०२२४ | २०१४६३३ |
| | | २०२५-२०२६ | १४५०९३ | - |
| | | २०२६-२०२७ | १४५०९३ | - |

**५. अनुरक्षणगृहे (शासकीय/स्वयंसेवी)** After Care Hostels

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदीनुसार अनुरक्षणगृह ही योजना कार्यान्वित आहे. विशेष गृह/बालगृहांमधील १८ वर्षे पूर्ण झालेल्या मुला-मुलींचा वास्तव्यकाल संपल्यानंतर संस्थांमधून बाहेर पडताना ज्या मुलांच्या पुनर्वसनाची योग्य व्यवस्था झालेली नाही, अशा मुलांना त्यांचे अपुरे राहीलेले शिक्षण/प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी तसेच, नोकरी किंवा व्यवसाय मिळेपर्यंत ३ वर्षांच्या कालावधीसाठी अनुरक्षणगृहांमध्ये प्रवेश दिला जातो.

अनुरक्षणगृहांमध्ये दाखल होणाऱ्या प्रवेशितांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, प्रशिक्षण व इतर सुविधा पुरविल्या जातात व त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जातात. याकरिता या स्वयंसेवी संस्थांना दरमहा दरडोई रु. २,०००/- सहाय्यक अनुदान दिले जाते. शासनाने अनुरक्षणगृहासाठी कर्मचारी पदांचा आकृतिबंध मंजूर केला आहे.

शासकीय ६ अनुरक्षणगृह असून, मंजूर संख्या ६०० व स्वयंसेवी १ अनुरक्षणगृहे असून त्यांची मान्य संख्या १०० आहे.

**६. अनाथ प्रवर्गातील मुला-मुलींना शिक्षण व परिक्षा शुल्क १०० टक्के मंजुर करणे बाबत**

महिला व बाल विकास विभागांमार्फत अनाथ बालकांना राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापिठे, शासकीय अभिमत विद्यापिठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयंम अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यता प्राप्त व्यावसायीक अभ्यासक्रमास, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे (व्यवस्थापन कोट्यातील व संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनाथ बालकांना नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) अनाथ बालकांना शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क यामध्ये सन २०२४-२५ या वित्तीय वर्षापासून १०० टक्के लाभ देण्यास शासन निर्णय क्र.अनाथ-२०२४/प्र.क्र.१३/ का-०३ दिनांक १७ जुलै, २०२५ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासन पत्र क्र. अनाथ-२०२५/ प्र.क्र.१८४/ का-०३,दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५ अन्वये २२२३५ डी ८६५ (३१-सहायक अनुदाने, वेतनेत्तर) हा नविन लेखाशिर्ष सन २०२५-२६ पासून कार्यान्वीत करण्यात आलेला आहे.

**सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी अटी व शर्ती :-**

१. संबंधित बालकांकडे विभागाने निर्गमित केलेले अनाथ प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे.
२. संबंधित बालकांकडे राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक.
३. सदर योजनेचा लाभ दुरस्थ अथवा अर्धवेळ चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाला लागू नाही.
४. योजनेचा लाभ अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यत लागू राहील, मात्र बालकाने मध्येच काही कारणास्तव शिक्षण सोडून दिल्यास लाभ बंद होईल.
५. शैक्षणिक संस्थेकडून चुकीची माहिती प्राप्त झाल्यास अदा केलेली संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करण्यात येईल
६. योजनेचे समन्वयक अधिकारी व अंमलबजावणी अधिकारी, आयुक्त, महिला व बाल विकास राहतील.
७. अनाथ बालकांना सामाजिक प्रवर्ग शिष्यवृत्ती अथवा अनाथ आरक्षणांतर्गत शुल्क या दोन्ही योजनेचा लाभ एकाच वेळी घेता येणार नाही.
८. शासनाकडून सदरचे शुल्क भरणा करण्यास विलंब झाल्यास लाभार्थी बालकाला शिक्षण अथवा परिक्षा देण्यापासून वंचित ठेवता येणार नाही.
९. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी बालकाच्या कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न ८.०० लक्ष पेक्षा कमी असावे.

**मिशन वात्सल्य : (Mission Vatsalya)**

केंद्र शासनाचे सन २००९-१० पासून एकात्मिक बाल संरक्षण योजना (ICPS) योजना सुरु करण्यात आली होती. सदर योजनेचे नाव "Child Protection Services" असे सन २०१७-२०१८ मध्ये बदलण्यात आले असून आता ही योजना सन २०२१-२२ या आर्थिक वर्षापासून ''मिशन वात्सल्य'' या योजनेअंतर्गत वर्ग करण्यात आली आहे. केंद्र शासनाने दि. ०५ जुलै,२०२२ च्या पत्रान्वये मिशन वात्सल्य या केंद्र पुरस्कृत योजनेच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून सदर मार्गदर्शक सूचना सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून राज्यात लागू करण्यात येत आहेत. तत्पूर्वी कार्यरत बालन्याय कार्यक्रम, रस्त्यावरील मुलांसाठी एकात्मिक योजना व शिशुगृह -

दत्तक योजना या योजनांचे एकत्रिकरण करण्यात येऊन ही योजना सुरु करण्यात आली आहे. यापैकी बालन्याय कार्यक्रमाचा केंद्र व राज्य हिस्सा ५० : ५० होता यासाठीचा केंद्र हिस्सा राज्य शासनाला वितरीत करण्यात येत होता. तर रस्त्यावरील मुलांसाठी एकात्मिक योजना व शिशुगृह दत्तक योजनेचा केंद्राचा हिस्सा थेट संबंधित संस्थांना केंद्राकडून वितरीत करण्यात येत होता. एकात्मिक बाल संरक्षण योजना (ICPS) राबविण्याबाबत केंद्र शासनाबरोबर दिनांक १३ ऑगस्ट, २०१० रोजी सामंजस्य करार (Mou) करण्यात येऊन सदर योजना राज्यात राबविण्यात येत आहे. सन २०१४-१५ पासून सदर योजनेच्या आर्थिक निकषात वाढ करण्यात आलेली असून सन २०१४-२०१५ पासून योजनेचा केंद्र व राज्य हिस्सा ७५ : २५ वरुन ६० : ४० असा बदल करण्यात आलेला आहे.

राज्यातील बालसंरक्षणाशी संबंधित कार्यान्वयीत यंत्रणा व योजनेची गुणवत्ता वाढविणे आणि त्या अधिक बळकट करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत महाराष्ट्र राज्य बालसंरक्षण सोसायटी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, राज्य दत्तक स्त्रोत संस्था (सारा), खुले निवारा गृह, विशेष दत्तक संस्था, बालगृह, निरीक्षण गृह, विशेष गृह, बालकल्याण समिती, बाल न्याय मंडळ इ. यंत्रणांना आर्थिक सहाय्य सदर योजनेच्या तरतूदींमधून करण्यात येते.

बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या अनुषंगाने विधी संघर्ष ग्रस्त बालके व काळजी व संरक्षणची गरज असलेली बालके यांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, प्रशिक्षण यासारख्या मुलभूत सुविधा पुरविण्यात येऊन त्यांचे समाजात पुनर्वसन व पुर्नस्थापना करण्यासाठी सदर योजना सहाय्यभूत आहे.

सदर योजनेअंतर्गत बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या तरतुदीच्या अनुषंगाने कार्यरत संस्था/यंत्रणा यांचेसाठी तरतूद आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी व जिल्हा बाल संरक्षण कक्ष कलम १०६, राज्य दत्तक स्त्रोत संस्था कलम ६७ (खुले निवारा गृह) कलम ४३, विशेष दत्तक स्त्रोत संस्था कलम ६५, बालगृह कलम ५०, (निरीक्षण गृह) कलम ४७, बालकल्याण समिती कलम २७ व बालन्याय मंडळ कलम ४ यांचा समावेश आहे.

या यंत्रणांसाठी कर्मचारी वर्ग, प्रशासकीय खर्च तसेच इतर आवश्यक खर्च यासाठी सदर योजनेत तरतूद आहे. संस्थेत दाखल होणाऱ्या प्रवेशितांसाठी परिपोषण अनुदानासाठी तरतूद देण्यात येते. याशिवाय या योजनेअंतर्गत FOSTER CARE -( प्रतिपालकत्व योजना) SPONCERSHIP (प्रायोजकत्व) AFTER CARE FUND (अनुरक्षण सेवा) यासारख्या संस्था बाह्य (NON INSTITUTIONAL) योजनांसाठी निधीची तरतूद आहे. महाराष्ट्र राज्य बालसंरक्षण संस्था, (MAHARASHTRA STATE CHILD PROTECT SOCIETY-MSCPS) जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DISTRICT CHILD PROCTECTION UNIT-DCPU) यांची स्थापना करणे आवश्यक असल्याने दि. ३०-७-२०११ व दि. १५-५-२०१२ रोजीच्या शासन निर्णयांन्वये MSCPS व DCPU ची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी, ही संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था आहे.

दिनांक १५ मे २०१२ च्या शासननिर्णयानुसार महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटीचे प्रधान सचिव, महिला व बालविकास हे अध्यक्ष असून व उपसचिव, महिला व बालविकास हे उपाध्यक्ष असून १) अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग २) अप्पर मुख्य सचिव शालेय शिक्षण विभाग ३) अप्पर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग ४) प्रधान सचिव, नियोजन विभाग ५) प्रधान सचिव, वित्त विभाग ६) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग ७) सचिव (कामगार), उद्योग, उर्जा व कामगार विभाग ८) सचिव सामाजिक न्याय विभाग हे सभासद असून ९) आयुक्त महिला व बाल विकास पुणे हे सदस्य सचिव आहेत.

जिल्हा बाल संरक्षण कक्ष प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करण्यात आले असून या संस्थेचे सभासद खालीलप्रमाणे आहेत. जिल्हाधिकारी अध्यक्ष असून जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सदस्य सचिव आहेत. तर सभासदांमध्ये (१) जिल्हा बाल संरक्षण अधिकारी (२) पोलिस अधीक्षक (३) जिल्हा आरोग्य अधिकारी (४) जिल्हा कामगार अधिकारी (५) जिल्हा तंत्रशिक्षण अधिकारी (६) जिल्हा समाज कल्याण अधिकारी (७) जिल्हा शिक्षण अधिकारी (८) चाईल्ड लाईन या संस्थेचा प्रतिनिधी (९) जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा प्रतिनिधी यांचा समावेश आहे. सदर योजनेचा केंद्र शासनाचा हिस्सा राज्यांना देण्यात येणार असून राज्यांनी त्यांचा हिस्सा व केंद्र शासनाचा हिस्सा महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी (MSCPS) च्या Nodal Account बँक खात्यामध्ये जमा करावयाचा आहे. सदर सोसायटीमार्फत योजनेत समाविष्ठ संस्था/घटक यांना निधीचे वितरण PFMS प्रणालीद्वारे करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र. ICPS -२०१८/प्र. क्र. १७५/का-८ दिनांक २६ जून २०१८ व महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग प्रत्र क्र.ICPS-२०१८/प्र. क्र. १७५/का-८ दिनांक ९ ऑक्टोबर २०१८ अन्वये नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त महिला व बालविकास आयुक्तालय पुणे यांनी उद्दिष्ट निहाय वितरित करण्यात आलेला निधी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी तथा आयुक्त महिला व बालविकास यांनी खालील आहरण व संवितरण अधिकारी यांना योजनेच्या निकषानुसार अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर निधी वितरित करावयाचा आहे.

| अ.क्र. | योजनेतील समाविष्ट संस्था | आहरण व संवितरण अधिकारी |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था | आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, लेखाअधिकारी, आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे. |
| २. | राज्य दत्तक स्त्रोत संस्था (सारा) | |
| ३. | स्टेट चाईल्ड हेल्पलाईन | |
| ४. | जिल्हा बाल संरक्षण कक्ष, संबंधित जिल्ह्यातील बालकल्याण समिती, बाल न्याय मंडळ | संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी. |
| ५. | शासकीय निरीक्षण गृह / बालगृह संस्था | संबंधित संस्थेचे अधिक्षक |

तक्ता क्रमांक २५

मागील तीन वर्षात योजनेचा झालेला खर्च

| **वित्तीय वर्ष** | **खर्च (रुपये लक्ष)** |
|---|---|
| २०२२-२०२३ | ३८२४.६० |
| २०२३-२०२४ | ३०५१९.८४ |
| २०२४-२०२५ | २७२२८.१३ |

**मिशन वात्सल्य -** एकात्मिक बालसंरक्षण योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था सन २०२६-२०२७

(रुपये हजारांत)

| लेखाशिर्ष | प्रत्यक्ष खर्च २०२४-२५ | अर्थसंकल्पिय अंदाज २०२५-२६ | सुधारित अंदाज २०२५-२६ | अर्थसंकल्पिय अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|
| (१६)(०१)एकात्मिक बाल संरक्षण योजना शासकीय संस्था वेतन / परिपोषण (२२३५-सी००९) केंद्र हिस्सा ६०% | ३१२९०७ | ४६९९३० | ४६९९३० | ४६९९३० |
| (१६)(०२)एकात्मिक बाल संरक्षण योजना शासकीय संस्था वेतन/ परिपोषण (२२३५-सी०१८) राज्य हिस्सा ४०% | १९६८६४ | २१६२४४ | २१६२४४ | २१६२४४ |
| (००)(०२) एकात्मिक बाल संरक्षण योजना अशासकीय संस्था मानधन/ परिपोषण/जिल्हा बाल संरक्षण कक्ष (२२३५-सी०२७) केंद्र हिस्सा ६०% | ३४७२११ | ६४४३४१ | ६४४३४१ | ६४४३४१ |
| (००) (०३) एकात्मिक बाल संरक्षण योजना अशासकीय संस्था मानधन/ परिपोषण/ जिल्हा बाल संरक्षण कक्ष (२२३५-सी०३६) राज्य हिस्सा ४०% | २२४०४७ | ४२९६४१ | ४२९६४१ | ४२९६४१ |
| (१८)(०१) बाल न्याय निधी योजना (कार्यक्रम) (२२३५-सी ४६६)३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) | ० | १०००० | ७००० | ५००० |
| (१९)(०१) कोविड १९ कालावधीत अनाथ झालेल्या बालकांसाठी अर्थसहाय्य योजना (कार्यक्रम)(२२३५-सी ५०१) ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) | ६५०० | २००० | १४०० | १ |
| (२०)(०१) संस्थाबाह्य काळजी प्रायोजकत्व प्रतिपालकत्व अनुरक्षण (कार्यक्रम)(२२३५-डी ४०८) केंद्र हिस्सा ६०% | ९३६५७६ | ७५०००० | ७५०००० | ७५०००० |
| (२०)(०२) संस्थाबाह्य काळजी प्रायोजकत्व प्रतिपालकत्व अनुरक्षण (कार्यक्रम)(२२३५-डी ४१७) राज्य हिस्सा ४०% | ६२४३८४ | ५००००० | ५००००० | ५००००० |

**मिशन वात्सल्य -** एकात्मिक बालसंरक्षण योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था सन २०२६-२०२७

(रुपये हजारांत)

| लेखाशिर्ष | प्रत्यक्ष खर्च २०२४-२५ | अर्थसंकल्पिय अंदाज २०२५-२६ | सुधारित अंदाज २०२५-२६ | अर्थसंकल्पिय अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|---|
| (२०)(३) भांडवली मत्तेची निर्मिती बालकांची काळजी व संरक्षण संबंधित संस्था (सीसीआय) तसेच बालकल्याण संस्था (सीडब्ल्युसी) व बाल न्याय मंडळाचे बांधकाम (जेजेबी) बांधकाम (२२३५-सी ४२६) केंद्र हिस्सा ६०% | ० | ३०००० | ३०००० | ३०००० |
| (२०)(४) भांडवली मत्तेची निर्मिती बालकांची काळजी व संरक्षण संबंधित संस्था (सीसीआय) तसेच बालकल्याण संस्था (सीडब्ल्युसी) व बाल न्याय मंडळाचे बांधकाम (जेजेबी) बांधकाम (२२३५-सी ४३५) राज्य हिस्सा ४०% | ० | २०००० | २०००० | २०००० |
| (२०)(०५) स्वच्छता ॲक्शन प्लॅन (एसएपी) (२२३५-डी ४४४) केंद्र हिस्सा ६०% | ४२०० | १२००० | १२००० | १२००० |
| (२०)(०६) स्वच्छता ॲक्शन प्लॅन (एसएपी) (२२३५-डी ४५३) राज्य हिस्सा ४०% | २८०० | ८००० | ८००० | ८००० |
| (२०)(०७) चाईल्ड हेल्पलाईन (२२३५-डी ४६२) केंद्र हिस्सा १००% | ६७३२४ | १३७३४० | १३७३४० | १३७३४० |
| (२१) (०१) रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुर्नवसनासाठी फिरते पथक (२२३५ डी ८५६) राज्य हिस्सा १००% | ० | ० | २६८७७ | ८०००० |
| एकुण | २७२२८१३ | ३२२९४९६ | ३२५२७७३ | ३३०२४९७ |

**मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था अंतर्गत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची माहिती खालीलप्रमाणे**
**महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्थेतील कर्मचारी खालीलप्रमाणे** (SCPS)

(आकडे रुपयात)

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण मंजूर पदे | एका महिन्याचे एका पदाचे मानधन |
|---|---|---|---|
| १. | कार्यक्रम व्यवस्थापक | २ | ४६३४० |
| २. | कार्यक्रम अधिकारी | ४ | ३४७५५ |
| ३. | लेखा अधिकारी | १ | २३१७० |
| ४. | लेखापाल | १ | १८५३६ |
| ५. | डेटा एंट्री ऑपरेटर | ४ | १३२४० |
| ६. | लेखा सहायक | १ | १०००० |

**राज्य दत्तक स्त्रोत संस्था (SARA)**

(आकडे रुपयात)

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण मंजूर पदे | एका महिन्याचे एका पदाचे मानधन |
|---|---|---|---|
| १. | कार्यक्रम व्यवस्थापक | १ | ४६३४० |
| २. | कार्यक्रम अधिकारी | २ | ३४७५५ |
| ३. | कार्यक्रम सहायक | १ | १३२४० |

### जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DCPU)

(आकडे रुपयात)

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण मंजूर पदे | एका महिन्याचे एका पदाचे मानधन |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा बाल संरक्षण अधिकारी | १ | ४४०२३ |
| २. | बाल संरक्षण कार्यक्रम अधिकारी, संस्थात्मक | १ | २७८०४ |
| ३. | बाल संरक्षण कार्यक्रम अधिकारी, संस्थाबाह्य | ० | २७८०४ |
| ४. | विधी तथा परिविक्षा अधिकारी | १ | २७८०४ |
| ५. | समुपदेशक | १ | १८५३६ |
| ६. | सामाजिक कार्यकर्ता | २ | १८५३६ |
| ७. | लेखापाल | १ | १८५३६ |
| ८. | माहिती विश्लेषक | १ | १८५३६ |
| ९. | बाह्य क्षेत्रीय कार्यकर्ता | २ | १०५९२ |
| १०. | डेटा एंट्री ऑपरेटर | १ | १३२४० |

१. मिशन वात्सल्य योजनेच्या ५ जुलै, २०२२ रोजीच्या मार्गदर्शीकि नुसार जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DCPU) मध्ये ४९२ पदे मंजूर आहेत.

२. केंद्र शासनाने प्रकल्प मंजुर समिती (PAB) २०२२-२३ मुद्दा क्र. ३ (i) मध्ये मुंबई उपनगर, ठाणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि अमरावती या जिल्ह्यामध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DCPU) साठी (एक) संरक्षण अधिकारी संस्थात्मक, एक संरक्षण अधिकारी संस्थाबाह्य, एक विधी तथा परिविक्षा अधिकारी, एक सामाजिक कार्यकर्ता आणि प्रत्येकी तीन क्षेत्रीय कार्यकर्ता असे एकूण ४९ पदांना मान्यता दिली आहे.

३. केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजुर समिती (PAB) २०२४-२५ मध्ये विशेष बाल पोलीस पथक (SJPU) अतिरिक्त सामाजिक कार्यकर्ते व विशेष बाल पोलीस पथक (SJPU) साठी ९८ पदांना मंजुरी दिली आहे.

४. केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजुर समिती (PAB) २०२४-२५ मध्ये सर्व ३६ जिल्ह्यांकरीता जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DCPU) मध्ये अतिरीक्त संरक्षण अधिकारी संस्थाबाह्य पदाला मान्यता दिली आहे. असे एकूण बाल संरक्षण कक्षात ६१५ पदे भरण्यास मान्यता आहे.

### बाल कल्याण समिती (CWC)

बाल न्याय मंडळ बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ चे कलम २७ सुधारित अधिनियम २०२१ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८, केंद्र शासन सुधारित नियम २०२२ मध्ये बाल कल्याण समिती गठित करण्याची तसेच समितीची रचना याबाबतची तरतूद आहे. महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ च्या नियम ९१ च्या अधिन राहून बाल कल्याण समिती सदस्याची नेमणूक केली जाते.

महाराष्ट्र राज्यात एकूण ३९ बाल कल्याण समित्या मंजूर आहेत. त्यानुसार ३६ जिल्ह्यामध्ये ३६ बाल कल्याण समित्या कार्यरत आहेत तसेच पुणे, मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यात प्रत्येकी दोन बाल कल्याण समित्या कार्यरत आहेत.

(आकडे रुपयात)

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण मंजूर पदे | एका महिन्याचे एका पदाचे मानधन |
|---|---|---|---|
| १ | डेटा एंट्री ऑपरेटर | ३९ | ११९१६ |

### बाल न्याय मंडळ (JJB)

बाल न्याय मंडळ बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ चे कलम ४ तसेच सुधारित अधिनियम २०२१ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ सुधारीत अधिसूचना नियम, २०२०, केंद्रशासन सुधारित नियम २०२२ मध्ये बाल न्याय मंडळ गठित करण्याची तसेच मंडळाची रचना याबाबतची तरतूद आहे. महाराष्ट्र राज्य बाल न्याय

(मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ च्या नियम ९१ च्या अधिन राहून बाल न्याय मंडळ, सदस्याची नेमणूक केली जाते.

महाराष्ट्र राज्यात एकूण ३८ बाल न्याय मंडळ मंजूर आहेत त्यापैकी ३६ कार्यरत आहेत. पुणे जिल्ह्यामध्ये दोन बाल न्याय मंडळ कार्यरत आहेत.

(आकडे रुपयात)

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण मंजूर पदे | एका महिन्याचे एका पदाचे मानधन |
|---|---|---|---|
| १ | डेटा एंट्री ऑपरेटर | ३८ | ११९१६ |

**महाराष्ट्र राज्य बाल न्याय निधीबाबत टिप्पणी**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम १०५ मध्ये राज्य शासन, या अधिनियमान्वये कारवाई करण्यात येणाऱ्या बालकांच्या हितासाठी आणि पुनर्वसनासाठी आवश्यक असलेल्या योग्य त्या निधीची तजवीज करील असे नमूद करण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ च्या नियम ८५ मधील तरतुदीनुसार राज्य बाल निधी स्थापन केला असून त्यातील तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत.

(१) सदर अधिनियम व नियमांशी संबंधित असलेल्या मुलांचे कल्याण व पुनर्वसन यांकरिता.

(२) राज्य शासन राज्य बाल निधी करिता पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करील.

(३) राज्य बाल निधीस सामूहिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत देणग्या, ऐच्छिक अंशदाने, वर्गण्या किंवा निधी स्विकारता येईल, मग ते कोणत्याही विनिर्दिष्ट प्रयोजनाकरिता असेल किंवा नसेल, आणि तशी रक्कम राज्य बाल निधीत थेट जमा केली जाईल.

(४) निधीचा उपयोग पुढील प्रयोजनांकरिता केला जाईल.

(एक) मुलांचे कल्याण व पुनर्वसन यांकरिता आणि जे कार्यक्रम कोणत्याही केंद्र सरकारी किंवा राज्य शासकीय किंवा कोणत्याही इतर योजनेत समाविष्ट असत नाहीत अशा कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे.

(दोन) बालकांच्या मोठ्या आजारांकरिता वैद्यकीय सहाय्य किंवा शस्त्रक्रिया यांसाठी तरतूद करणे.

(तीन) उद्योजकता विषयक सहाय्य, कौशल्य विकास प्रशिक्षण किंवा व्यवसाय प्रशिक्षण यासाठी तरतूद करणे.

(चार) या अधिनियमान्वये समावेश असलेल्या मुलांकरिता विशेष व्यावसायिक सेवा, समुपदेशक, अनुवादक, दुभाषी, विशेष शिक्षक, समाज सेवक, मानसिक आरोग्य सेवक, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षक यांची तरतूद करणे.

(पाच) कर्करोगग्रस्त मुलांकरिता दोष परिहारक संगोपन आणि त्यांच्या माता पित्यांसाठी वास्तव्य सुविधा;

(सहा) सदर अधिनियम व नियमांतर्गत समावेश असलेल्या मुलांची सर्वंकष वाढ, विकास व कल्याणाकरिता सहाय्य भूत होण्यासाठी कोणताही इतर कार्यक्रम किंवा उपक्रम.

(सात) बालकांसाठी कार्यरत संस्थांतील मुलांच्या कल्याणासाठी असलेल्या नाविन्यपूर्ण कार्यक्रमांना सहाय्य करणे.

(आठ) वरील प्रयोजनांकरीता आनुषंगिक व उपयुक्त असलेल्या इतर सर्व गोष्टी करणे.

**बाल न्याय निधी व्यवस्थापन मंडळ गठीत करण्याबाबतची सद्यस्थिती**

निधीच्या व्यवस्थापन व प्रशासन यांसाठी या अधिनियमाच्या कलम १०५ च्या पोटकलम (३) अन्वये, सचिव, महिला व बाल विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन मंडळाची स्थापना करण्याबाबत तरतुद आहे. त्यानूसार मंडळाची रचना पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

१. सचिव (महिला व बाल विकास विभाग)- अध्यक्ष
२. आयुक्त (महिला व बाल विकास विभाग)- सदस्य
३. अध्यक्षांकडून नियुक्त करण्यात येणारे दोन समाज सेवक सदस्य
४. उपआयुक्त, बाल विकास - सदस्य सचिव नि. कोषाध्यक्ष

उपरोक्त तरतुदीनूसार शासनाने शासन निर्णय दिनांक २२ जुलै, २०१९ नूसार बाल न्याय निधीचे व्यवस्थापन व प्रशासनासाठी व्यवस्थापन मंडळ गठीत केले आहे. तसेच सदर मंडळावर दोन समाजसेवक सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली असून सदर सदस्यांचा कार्यकाल शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३ वर्षाचा किंवा पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहील.

**७. बालकांसाठी चाचा नेहरू बाल महोत्सव.**

राज्यातील सर्व मुले व प्राधान्याने बाल कल्याण क्षेत्रात कार्यरत असलेल्या शासकीय / स्वयंसेवी संस्थांमध्ये पुनर्वसनासाठी दाखल झालेल्या अनाथ, निराधार, उन्मार्गी मुलांमधील सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्यात एकमेकांविषयी बंधुभाव. सांघिक भावना निर्माण होण्यासाठी दरवर्षी ३५ जिल्ह्यांमध्ये, ६ विभागीय स्तरावर प्रत्येक नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात चाचा नेहरू बाल महोत्सव आयोजित करण्यास शासन निर्णय क्र. बालगृ-२०१२/प्र. क्र. १६४/का-३, दिनांक ४ डिसेंबर २०१२ व शासन निर्णय क्र. बामवा-२०१३/प्र. क्र. २६१/का-३, दिनांक २ नोव्हेंबर २०१३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर बाल महोत्सवात विविध प्रकारचे खेळ, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करून स्पर्धा विजेत्यांना ढाल, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र या स्वरूपात पारितोषिके देण्यात येतात. सदर महोत्सवाकरिता जिल्हास्तराकरिता रु. ५,००,००० व विभागीय स्तराकरिता रु. ५,८२,५००/- इतका निधी चाचा नेहरु बालमहोत्सव (२२३५-B-३२५) या लेखाशिर्षातून वितरित करण्यात येते. यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात विभागांतर्गत संस्थामधील व समाजातील किमान १,००० मुले सहभागी होतात.

**८. कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबन पुनर्वसन योजना.**

महिला व बाल विकास विभागांतर्गत सद्यःस्थितीत कार्यरत असलेल्या ६ शासकीय व ३ स्वयंसेवी अशा एकूण ९ अनुरक्षण-गृहांमधील १८ वर्षे पूर्ण होत असलेल्या व पूर्ण झालेल्या प्रवेशितांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबी पुनर्वसन ही योजना स्वयंसेवी संस्थामार्फत राबविण्याबाबत शासन निर्णय क्र. क्रमशि-२०११/प्र. क्र. ३३९/का-३, दिनांक २७ ऑगस्ट २०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबी पुनर्वसन योजनेमध्ये सदर प्रशिक्षणार्थींची अनुरक्षणगृहामध्ये निवासाची व परिपोषणाची सुविधा शासना-मार्फत करण्यात येते. तथापि त्या व्यतिरिक्त व्यवसाय प्रशिक्षणासाठी प्रवेशितांचा जाण्या-येण्याचा खर्च, व्यवसाय प्रशिक्षण साहित्याचा खर्च, पाठ्यपुस्तके, परीक्षा फी, नोंदणी फी हा सर्व खर्च संबंधित व्यवसाय प्रशिक्षण संस्था करणार आहे. सदर योजनेकरिता शासनाकडून कोणतेही अतिरिक्त अनुदान अनुज्ञेय होणार नाही. या योजनेखाली १५० मुलांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

**९. महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्डास सहाय्यक अनुदाने (२२३५-बी-९४२)**

शासन निर्णय क्र. सकबो-२०१६/प्र. क्र. ६३/का-१०, दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य समाज कल्याण बोर्डाच्या वेतन व वेतनेत्तर बाबीसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यानुसार बोर्ड आस्थापना सेवानिवृत्त कर्मचारी २२ आणि योजना सेवानिवृत्त कर्मचारी ३२६ यांच्या सेवानिवृत्ती उपदानासाठी (३१-वेतनेत्तर) बाबीवर १२,८४,८५ हजार आणि महाराष्ट्र राज्य समाज कल्याण/बोर्ड आस्थापनेवरील १९ कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी (३६-वेतन) या बाबीवर १,८४,०० हजार अशी एकूण १४,६८,८५ हजार एवढी तरतूद सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी प्रस्तावित करण्यात आली आहे.

**रस्त्यावरील मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे पुर्नवसन करण्याच्या दृष्टीने सर्वकष योजना म्हणून ''फिरते पथक '' ही योजना राबविणे बाबत.**

महिला व बाल विकास विभागामार्फत रस्त्यावरील मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे पुर्नवसन करण्याच्या दृष्टीने सर्वकष योजना म्हणून ''फिरते पथक '' ही योजना राबविण्यास क्रमांक-बालके २०२५/प्र.क्र.०२/का.९ दि.१९/०६/२०२५ या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता २८ महानगरपालिक क्षेत्रात प्रत्येकी १ तसेच बृहन्मुंबई महानगपालिकेमध्ये मुंबई शहारासाठी १, मुंबई उपनगर (पूर्व) साठी १ व मुंबई उपनगर (पश्चिम) साठी १ याप्रमाणे एकूण ३१ ''फिरते पथक '' सुरु करण्यात येणार आहे.

राज्यात एकूण ३१ ''फिरते पथक '' सुरु करण्यात येणार आहे. ''फिरते पथक '' ही योजना राबविण्याकरीता इच्छुक संस्थाकडून अर्ज महिला व बाल विकास आयुक्तालय स्तरावरुन दि. ०७/०८/२०२५ रोजी राज्यातील प्रमुख ३ वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर संस्थाकडून अर्ज प्राप्त करुन घेवून संस्थाना मान्यता प्रदान केल्यानंतर संस्थाचे अनुदान व सदर योजनेच्या २% प्रशासकीय व जाहिरात प्रसिध्दी खर्च रक्कम रु. १५,८१,०००/- असे एकूण रक्कम रु. ८,०६,३१,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

त्यामुळे मागणी क्र. एक्स-०१ २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२- समाज कल्याण, १०२ - बाल कल्याण (२१) फिरते पथक, (२१)(०१) रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुर्नवसनासाठी ''फिरते पथक'' (कार्यक्रम) (२२३५ डी ८५६) या लेखाशिर्षाखाली

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सदर योजनेस मान्यता देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत प्राप्त प्रस्तावांची तपासणी करुन शासनास संस्था मान्यता साठी प्रस्ताव पाठविण्याची प्रक्रिया सुरु आहे. या पूर्वी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार सदर ३१ संस्थांच्या प्रस्तावांना १ डिसेंबर २०२५ पासून मान्यता मिळेल असे गृहीत धरुन डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ या चार महिन्यासाठी रक्कम रुपये २,६८,७७,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी अडुसष्ट लाख सत्याहत्तर हजार फक्त) एवढया रक्कमेचा सुधारित पुरक मागणी मंजूर झाली आहे.

**''फिरते पथक '' योजना राबविणे बाबत लाभार्थी**

१) कोणाचेही मदतीशिवाय रस्त्यावर अगदी एकटी राहणारी बालके.

२) जी बालके दिवसभर रस्त्यावर राहातात आणि रात्री जवळपासच्या वस्तीत/झोपडपट्टीत राहाणाऱ्या त्यांच्या कुटुंबामध्ये परततात.

३) आपल्या कुटुंबासोबत रस्त्यावर राहाणारी बालके.

**योजनेचे उद्देश**

सदर रस्त्यावरील मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे पुर्नवसन करण्याच्या दृष्टीने सर्वकष योजना म्हणून ''फिरते पथक'' ही योजना या उपक्रमाच्या माध्यमातून समुपदेशन करुन त्यांना त्यांच्या वयोगटानुसार अंगणवाडी, प्राथमिक शाळा यामध्ये दाखल करुन तसेच आवश्यकतेनुसार बालगृहामध्ये किंवा खुले निवारागृह येथे दाखल करुन रस्त्यावरील परिस्थितीतून त्यांची सोडवणूक करणे व औपचारिक शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणे. मुलांची वैद्यकीय तपासणी करुन आवश्यकतेनुसार योग्य ते वैद्यकीय उपचार करणे. व्यसनाधीनता, कुपोषण , शारीरिक व्यंग इ. समस्या असतील तर संबंधितांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे.

१) रस्त्यावरील मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे पुर्नवसन करण्याच्या दृष्टीने सर्वकष योजना म्हणून ''फिरते पथक'' ही योजना राज्यातील एकूण २२ जिल्ह्यातील ३१ महानगरपालिका क्षेत्रात शासनाने मान्यता देण्यात आलेल्या स्वयंसेवी संस्थेमार्फत (NGO) व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या समन्वयाने योजनेची अंमलबजावनी करण्यात येणार आहे.

२) महानगरपालिका क्षेत्रामध्ये निवड झालेल्या संस्थेने २५ मुलांची क्षमता असलेली एक बाल स्नेही बस / व्हॅन फिरते पथक म्हणून तयार करण्यात येणार आहे.

## केंद्र शासनाचे पुरस्कार

**१. राजीव गांधी मानव सेवा पुरस्कार (Rajeev Gandhi Manav Seva Puraskar) :**

सन १९७९ च्या आंतरराष्ट्रीय बाल दिनाच्या निमित्ताने सदर पुरस्काराची सुरुवात झाली आहे. मुलाच्या कल्याणासाठी विशेषतः शारीरिक व मानसिकदृष्ट्या अपंगत्व असलेल्या मुलांच्या कल्याणासाठी कोणत्याही प्रकारचे वेतन अथवा मानधन न घेता मानसेवी उदात्त भावनेतून सलग किमान १० वर्षे वैशिष्ट्यपूर्ण व अद्वितीय काम करणाऱ्या व्यक्तीस राजीव गांधी मानव सेवा पुरस्कार केंद्र शासनामार्फत दिला जातो.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी/आयुक्तालय/राज्य शासन यांच्या शिफारशीनुसार प्राप्त झालेल्या अर्जाची निवड करण्यासाठी राष्ट्रीय निवड समिती स्थापन करण्यात आली असून समितीने निवड केलेल्या व्यक्तिस पुरस्कार दिला जातो.

पुरस्काराचे स्वरुप रु. १०,००,०००/- रोख आणि प्रशस्तीपत्र असे असून दिल्ली येथे मा. मंत्री मानव संसाधन विकास मंत्रालय यांच्याकडून पुरस्कार वितरित करण्यात येतात. प्राप्त प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनास सादर करण्यात येतात.

**२. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार**

केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार दिला जातो. ज्या मुलांनी (वय ५ वर्षापेक्षा अधिक व १८ वर्षापर्यंतच्या) शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरी केलेली आहे, त्यांना हा पुरस्कार दिला जातो.

ज्या मुलांचे वय ५ वर्षापेक्षा अधिक व ३१ जुलै २०२५ रोजी १८ वर्षांपेक्षा कमी आहे व ज्या मुलांनी शिक्षण कला, सांस्कृतिक कार्य, खेळ नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौय अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरी केलेली आहे त्यांचे प्रस्ताव वरील संकेतस्थळावर स्वत: मुले किंवा त्यांचे वतीने राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश, जिल्हाधिकारी / जिल्हादंडाधिकारी, पंचायत राज्य संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था इ. अर्ज करू शकतात. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी नामांकने ०१ एप्रिलपासून सुरू होतील आणि दरवर्षी ३१ जुलैपर्यंत केव्हांही संकेततस्थळामार्फत अर्ज स्वीकारले जातील, विहित केलेल्या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार पुढील वर्षाच्या नामनिर्देशनासाठी केला जाईल. सदर संकेतस्थळावर कोणीही भारतीय नागरीक विशेष नैपुण्यबद्दल बालकांची शिफारस करु शकतात.

संकेतस्थळाबाबत विहित मुदतीत प्राप्त होणारे अर्ज राज्य, केंद्रशासित प्रदेश आणि जिल्हाधिकारी / जिल्हा न्यायाधिश इतर शासन / योग्य संस्था यांना पडताळणी करीता १५ ऑक्टोबर पर्यंत पाठविण्यात येतील. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, आयुक्तालय व राज्य शान यांच्या शिफारशीनुसार प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी समितीमार्फत फेरछाननी होऊस प्रस्ताव केंद्र शासनास सादर केले जातात. राष्ट्रीय स्तरावरील निवड समितीमार्फत पाच डिसेंबर पर्यंत त्यावर शिफारशी होऊन पुरस्कारासाठी निवड करण्यात येते.

सदरचा पुरस्कार हा दर वर्षी २६ डिसेंबर रोजी (वीर बाल दिवस) दिनाच्या आठवड्यामध्ये घोषित करण्यात येऊन, मा. मंत्री, मानव संसाधन विकास, मंत्रालय यांचेमार्फत वितरीत करण्यात येतो. दरवर्षी नवी दिल्ली येथे होणाऱ्या एका विशेष समारंभात / कार्यक्रमात भारताचे माननीय राष्ट्रपती हे पुरस्कार प्रदान करतील.

**पुरस्काराचे स्वरुप खालील प्रमाणे**

प्रत्येक पुरसकारकर्त्यांस सन्मानचिन्ह, रोख १,००,०००/- पुस्तके घेण्यासाठी रु. १०,०००/- प्रशस्तीपत्रक व प्रमाणपत्र

**महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग**

बालकांचे अधिकार संयुक्त राष्ट्र परिषद १९८९ मध्ये नमूद केलेप्रमाणे, बालकांच्या संदर्भाचे सर्व अधिकारांचे संरक्षणाकरिता कार्यवाही करण्याचे अधिकार आयोगाला देण्यात आलेले आहेत.

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम २००५, कायद्यान्वये केंद्रीय बालहक्क संरक्षण आयोग व राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची २४ जुलै २००७ मध्ये स्वायत्त मंडळ म्हणून बाल हक्क संरक्षण कायदा २००५ (२००६ मधील ४) अन्वये राज्यातील बालकांच्या हक्कांचे संरक्षण प्रचलने आणि रक्षण करण्यासाठी स्थापना करण्यात आली आहे.

**बालकांचे हक्क -**

१. **जगण्याचा अधिकार :** भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत प्रत्येक मुलाला जगण्याचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार आहे, ज्याची हमी देण्यात आली आहे.

२. **समानता आणि भेदभाव न करण्याचा अधिकार :** लिंग, जात, धर्म किंवा इतर कोणत्याही दर्जाची बाधा न येता बालकांना कायद्यानुसार समान वागणूक आणि संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे.

३. **संरक्षणाचा अधिकार :** यामध्ये सर्व प्रकारचा गैरवापर, दुर्लक्ष, हिंसाचार, शोषण आणि हानिकारक पारंपरिक पध्दतींपासून संरक्षण समाविष्ट आहे.

४. **शिक्षणाचा अधिकार :** ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळण्याचा अधिकार आहे, जो संविधानाच्या कलम २१अ मध्ये समाविष्ट केलेला मूलभूत अधिकार आहे.

५. **आरोग्याचा अधिकार :** मुलांना पौष्टिक अन्न, स्वच्छ पाणी, स्वच्छता आणि निरोगी वातावरणासह आरोग्य सेवा मिळण्याचा अधिकार आहे.

६. **विकासाचा अधिकार :** यामध्ये शिकण्याचा, खेळण्याचा आणि त्यांच्या पूर्ण क्षमतेचा विकास करण्याच्या संधीचा समावेश आहे.

७. **सहभागाचा अधिकार :** बालाकंना त्यांचे विचार व्यक्त करण्याचा, त्यांच्यावर परिणाम करणाऱ्या निर्णयांमध्ये सहभागी होण्याचा अधिकार आहे.

८. **ओळखीचा अधिकार :** बालकांना जन्म प्रमाणपत्र आणि इतर आवश्यक कागदपत्रांसह कायदेशीर ओळख मिळण्याचा अधिकार आहे.

९. **सुनावणी मिळण्याचा अधिकार :** बालकांना त्यांच्याशी संबंधित सर्व बाबींमध्ये त्यांचे मत आणि भावना विचारात घेतल्या जाण्याचा अधिकार आहे.

**आयोगाची कार्ये**

केंद्र शासनाच्या बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम २००५ च्या कलम १७ व १८ मधील तरतूदीनुसार व बाल हक्क संरक्षण राष्ट्रीय आयोग नियम, २००६ नियम मधील १७ व महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग नियम २०१० मधील नियम ७

१. बाल हक्क संरक्षणासाठी कोणत्याही कायद्याव्दारे किंवा त्याअंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या संरक्षणाची तपासणी करणे आणि आढावा घेणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपायांची शिफारस करणे.

२. बालकांच्या अधिकारांचे उल्लंघन झालेल्या प्रकरणामध्ये चौकशी करणे आणि अशा प्रकरणांमध्ये कारवाईची शिफारस करणे.

३. विशेष काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या वेळी बालकांशी संबंधित असलेल्या समस्यांकडे लक्ष देणे, ज्यामध्ये अडचणीतील बालक, उपेक्षित आणि वंचित बालक, कायदेशीर संघर्ष करणारी बालके,अल्पवयीन बालक, कुटुंब नसलेली बालके आणि कारागृहातील बंदी यांची बालके यांचा समावेश आहे आणि योग्य उपाययोजनांची शिफारस करणे.

४. बाल हक्कांविषयी समाजाच्या विविध स्तरांमध्ये व माध्यमांमध्ये कार्यशाळा इत्यादी व्दारे जनजागृती करणे.

५. बालकांच्या बाबत संरक्षणासाठी यंत्रणा, विकासाठीच्या योजना इत्यादी संदर्भात आढावा घेऊन त्याबाबत सूचना, अहवाल शासनाकडे सादर करणे.

६. बाल हक्कांच्या क्षेत्रात संशोधन करणे आणि संशोधनासाठी प्रोत्साहन देणे.

७. तक्रारींची चौकशी करणे आणि खालील संबंधित बाबींची स्वप्रेरणेने नोंद / दखल घेणे तसेच सूचना देणे.

- बालकांच्या अधिकारांची पायमल्ली किंवा उल्लंघन झाले असेल त्या प्रकरणी चौकशी करुन कार्यवाही करणे.
- बालकांच्या संरक्षणासाठी आणि विकासासाठी असलेल्या कायद्याची अंमलबजावणी न करणे.
- बालकांचे कल्याण सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने प्रचलीत असलेल्या, मार्गदर्शक तत्वे किंवा सूचनांचे पालन न करणे, आणि अशा बालकांना आराम प्रदान करणे किंवा अशा प्रकरणांमध्ये उध्दभवणारे मुद्दे संबंधित अधिकाऱ्यांकडे उपस्थित करणे.

८. बालकांच्या हक्कांच्या वाढीसाठी अशी इतर आवश्यक कार्ये आणि उपरोक्त कार्याच्या अनुषंगाने कोणतीही बाब.

**आयोगाच्या कामाचे स्वरूप व सद्यःस्थिती**

आयोगाचे कामकाज प्रत्यक्षरित्या सुरू होऊन जवळपास १० वर्षे पूर्ण होत आलेली आहेत. बाल हक्क अधिनियम, २००५ च्या उपकलम १३(१) (घ) व त्या कलमाचे उपकलम १३ (१) (ग) (i) (ii) (iii) व उपकलम १३ (१) (ज्ञ) खालील नमूद बाबींकरिता सदर अधिनियमांचे कलम (१) व त्याखालील उपनियमान्वये प्रदान केलेल्या अधिकारांची अंमलबजावणीकरिता आयोगाने एप्रिल २०११ पासून नियमितपणे सुनावणी सुरू केल्या असून त्याकरिता दिनांक २२ जून २०११ च्या अधिसूचनेद्वारे आयोगाच्या कार्य पद्धतीची प्रक्रिया निश्चित केलेली आहे व त्याद्वारे आयोगाने मुंबई, नागपूर व औरंगाबाद येथे सुनावणी सुरू केलेल्या आहेत. (याशिवाय आयोगाने बाल हक्क संरक्षण अधिनियम, २००५ मधील कलम १३(१) (एफ) अन्वये राज्यातील बाल धोरणावर आढावा घेण्याचे काम पूर्ण केले).

बालकांचा शिक्षणाचा अधिकार (RTE ACT-२००९) याची अंमलबजावणी १ एप्रिल २०१० पासून संपूर्ण देशात करण्यात आलेली आहे. त्यानुसार कायद्याच्या कलम ३१ प्रमाणे या कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थीत होत आहे की नाही यासंबंधी राज्यातील सर्व शाळा व शिक्षण संस्था यांचेवर देखरेख व मॉनिटरींग करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे RTE कायदा २००९ च्या कलम ३२ (३) प्रमाणे आयोगाला अपिलीय अधिकार देण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या स्थापनेपासून संपूर्ण राज्यभरात आतापर्यंत मुंबई (राज्यस्तरीय), नागपूर, कोल्हापूर, परभणी वाशिम, नाशिक, वर्धा, औरंगाबाद, सातारा, रत्नागिरी, गडचिरोली, चंद्रपूर व अमरावती या जिल्ह्यांमध्ये राज्यस्तरावर व विभागीय स्तरावर बाल हक्क विषयक बाबीवर चर्चासत्रांचे आयोजन केले.

सदर चर्चा सत्रांमध्ये बालकांच्या क्षेत्रातील विविध मान्यवरांमध्ये बालकांच्या अनेक समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. भ्रूणहत्या, कुपोषण, बाल मजुरी, बाल विवाह, मुलांकडून जबरदस्तीने भीक मागविणे तसेच, मतिमंद व मुक-बधीर मुले आणि बालकांच्या शिक्षणाचा अधिकार आदी प्रश्नावर आयोग काम करीत असून, तक्रारीचा पाठपुरावा सातत्याने सुरू आहे.

लैंगिक छळापासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ अन्वये आयोगाला सदर कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्याचे अधिकार दिलेले आहेत. संबंधित अधिकाऱ्याला जिल्हा व विभागीय स्तरावर मॉनिटरिंग, प्रशिक्षणाची कामे आयोगाद्वारे केली जाते. या सर्व विषयावर जनजागृती करण्याचे काम सतत आयोगाद्वारे केले जाते. आयोग राष्ट्रीय व राज्यस्तरीय कार्यशाळा, कन्व्हेशन, प्रशिक्षण कार्यक्रम, बालमजूरी, अवैध बाल वाहतूक, लैंगिक छळ इ. विषयावर आयोजन करण्यात येते.

आयोगाने अवैध बालवाहतूक, लैंगिक छळ थांबविण्याकरिता ॲक्शन प्लॅन तयार केला तसेच रस्त्यावर राहणाऱ्या नशा करणाऱ्या मुलांच्या नशा मुक्तीकरिता आराखडा तयार करून शासनाला सादर केला. या विषयावर गाईड लाईन्स तयार करण्यात येत आहे व आयोगाचा वार्षिक अहवाल सन २०२१-२२ पर्यंतचे विधानमंडळ पटलासमोर सादर करण्यात आलेले आहेत.

**महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची मंजूर पदे व वेतनश्रेणी दर्शविणारे विवरण पत्र**
**(माहे मार्च २०२५ अखेरची सद्यस्थिती)**

| अ. क्र. | पदनाम | वेतन बँड | पदसंख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | २०२३-२०२४ | २०२४-२०२५ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | सचिव | S-23 | १ | १ |
| २. | प्रशासकीय अधिकारी | S-20 | १ | १ |
| ३. | विधी सल्लागार | S-20 | १ | १ |
| ४. | लेखाधिकारी तथा सहाय्यक प्रशासकीय अधिकारी | S-15 | १ | १ |
| ५. | उच्च श्रेणी लघुलेखक | S-15 | २ | २ |
| ६. | परिविक्षा अधिकारी | S-14 | २ | २ |
| ७. | लिपिक | S-6 | २ | २ |
| ८. | शिपाई | S-1 | २ | २ |
| | | एकूण... | १२ | १२ |

**महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग कार्यालयात बाल हक्क संरक्षणासंबंधी प्राप्त प्रकरणांचा गोषवारा**

| अ. क्र. | वर्ष | वर्षाच्या सुरूवातीला प्रलंबित असलेली प्रकरणे | नवीन तक्रारी | एकूण | निकालात काढलेली प्रकरणे | वर्षाच्या शेवटी प्रलंबित असलेली प्रकरणे | प्रलंबित प्रकरणांचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १. | २००८-०९ | ० | ९ | ९ | ५ | ४ | ३८९ प्रकरणा बाबत संबंधित कार्यालया मार्फत अहवाल मागविणे तसेच सुनावणीची कार्यवाही सुरु आहे. |
| २. | २००९-१० | ४ | ३५ | ३९ | १० | २९ | |
| ३. | २०१०-११ | २९ | ६३ | ९२ | ७ | ८५ | |
| ४. | २०११-१२ | ८५ | ४९८ | ५८३ | ८ | ५७५ | |
| ५. | २०१२-१३ | ५७५ | ३९४ | ९६९ | ४९४ | ४७४ | |
| ६. | २०१३-१४ | ४७५ | १३० | ६०५ | ७३ | ५३२ | |
| ७. | २०१४-१५ | ५३२ | १२९ | ६६१ | २१० | ६१० | |
| ८. | २०१५-१६ | ४५१ | ११५ | ५६६ | ५०३ | ६३ | |
| ९. | २०१६-१७ | ६३ | १४५ | २०८ | ८३ | १२५ | |
| १०. | २०१७-१८ | ११८ | १६२ | २८० | ३३ | २४७ | |
| ११. | जाने. २०१८ ते डिसेंबर २०१८ | २४७ | ८६ | ३३३ | ०८ | ३२५ | प्रलंबित प्रकरणाबाबत संबंधित कार्यालयामार्फत चौकशी अहवाल मागविणेची कार्यवाही सुरु आहे कांही प्रकरणे अंतिम शिफारशीसाठी आयो-गासमोर सादर केलेली आहेत. |
| १२. | जाने. २०१९ ते डिसेंबर २०१९ | ३२५ | १९६ | ५२१ | १३२ | ३८९ | |
| १३. | जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२० | ३८९ | १३४ | ५२३ | २७ | ४९६ | |
| १४. | जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२१ | ४८९ | १९६ | ६८५ | १५ | ६७० | |
| १५. | जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ | ६७० | २७२ | ९४२ | ८९ | ८५३ | |
| १६. | जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ | ८३३ | २८८ | ११२१ | ७२ | १०४९ | |
| १७. | जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ | १०४९ | २६३ | १३१२ | ६३ | १२४९ | |

## विवरणपत्र ब तक्ता क्रमांक-२

### महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगास शासनाकडून प्राप्त सहाय्यक अनुदान व आस्थापनेवरील आणि आयोग कार्यप्रणालीवर झालेल्या खर्चाचा तपशील.

| अ. क्र. | कार्यक्रम | अर्थसंकल्प २०२५-२०२६ | | | सुधारित अंदाज २०२५-२०२६ | | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२०२७ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १. | महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग स्थापना | १९४९९ | ... | १९४९९ | १५३३७ | ... | १५३३७ | २०७१० | ... | २०७१० |

### तक्रारी, शिफारशी व आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशांची सद्य:स्थिती (न्यायालयीन प्राधिकारासह)

### बाल हक्क संरक्षण आयोग-२००५ आणि बालकांच्या शिक्षणाचा हक्क-२००९

| अ. क्र. | वर्ष | वर्षाच्या सुरूवातीला प्रलंबित असलेली प्रकरणे | नवीन तक्रारी | एकूण | निकालात काढलेली प्रकरणे | वर्षाच्या शेवटी प्रलंबीत असलेली प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २०११-१२ | ० | ८ | ८ | १ | ७ |
| २. | २०१२-१३ | ७ | १२ | १९ | ११ | ८ |
| ३. | २०१३-१४ | ८ | ५० | ५८ | २७ | ३१ |
| ४. | २०१४-१५ | ३१ | २६ | ५७ | ४२ | १५ |
| ५. | २०१५-१६ | १५ | १६ | ३१ | २४ | ७ |
| ६. | २०१६-१७ | ७ | ८६ | ९३ | ६८ | २५ |
| ७. | २०१७-१८ | २५ | १४ | ३९ | २३ | १६ |
| ८. | (एप्रिल २०१७ ते डिसेंबर २०१७) | १६ | ०२ | १८ | ० | १७ |

## महाराष्ट्र राज्य समाज कल्याण बोर्ड, चेंबूर मुंबई

**६. कुटुंब आणि बाल विकास मंडळे व समित्या –**

**६.१ महाराष्ट्र राज्य समाज कल्याण बोर्ड, मुंबई (राज्य शासनाच्या योजना) –**

महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्ड, मुंबई हे केंद्रीय समाजकल्याण बोर्ड, नवी दिल्ली यांचेशी संलग्न असून, बोर्डामार्फत महिला व बाल विकास विषयक कार्यक्रम राबविण्यात येतात.

(१) मुख्य कार्यालयातील अधिकारी व वेतनेत्तर निवृत्तीवेतनासाठी कर्मचारी वेतन १००%

(२) योजनेतील सेवा निवृत्तीवेतनासाठी १००%

मात्र सन २०२३-२४ पासून राज्य शासनाकडून समाज कल्याण बोर्ड यांचे मुख्य कार्यालयातील अधिकारी कर्मचारी वेतन व वेतनत्तर निवृत्तीवेनासाठी, १००% प्रमाणे अनुदान देण्यात येते.

**६.२ महाराष्ट्र राज्य समाज कल्याण बोर्ड - मुंबई (केंद्र शासनाच्या योजना)-**

समाज कल्याण बोर्डामार्फत महिलांचे कल्याणविषयक कार्यक्रम राबविणाऱ्या नोंदणी प्राप्त स्वयंसेवी संस्थांना अनुदान दिले जात होते.

तक्ता क्रमांक २६

(रुपये हजारांत)

| अनुक्रमांक | सन | वेतन | वेतनेत्तर | एकूण |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | २०२३-२०२४ | ८४५७ | ६४६६६ | ७३१२३ |
| २. | २०२४-२०२५ | १८१६७ | ११६८०५ | १३४९७२ |
| ३. | २०२५-२०२६ | १८४०० | १२८४८५ | १४६८८५ |

**बोर्ड कार्यालयाचा २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२०२६ या तीन वर्षाचा तपशील : –**

समाज कल्याण बोर्डाकडून केवळ महिला कल्याण विषयक कार्यक्रम राबविणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांना वेगवगळे कार्यक्रम राबविण्यासाठी अनुदान दिले जात होते. सन २०२२-२३ या वर्षापर्यंत बोर्डामार्फत केंद्रिय समाज कल्याण बोर्डाच्या १००% अनुदानावर कौटुंबिक सल्ला केंद्र ही योजना राबविली जात होती. कौटुंबिक सल्ला केंद्र कार्यक्रमासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा तपशील तक्ता क्रमांक २७,२८, व २९ मधील (अ) मध्ये दर्शविल्यानुसार खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्ड कार्यालयात एकूण ३१ पदे मंजूर असून सध्या १६ पदे कार्यरत आहेत. राज्यशासनाव्दारे ३६ सहायक अनुदाने (वेतन) अंतर्गत १००% निधी पाप्त झालेला आहे. महिला व बाल विकास विभाग, भारत सरकार यांचे दि.१८.०६.२०२१ च्या निर्देशानुसार सन २०२३-२४ पासून राज्यशासनाद्वारे ३६ सहायक अनुदान (वेतने) अंतर्गत १०० % निधी प्राप्त होतो.

महिला व बाल विकास विभाग, भारत सरकार यांचे दि. १८-०६-२०२१ च्या निर्देशानुसार सन २०२४-२५ या वर्षात राज्यशासनाव्दारे ३६ सहायक अनुदाने (वेतन) अंतर्गत १००% निधी प्राप्त होतो. त्याचा तपशील तक्ता क्रमांक २७,२८व २९ मधील (अ) मध्ये दर्शविल्यानुसार खालीलप्रमाणे आहे.

राज्य शासनाच्या १००% आर्थिक सहाय्याने राबविण्यात येणाऱ्या योजना महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.मबाआ-२००२/प्र.क्र.९५/का-७ दि.५.४.२००३ अन्वये बंद करणेत येवून त्यामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या महिला व बाल विकास विभाग व एकात्मिक बाल विकास सेवा योजना आणि महिला व बालकांच्या संस्थामध्ये किंवा आयुक्तालयाच्या अखत्यारीतील इतर समकक्ष पदावर त्यांच्या सध्याच्या सेवा व शर्ती कायम ठेवून प्रतिनियुक्तीने सामावून घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच या प्रकल्प/योजनामधून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन बोर्ड कार्यालयामार्फत प्रदान करण्यात येत असून, त्यासाठी राज्यशासनाद्वारे ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) अंतर्गत निधी प्राप्त होतो. त्याचा तपशील तक्ता क्रमांक २७,२८, व २९ मधील (ब) मध्ये दर्शविल्यानुसार खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्रमांक २७**

सन २०२३-२०२४

(रुपये हजारांत)

| अ.क्र. | कार्यक्रम | मंजूर तरतुद | संस्था | युनिटस् | मजूर अनुदान | लाभार्थी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | बोर्ड आस्थापना | १६९०८ | – | – | १६९०८ | १९ | १००% राज्य शासन |
| | एकूण | १६९०८ | | | १६९,०८ | १९ | |
| ब | उपदान व सेवानिवृत्ती वेतन<br>१ बोर्ड<br>२ योजना | <br>६२०३<br>९७७६६ | – | – | <br>६२०३<br>९७७६६ | <br>२०<br>२४६ | १००% राज्य शासन अनुदान |
| | एकूण | १०३९६९ | | | १०३९६९ | २६६ | |
| | **एकूण** | **१२०८८५** | | | **१२०८८५** | **२८५** | |

**तक्ता क्रमांक २८**

सन २०२४-२०२५

(रुपये हजारांत)

| अ.क्र. | कार्यक्रम | मंजूर तरतुद | संस्था | युनिटस् | मजूर अनुदान | लाभार्थी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | १ बोर्ड आस्थापना | १८१६७ | – | – | १८१६७ | १९ | १००% राज्य शासन |
| | एकूण | १८१६७ | | | १८१६७ | १९ | |
| ब | उपदान व सेवानिवृत्ती वेतन<br>१ बोर्ड<br>२ योजना | <br>१०४००<br>१०६४०५ | – | – | <br>१०४००<br>१०६४०५ | <br>२०<br>२५२ | १००% राज्य शासन अनुदान |
| | एकूण | ११६८०५ | | | ११६८०५ | २७२ | |
| | **एकूण** | **१३४९७२** | | | **१३४९७२** | **२९१** | |

**तक्ता क्रमांक २९**

सन २०२५-२०२६

(रुपये हजारांत)

| अ.क्र. | कार्यक्रम | मंजूर तरतुद | संस्था | युनिटस् | मजूर अनुदान | लाभार्थी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | बोर्ड आस्थापना | १८४०० | – | – | १८४०० | १६ | १००% राज्य शासन |
| | एकूण | १८४०० | | | १८४०० | १६ | |
| ब | उपदान व सेवानिवृत्ती वेतन वेतन राज्य बोर्ड कर्मचारी / योजना कर्मचारी | १२८४८५ | | | १२८४८५ | २७४ | १००% राज्य शासन अनुदान |
| | एकूण | १२८४८५ | | | १२८४८५ | २७४ | |
| | **एकूण** | **१४६८८५** | | | **१४६८८५** | **२९०** | |

**तक्ता क्रमांक ३०**
**महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्ड, मुंबई**
**बोर्ड कर्मचारी वृंद संरचना**

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | मंजूर संख्या (३) | (सुधारित वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर) (४) |
|---|---|---|---|
| १. | सचिव | १ | S-२३ : ६७,७००–२,०८,७०० |
| २. | लेखापाल | १ | S-१४ : ३८,६००–१,२२,८०० |
| ३. | प्रमुख सहाय्यक | १ | S-१३ : ३५,४००–१,१२,४०० |
| ४. | सांख्यिकी सहाय्यक | १ | S-८ : २५,५००–८१,१०० |
| ५. | कार्यालय सहाय्यक | १ | S-८ : २५,५००–८१,१०० |
| ६. | अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक | १ | S-१३ : ३५,४००–१,१२,४०० |
| ७. | वरिष्ठ लिपिक | ९ | S-८ : २५,५००–८१,१०० |
| ८. | रोखपाल | १ | S-८ : २५,५००–८१,१०० |
| ९. | लघुलेखिका | १ | S-८ : २५,५००–८१,१०० |
| १०. | कनिष्ठ लिपिक | ७ | S-६ : १९,९००–६३,२०० |
| ११. | वाहन चालक | २ | S-६ : १९,९००–६३,२०० |
| १२. | दफ्तरी | १ | S-३ : १६,६००–५२,४०० |
| १३. | सेवक | ३ | S-१ : १५,०००–४७,६०० |
| १४. | सफाईगार | १ | S-१ : १५,०००–४७,६०० |
| | **एकूण–** | **३१** | |

## बोर्ड कर्मचारी वृंद संरचना

**१० महाराष्ट्र राज्य समाज कल्याण बोर्डास सहायक अनुदाने (२२३५-बी ९४२)**

शासन निर्णय क्र.सकबो-२०१६/प्र.क्र.६३/का-१०, दिनांक ६ सप्टेंबर २०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य समाज कल्याण बोर्डाच्या वेतन व वेतनेत्तर बाबीसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच महिला व बाल विकास विभाग, भारत सरकार यांचे दि.१८.०६.२०२१ च्या निर्देशानुसार केंद्रीय समाज कल्याण बोर्ड व त्याअंतर्गत असलेले सर्व राज्य समाज कल्याण बोर्ड कायम स्वरुपी बंद करणेचा निर्णय घेण्यात आला असून, त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य समाज कल्याण बोर्ड, मुंबई कार्यालयातील कार्यरत कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेणेबाबत प्रस्ताव महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर केलेला असून, शासन स्तरावर कार्यवाहीत आहे. सद्यस्थितीत बोर्ड कार्यालयातील १६ अधिकारी / कर्मचाऱ्यापैकी १५ कर्मचारी महिला व बाल विकास विभागाच्या अधिनस्त कार्यालयाअंतर्गत कामकाज व्यवस्थेने कार्यरत आहेत. तसेच १ कर्मचारी बोर्ड कार्यालयाचे सर्व कामाकाज करीत आहेत. केंद्रीय बोर्डाच्या निर्देशानुसार बोर्ड आस्थापना (३१-१५=१६) कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी ३६- सहायक अनुदाने (वेतन) या बाबीवर १,८४,०० हजार व सेवानिवृत्त कर्मचारी २० आणि योजना सेवानिवृत्त कर्मचारी २७४ यांच्या सेवानिवृत्ती उपदानासाठी ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) बाबीवर १२,८४,८५ हजार अशी एकूण १४,६८,८५ हजार तरतूद सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर करण्यात आली आहे.

प्रकरण ८

## महात्मा गांधी प्रशासन व प्रशिक्षण संस्था,३ चर्च रोड, पुणे-१

महात्मा गांधी प्रशासन प्रशिक्षण संस्था, पुणे ही चौथी पंचवार्षिक योजनेच्या तरतूदी मधून शासन निर्णय शिक्षण, क्रिडा आणि समाज कल्याण विभाग क्र-एस.डब्ल्यू, डी१०७१/८७९३/जे, दिनांक २१ जून १९७१ ला स्थापन झाली असून, येथे महिला व बाल विकास व एकात्मिक बाल विकास सेवा योजना ह्या दोन प्रमुख विभागांच्या सर्व शाखातील अधिकारी/कर्मचारी वृंद यांना सामान्य प्रशासन विभाग शानिक्र. टिआरएन-०९/प्र.क्र.३९/०९-१२अ/दिनांक २३ सप्टेंबर २०११ महाराष्ट्र राज्याचे राज्य प्रशिक्षण धोरण तसेच सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दिनांक २ फेब्रुवारी, २०२२ महाराष्ट्र नागरी सेवा (कालबध्द प्रशिक्षण) नियम २०२२ व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक यशदा-२०२१/प्र.क्र.४४/१२-अ दिनांक - २२ सप्टेंबर, २०२२ नुसार सद्यस्थितीत महात्मा गांधी प्रशासन, प्रशिक्षण संस्था, पुणे व विभागीय स्तरावर असलेल्या ६ प्रशासकीय प्रशिक्षण संस्था यांचे मार्फत वर्ग ३ व ४ च्या अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते. व यशदा, पुणे ह्या शिखर संस्थे मार्फत वर्ग १-२ च्या अधिकारी कर्मचाऱ्यांना पायाभूत, उजळणी, पदोन्नती नंतरचे प्रशिक्षण, नवीन विषयाची तोंडओळख प्रशिक्षण, इत्यादी प्रशिक्षण देण्यात येतात.

तसेच गट अ व ब च्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण यशदा, पुणे व वनामती नागपूर, रामेती कोथरुड, पुणे यांचेमार्फत आयोजित करण्यात येतात तर गट क व ड चे प्रशिक्षण महात्मा गांधी प्रशासन प्रशिक्षण संस्था पुणे व विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (१) पंजाबराव देशमुख प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती (२) मराठवाडा प्रशासकीय विकास प्रशिक्षण प्रबोधीनी नाथ नगर (उत्तर), पैठण, जि. औरंगाबाद व (३) प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेती), कोथरुड, पुणे येथे आयोजित करण्यात येतात. यामध्ये महिला व बाल विकास, विभागांच्या सर्व योजना, कायदे, नियम, आहरण व संवितरण अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या, महाराष्ट्र नागरी सेवा नियम वेतन नियम, शिस्त व अपिल नियम, रजा नियम, विभागीय चौकशी तसेच नविन येणारे कायदे व नियम यांचे प्रशिक्षण देण्यात येते.

राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत शिखर संस्था यशदा, पुणे तसेच विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था १. प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेती, पुणे) २. पंजाबराव देशमुख प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती ३. महात्मा गांधी प्रशासन प्रशिक्षण संस्था पुणे यांचे मार्फत सन २०२४-२५ मध्ये खालीलप्रमाणे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आलेले आहेत.

**तक्ता क्रमांक ३१**

**महात्मा गांधी प्रशासन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणाची वर्षनिहाय माहिती खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | सन | प्रशिक्षण | शासकीय कार्यालयाचे प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|
| १. | २०२३-२०२४ | प्रशिक्षण प्रकार - पायाभूत प्रशिक्षण गट-अ,ब,क व ड | ० |
| | | उजळणी प्रशिक्षण गट-अ,ब,क व ड | ९० |
| | | नविन विषयांची तोंडओळख | |
| | | प्रशिक्षण गट- अ,ब,क व ड | २८५ |
| | | पदोन्नत्ती प्रशिक्षण गट-अ,ब,क व ड | ६९ |
| | | बदली नंतरचे प्रशिक्षण-अ,ब,क व ड | ६० |
| | | एकूण ... | ५०४ |
| २. | २०२४-२०२५ | प्रशिक्षण प्रकार - पायाभूत प्रशिक्षण गट-अ,ब,क व ड | ० |
| | | उजळणी प्रशिक्षण गट-अ,ब,क व ड | ७५ |
| | | नविन विषयांची तोंडओळख | |
| | | प्रशिक्षण गट- अ,ब,क व ड | १०७५ |
| | | पदोन्नत्ती प्रशिक्षण गट-अ,ब,क व ड | ५८ |
| | | बदली नंतरचे प्रशिक्षण-अ,ब,क व ड | ० |
| | | एकूण ... | १२०८ |

**तक्ता क्रमांक ३१**

**महात्मा गांधी प्रशासन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणाची वर्षनिहाय माहिती खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | सन | प्रशिक्षण | शासकीय कार्यालयाचे प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|
| ३. | २०२५-२०२६ | प्रशिक्षण प्रकार - पायाभूत प्रशिक्षण गट-अ,ब,क व ड | ८४ |
| | | उजळणी प्रशिक्षण गट-अ,ब,क व ड | ७५ |
| | | नविन विषयांची तोंडओळख | |
| | | प्रशिक्षण गट- अ,ब,क व ड | १२०० |
| | | पदोन्नत्ती प्रशिक्षण गट-अ,ब,क व ड | ३७ |
| | | बदली नंतरचे प्रशिक्षण-अ,ब,क व ड | ०० |
| | | एकूण ... | १३९६ |
| ४. | २०२६-२०२७ | प्रस्तावीत प्रशिक्षण प्रकार - पायाभूत प्रशिक्षण गट-अ,ब,क व ड | १०० |
| | | उजळणी प्रशिक्षण गट-अ,ब,क व ड | २५० |
| | | नविन विषयांची तोंडओळख | |
| | | प्रशिक्षण गट- अ,ब,क व ड | ६०० |
| | | पदोन्नत्ती प्रशिक्षण गट-अ,ब,क व ड | ११० |
| | | कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ प्रशिक्षण | १२००० |
| | | माहिती अधिकार प्रशिक्षण | १००० |
| | | बाल विवाह प्रतिबंध प्रशिक्षण | ५०० |
| | | एकूण ... | १४५६० |

शासन पत्र क्रमांक मबाआ/२०१४/प्र. क्र. १८६/का-७, दिनांक २६/२/२०२१ अन्वये महात्मा गांधी प्रशासन प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेस स्वायत्त दर्जा देण्यात आलेला आहे.

मा. आयुक्त, महिला व बाल विकास यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, वरिष्ठ लिपिक / सांख्यिकी सहाय्यक कनिष्ठ लिपिक / सहायक / डाटा एन्ट्री ऑपरेटर या संवर्गाची मर्यादित विभागीय परीक्षा दिनांक २७/०५/२०२३ ते २९/०५/२०२३ कालावधीत घेण्यात आली व परिक्षेचा निकाल सन २०२४ मध्ये लावण्यात आला.

मा. आयुक्त, महिला व बाल विकास यांनी आदेशित केल्या प्रमाणे महिला व बाल विकास विभागातील शिपाई, सफाईगार व कनिष्ठ काळजी वाहक वर्ग चार गटातील कर्मचारी यांचे वैयक्तीक स्वच्छता, व्यसनमुक्ती व सर्वांगीण विषयावर प्रशिक्षण घेण्यात आले.

तसेच शासन निर्णय क्र.एबावि-२०२४/प्र.क्र.६३/का.०६ मंत्रालय मुंबई-४०००३२ दिनांक २४/१०२०२४ व शासन निर्णय क्र. एबावि-२०२४/प्र.क्र.६३/का. ६ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक १०/१२/२०२४ महात्मा गांधी प्रशासन प्रशिक्षण संस्था पुणे, या संस्थेसाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील एकूण २५००० अंगणवाडी केंद्रामधील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना अन्न व सुरक्षा आणि पोषण मापदंड कार्यक्रम करीता रु.१२०७००/-(रु.१२ कोटी ७ लाख) निधी BDS प्रणालीवर लेखाशिर्ष २२३६-२१७३, ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) सर्वसाधारण बाबी करीता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता निधी प्राप्त झाला होता.

तद्नंतर एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत सर्वसाधारण बाबीकरिता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील निधी वितरण शासन निर्णय क्र. एवि-२०२४/प्र.क्र.६३/का.०६ मंत्रालय, मुंबई - ३२दि.२०.०२.२०२५ लेखाशिर्ष २२३६-२१७३, ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीवर रु.२९३.०० लाख (अक्षरी रुपये दोन कोटी त्र्याण्णव लाख फक्त) निधी प्राप्त झाला होता. व शासन

निर्णय क्र. एबावि-२०२३/प्र.क्र.६३/का. ६ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २८/०३/२०२५ नुसार शासन निर्णयान्वये राज्यातील आणखी ८००० अंगणवाडी केंद्रामधील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना अन्न व सुरक्षा आणि पोषण मापदंड कार्यक्रम करीता तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत सर्वसाधारण बाबीकरिता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील निधी वितरण शासन निर्णय क्र.एबावि- २०२४/प्र.क्र.६३/का.०६ मंत्रालय, मुंबई-३२ दि. २८.०३.२०२५ लेखाशिर्ष २२३६-२१७३, ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीवर रु.४८०.०० लाख (अक्षरी रुपये चार कोटी ऐंशी लाख फक्त) निधी प्राप्त झाला होता.

महात्मा गांधी प्रशासन प्रशिक्षण संस्था पुणे या संस्थेसाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील एकूण २५०००+८००० = एकूण ३३००० अंगणवाडी अंगणवाडी केंद्रामधील अंगणवाडी सेविका व मदनीस यांना अन्न व सुरक्षा आणि पोषण मापदंड कार्यक्रम करीता रु.१९,७९,९९,९८७/- (रुपये एकोणीस कोटी एकोणऐंशी लाख नव्याण्णव हजार नऊशे सत्याऐंशी फक्त) निधी BDS प्रणालीवर लेखाशिर्ष २२३६-२१७३, ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) सर्वसाधारण बाबीकरीता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता निधी प्राप्त झाला होता. सदर तरतूद खर्ची झालेली आहे.

महिला व बाल विकास विभाग पत्र क्र. मबाआ - २०२१/प्र.क्र.९२/का-/दि. ११. ११. २०२४ अन्वये महिला व बाल विकास विभागातील वर्ग अ व ब अधिकाऱ्यांच्या विभागीय परिक्षा माहे एप्रिल २०२५ मध्ये घेण्यात आल्या होत्या.

## प्रकरण ९

# इमारत दुरूस्ती व बांधकाम

महिला व बाल विकास विभागांतर्गत मुख्य लेखाशिर्ष २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण-०२ समाजकल्याण ००१- संचालन व प्रशासन (०१) महिला व बाल कल्याण संचालनालय, (०१)(०१) महिला व बाल संचालनालय (२२३५-२०७२), २७ लहान बांधकामे या लेखाशिर्षाअंतर्गत आयुक्त महिला व बाल विकास विभाग यांचे अखत्यारितील आयुक्तालय व आयुक्तालयांतर्गत राज्यातील सर्व शासकीय संस्थांच्या इमारतींच्या दुरुस्तीची कामे करण्यात येतात. तसेच ४२३५-०२५१, ४२३५-०७६१ व ४२३५-०७९९ या लेखाशिर्षाअंतर्गत महिला व बाल विकास विभागाची मोठी बांधकामे करण्यात येतात.

सद्यस्थितीत आयुक्तालयास इमारत अपुरी पडत आहे. तसेच प्रशिक्षणार्थीकरिता निवास व्यवस्था अपुरी आहे. सबब वरील लेखाशिर्षातून खालील कामे तातडीने करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | विषय | अंदाजे रुपये कोटीमध्ये | सचिव समितीचा शेरा |
|---|---|---|---|
| १. | महिला व बाल विकास भवन/ अहिल्याभवन पुणे. | ९७.१० | महिला व बाल विकास विभागाच्या येरवडा, पुणे येथील पंडित जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्रांच्या मालकीच्या स.नं.२२ व या जागेपैकी २.५० एकर जागेवर महिला व बाल विकास भवन/अहिल्या भवन, पुणे या नवीन इमारतीचे बांधकाम प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर इमारतीमध्ये महिला व बाल विकास आयुक्तालय, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय विभागीय उपआयुक्त, पुणे विभाग कार्यालय, बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,महिला आर्थिक विकास महामंडळ विभागीय कार्यालय, बाल हक्क संरक्षण आयोग विभागीय कार्यालय, महिला आयोग विभागीय कार्यालय, हिरकणी कक्ष, पाळणा घर, महिला सक्षमीकरण केंद्र, दोन सभागृहे, ऑडिटोरियम, उपहारगृह, वाहन तळ, महिला हेल्पलाईन, महिला विश्रांती कक्ष इत्यादी सुविधांसह बांधकाम करण्यात येणार आहे. सदर इमारतीचे एकूण क्षेत्रफळ २०८२०.७१ चौरस मीटर इतके प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर इमारतीच्या कामास शासनाकडून शासन निर्णय क्र.मबाआ-२०२४/प्र.क्र.७५(भाग१)का-७ अ दिंनाक ०६/०७/२०२४ अन्वये रुपये ९७.१० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार इमारतीचे नकाशे तयार झाले असून इमारतीचे बांधकाम सुरु करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांच्यामार्फत सुरु आहे. |
| २. | शासकीय प्रतिभा महिला वसतिगृह कुवारबाज जि. रत्नागिरी या संस्थेच्या नवीन इमारतीचे बांधकाम करणे | ८.५१ | महिला व बाल विकास विभागाच्या शासकीय प्रतिभा महिला वसतिगृह कुवारबाज महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२३/प्र.क्र.३१५/का.०२ दिनांक १४-०३-२०२५ अन्वये रुपये ८,५०,९८,९८२/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून प्रस्तावित इमारतीच्या जागेच्या साफसफाईचे काम प्रगतीत आहे. |

| अ.क्र. | विषय | अंदाजे रुपये कोटीमध्ये | सचिव समितीचा शेरा |
|---|---|---|---|
| ३. | शासकीय पुरुष भिक्षेकरीगृह, पुई कोलाड ता. रोहा जि. रायगड या संस्थेच्या इमारतीचे बांधकाम करणे | ८.०९ | महिला व बाल विकास विभागाच्या शासकीय पुरुष भिक्षेकरीगृह, पुई कोलाड ता. रोहा जि. रायगड या संस्थेच्या इमारतीचे बांधकाम करणे या कामासाठी महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. भिक्षेगृ-२०२२/प्र.क्र.२९/का.०९ दिनांक १३ मार्च, २०२४ अन्वये रुपये ८,०९,१६,५६०/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर काम सुरु करण्यात आले असून सद्यस्थितीत इमारतीचे फूटींग लेवलचे काम सुरु आहे. |
| ४ | शासकीय पुरुष भिक्षेकरीगृह, जांभूळ ता. कल्याण, जि. ठाणे या संस्थेचे नवीन इमारतीचे बांधकाम करणे | १४.९४ | महिला व बाल विकास विभागाच्या जांभूळ येथील शासकीय पुरुष भिक्षेकरीगृह जांभूळ ता. कल्याण, जि. ठाणे या संस्थेच्या नवीन इमारतीचे बांधकाम करणे या कामासाठी महिला व बाल विकास विभाग, शासन आदेश क्र. भिक्षेगृ-२०२४/प्र.क्र.७०/का.९ दिनांक ०५ जून, २०२५ अन्वये रुपये १४,९३,९९,३६८/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. या संस्थेच्या नवीन इमारत बांधकाम करणेबाबतच्या कामाची ई निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम सुरु करणेच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे. |
| | **एकूण** | **१२८.६४** | |

प्रत्येक जिल्हा स्तरावर महिला व बाल विकास भवन बांधणे, महिला व बालविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच लाभार्थींना योजनेचा उचित लाभ घेणे शक्य व्हावे याकरिता या योजनांची अंमलबजावणी एकाच छताखाली आणण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्हास्तरावर महिला व बाल विकास भवन बांधण्याबाबतचा प्रस्ताव पत्र क्र. ९९० दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० अन्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे.

महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना समाजातील दुर्लक्षित, संकटग्रस्त महिलांचे / बालकांचे संरक्षण तसेच पुनर्वसन इत्यादी बाबतच्या शासनाच्या योजनांचा लाभ जनमानसापर्यंत पोहोचण्यास बऱ्याच अडचणी येतात. या सर्व बाबींचा विचार करता राज्यात प्रत्येक जिल्हा मुख्यालय ठिकाणी महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी व लाभार्थींना योजनेचा उचित लाभ घेणे शक्य व्हावे याकरिता महिला व बाल विकास भवन स्थापन करणे बाबत शासनाने शासन निर्णय क्र.मबाआ-२०२०/प्र.क्र.१८/का.२ दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे. जिल्हा परिषद अमरावती यांचेकडून महिला व बाल विकास भवन इमारतीचा नकाशा करण्यात आलेला आहे. सदर नकाशा सर्व जिल्ह्यांसाठी महिला व बाल विकास भवनच्या बांधकामासाठी वापरात आणण्यास शासनाकडून पत्र क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.१८/का.२ दिनांक-०३ ऑगस्ट, २०२१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात सदर महिला व बाल विकास भवन या इमारतीचे बांधकाम प्रस्तावित करण्यात येत आहे.

सद्यःस्थितीत दिनांक १५ ऑगस्ट, २०२० पासून जिल्हा परिषदेच्या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर महिला व बाल विकास भवन सुरू करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी महिला व बाल विकास विभागाच्या विविध कार्यालयांचे प्रतिनिधी नियुक्त करण्यात आलेले आहेत. ते प्रतिनिधी कार्यालयात आलेल्या लाभार्थी महिला व बालके यांच्या बाबतीतील विविध शासकीय योजनांची माहिती व लाभ मिळवून देणेबाबत तसेच त्यांच्या समस्या व अडचणी ऐकून घेऊन सदर समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने लाभार्थ्यांच्या समस्येशी निगडीत कार्यालयाशी संपर्क साधून लाभार्थी व संबंधित कार्यालय (यंत्रणा) यांचेमध्ये समन्वय साधण्याचे काम करीत आहे.

त्याचप्रमाणे महिला व बाल विकास भवन तसेच महिला व बाल विकास विभागाच्या शासकीय इमारतींसाठी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१३१/का.०२ दिनांक ३१ जानेवारी, २०२२ अन्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत किमान ३% इतका निधी कायमस्वरुपी उपलब्ध करून देणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत सर्व जिल्ह्यामध्ये महिला व बाल

विकास भवन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी प्रयत्न सुरु असून त्यापैकी २२ जिल्ह्यामध्ये बांधकामासाठी जागा उपलब्ध झालेली आहे, तरी उर्वरित ठिकाणी जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच १२ जिल्ह्यामध्ये जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त झाला असून त्यापैकी बुलढाणा, नांदेड, जालना, लातूर, नाशिक, व सातारा या ६ जिल्ह्याच्या ठिकाणी महिला व बाल विकास भवनचे काम प्रगतीपथावर असून अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, परभणी व जळगाव या ६ जिल्ह्याच्या ठिकाणी महिला व बाल विकास भवनचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

प्रकरण १०

# अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८

**प्रस्तावनात्मक टिप्पणी**

केंद्र शासनाचा अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ व महाराष्ट्र अपराधी परिवीक्षा नियम, १९६६ नुसार कार्यवाही या विभागामार्फत कार्यरत आहे.

सदर अधिनियम हा सन १९७३ पुर्वी या विभागाकडून (पूर्वीचे समाजकल्याण) यांचेकडून राबविला जात होता. त्यानंतर सन १९७३ मध्ये शासन निर्णय क्रमांक पीओए-०२७२/I-VII, दिनांक ४ जुलै, १९७३ अन्वये सदर अधिनियमाच्या अंमलबजावणीचे काम तुरूंग विभागाकडे वर्ग करण्यात आले होते. पुन्हा सन १९९४ मध्ये शासन निर्णय क्रमांक जेएलडी-१५९३/१२/(६०)/पीआरएस-१, दिनांक २८ ऑक्टोबर, १९९४ अन्वये सदर कायद्याची अंमलबजावणीचे कामकाज महिला व बाल विकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले.

**परिवीक्षा म्हणजे काय ?**

अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ च्या संदर्भात ज्यावेळी परिवीक्षा हा शब्द वापरला जातो, त्यावेळी त्याचा अर्थ असा की विशिष्ट मुदतीत चांगली वर्तणूक ठेवली हे सिद्ध करणारा काळ, गुन्हा सिद्ध झाल्यावर अपराध्यास कारागृहाची शिक्षा न देता त्याची वर्तणूक सुधारण्यासाठी न्यायालयाने दिलेली एक संधी.

**परिवीक्षेचे उद्दिष्ट -**

(१) सामाजिक परिस्थितीच्या दबावामुळे किंवा काही विशिष्ट परिस्थितीत एखाद्या व्यक्तीकडून गुन्हा घडला व त्या बद्दल त्याला पश्चाताप होत असेल तर चांगले जीवन जगण्याची संधी समाजाने त्याला दिली पाहिजे. अशा प्रकारची संधी मा. न्यायालयाने अपराध्यास दिली असता, त्याच्या मानसिक प्रवृत्तीत बदल घडवून आणणे हे एक प्रमुख उद्दिष्ट आहे.

(२) त्याची दृष्टि विधायक (constructive) बनविणे त्याच्यातील चांगल्या गुणांना वाव देऊन, त्याच्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी स्वतःच्या सहकार्याने समाजाचा उपयुक्त घटक बनविणे.

वरीलप्रमाणे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या अपराधी परिवीक्षा अधिनियमाची निर्मिती झाली. अधिनियमाची अंमलबजावणी राज्यात जिल्हास्तरावर महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यात राबविण्यात येतो.

या अधिनियमाचे थोडक्यात स्वरुप असे की फाशी अथवा जन्मठेपेची शिक्षा वगळता इतर कमी कालावधीची शिक्षा असणाऱ्या व वय २१ पेक्षा कमी असणाऱ्या सर्व गुन्हेगारांना या अधिनियमाचा फायदा देता येतो. या अधिनियमाचे स्वरुप उपचारात्मक असून प्रथम गुन्हा घडलेल्या आरोपीस त्याच्या वर्तणूक, सामाजिक स्थिती, कौटुंबिक स्थिती, सभोवतालचे वातावरण इ. बाबी विचारात घेऊन त्यास खुल्या वातावरणात कुटूंबात राहून सुधारण्याची संधी दिली जाते.

या करिता मा. न्यायालय परिवीक्षा अधिकारी मार्फत वरीलप्रमाणे आरोपीचा प्राथमिक चौकशी अहवाल मागवितात. परिविक्षा अधिकारी नियमातील विहीत नमुन्यातील चौकशी अहवाल मा. न्यायालयास सादर करतात. मा. न्यायालय अहवाल विचारात घेऊन आरोपीस परिवीक्षा अधिकारी यांच्या देखरेखी खाली अटी व शर्तीसह सोडतात. परिवीक्षा अधिकारी दर महिन्यास भेटी घेवून त्यास मार्गदर्शन करतात, व त्याचा प्रगती अहवाल न्यायालयास देतात. या काळात त्यास पुनर्वसनाकरिता आवश्यकतेप्रमाणे सहकार्य करतात. अशाप्रकारे समाजाचे स्वास्थ चांगले राहण्याकरिता व सराईत गुन्हेगार होण्यापासून परावृत्त करण्यास त्यास या अधिनियमाचा फायदा दिला जातो परिवीक्षा अधिकारी हा आरोपी व न्यायालय यांच्यातील दुवा म्हणून कार्य पार पाडतो.

**अपराधी परिवीक्षा अधिनियम अंतर्गत कामाची कार्यपद्धती -**

प्रामुख्याने सर्वसाधारण १८ ते २१ या वयोगटातील किशोर वयीन गुन्हेगारास त्याचा गुन्हा सौम्य स्वरुपाचा असल्यास व तो सुधारण्याची शक्यता असल्यास मा. न्यायालयाने त्यास कारागृहाची शिक्षा न देता त्यास परिवीक्षाधीनावर मुक्त करावे अशी तरतूद

आहे, अर्थात अपवादात्मक प्रकरणी मा. न्यायालय त्यास योग्य वाटेल अशी शिक्षाही देऊ शकते योग्य त्या प्रकरणी गुन्ह्याचे स्वरुप त्यावेळेची परिस्थिती आरोपीचे कोवळे संस्कारक्षम वय व चारित्र्य इत्यादी सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून परिवीक्षा अधिकारी यांचे शिफारशी नुसार आरोपीस जरी गुन्हा सिद्ध झाला तरी तुरुंगाची शिक्षा न देता परिवीक्षाधीनावर मुक्त करण्यात येते त्याच्याकडून चांगल्या वर्तणुकीची हमी घेतली जाते. प्रामुख्याने परिवीक्षाधीची ही सवलत न्यायालय २१ वर्षांखालील आरोपींना देते, परंतु योग्य त्या प्रकरणी मा. न्यायालयास योग्य वाटल्यास २१ वर्षाचे पुढील आरोपीस जरी त्याचे वय जास्त असले तरी सदर अधिनियमाचा फायदा देऊ शकतात.

**पुनर्वसन कार्य -**

परिवीक्षाधीन/मुक्तबंदी यांनी शासनाकडे मदत मागितल्यास प्रत्येकी रुपये २५,००० सहाय्यक अनुदान पुनर्वसन कार्यासाठी दिले जाते.

**संपर्क कार्य -**

कारागृहातील बंदी व त्यांच्या कुटुंबियांचा संपर्क राखण्यासाठी तसेच त्यांच्या अडीअडचणी व आवश्यक असलेल्या मदतींचा विचार करून संपर्क अधिकारी बंदींना मदत करीत असतो.

मा. न्यायालयाच्या आदेशान्वये प्राप्त झालेली प्रारंभिक चौकशी प्रकरणे, न्यायालयाने देखरेखी खालील ठेवलेली देखरेख प्रकरणे, मुक्तबंदी/परिवीक्षाधीन यांना आर्थिक सहाय्य दिलेले लाभार्थी संख्या व प्रत्येकी लाभार्थी रु. २५,००० याप्रमाणे सहाय्यक अनुदान पुनर्वसनासाठी वितरित करण्यात येते.

तक्ता क्रमांक ३२

| अनुक्रमांक | वर्षे | प्राथमिक चौकशी | देखरेख प्रकरणे |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | २०२३-२०२४ | ८५३ | ४३५८ |
| २. | २०२४-२०२५ | ५०७ | ३४३५ |
| ३. | माहे ऑक्टोबर २०२५ अखेर | ४३९ | २५७१ |

तक्ता क्रमांक ३३

**मुक्तबंदी, परिवीक्षाधीन पुनर्वसन**

(रुपये हजारांत)

| अनुक्रमांक | वर्षे | मंजूर अनुदान | लाभार्थींची संख्या |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | २०२४-२०२५ | ४४०० | १७६ |
| २. | २०२५-२०२६ | ४४०० | १७६ |
| ३. | २०२६-२०२७ | ४४०० | २०० (अंदाजे) |

तक्ता क्रमांक ३४

**परिवीक्षा अधिनियम वित्तीय आवश्यकता**

(रुपये हजारांत)

| तपशील | प्रत्यक्ष रकमा २०२४-२०२५ | | अर्थसंकल्प २०२५-२०२६ | | सुधारित अंदाज २०२५-२०२६ | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२०२७ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | योजनांतर्गत | एकूण | योजनांतर्गत | एकूण | योजनांतर्गत | एकूण | योजनांतर्गत | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **सुधारसेवा —** | | | | | | | | |
| (१) सराईत अपराधी व अपराधी परिवीक्षा योजना व अपराधी परिवीक्षा अधिनियमाखाली कामाचा विस्तार करणे. | ३०७४ | ३०७४ | ४४०० | ४४०० | ३५९० | ३५९० | ४४०० | ४४०० |
| एकूण | ३०७४ | ३०७४ | ४४०० | ४४०० | ३५९० | ३५९० | ४४०० | ४४०० |

प्रकरण ११

# मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम-१९५९

**प्रस्तावना**

भिक्षा मागणे या सामाजिक समस्येचे समूळ उच्चाटन करण्यासाठी शासन निर्णय, आदेश क्रमांक ७७०१/४/२३९४, दिनांक २६ फेब्रुवारी १९४६ नुसार भिक्षा प्रतिबंध कायदा पास करण्यात आला. सदर कायद्यात वेळोवेळी सुधारणा होऊन आता हा कायदा मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९ व महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध नियम, १९६४ म्हणून शासनाने अंमलात आणला आणि आता सदर कायद्यात दुरुस्ती करण्याची प्रक्रिया चालू आहे.

मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९ च्या अंमलबजावणीचे कार्य महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत पोलीस विभाग व न्याय व्यवस्था यांचे सहकार्याने करण्यात येत आहे. १८ वर्षांच्या पुढील एखादी व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी भीक मागत असताना आढळली तर पोलीस यंत्रणेमार्फत त्याला ताब्यात घेऊन न्यायालयात दाखल करतात. न्यायालयाची खात्री होईपर्यंत त्या व्यक्तीस शासकीय भिक्षेकरी स्वीकारकेंद्रात ठेवण्यात येते. भिक्षेकरी स्वीकार केंद्रात दाखल होणारे प्रवेशित हे समाजाने व कुटुंबातील लोकांनी नाकारलेले असे निराधार, निराश्रित, सशक्त, वृद्ध, अपंग, क्षयरुग्ण, कुष्ठरोगी, मनोरुग्ण असे अनेक रोगाने पिडीत जगण्यासाठी भीक मागत असलेले असे असतात येथे त्यांचे शारीरिक, मानसिक, बौद्धीक पातळीनुसार वर्गीकरण करण्यात येते आणि नस्ती (केस) संस्थेतील परिवीक्षा अधिकारी न्यायालयास सादर करतात. न्यायालय वर्गीकरणानुसार ज्या ज्या संस्थासाठी त्या व्यक्तीस १ वर्षांपेक्षा कमी नाही व ३ वर्षांपेक्षा जास्त नाही अशा कालावधीसाठी भिक्षेकरी गृहात स्थानबद्धतेचा आदेश देते.

शासनाचे एकूण ८ भिक्षेकरी स्वीकार केंद्र (चेंबूर-महिला व पुरुष-२), (पुणे-१), (नागपूर-महिला व पुरुष-२), (सातारा-१), विसापूर-१, माळशिरस-१ कार्यरत असून चिंभळे, घायपातवाडी, पिंपळगाव पिसा, पुई-कोलाड, जांभूळ, केडगाव, येथे ६ भिक्षेकरी गृहे असे एकूण १४ शासकीय, संस्था कार्यरत आहेत. शासकीय भिक्षेकरी स्वीकार केंद्र व गृहात प्रवेशित दाखल झाल्यावर त्याला संरक्षण देऊन अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय उपचार व शिवणकाम, विणकाम (खादी), हस्तकला, चर्मकला, शेती, फिनेल उद्योग, सुतारकाम, लाँड्री, दंतमंजन, केनींग विणकाम, शेळीपालन, दोर तयार करणे, खराटे, फूलझाडू, खडू व मेणबत्ती तयार करणे इत्यादी व्यवसायोपयोगी प्रशिक्षण देऊन कामात गुंतवून ठेवून त्याला कामाची सवय लावून भीक मागण्यापासून परावृत्त होण्यास मदत केली जाते. यासाठी संस्थेत प्रशिक्षीत कृषी सहाय्यक व निदेशक यांची नेमणूक केलेली आहे. ते प्रवेशितांमध्ये कामे करण्याची मानसिक शक्ती निर्माण करून त्यांना स्वयंपूर्ण बनविण्याचा प्रयत्न करतात.

तसेच, स्त्रियांसोबत ५ वर्षांच्या आतील लहान मूल असल्यास ते मूल तिच्यासोबत संस्थेमध्ये ठेवण्यात येते. ५ वर्षावरील मुलांना जवळच्या विभागातील बालकल्याण समितीच्या आदेशानुसार बालगृहात दाखल करण्यात येते.

भिक्षेकरी पकडण्यासाठी महिला व बाल विकास विभागांतील यंत्रणे बरोबरच पोलीस व न्यायालय या तिन्ही खात्यांबरोबरच जनतेच्या सकारात्मक सहकार्यावर व कायद्याची परिणामकारक अंमलबजावणीवर अवलंबून आहे. समाजाने भीक मागणाऱ्यांना भीक देवून सामाजिक समस्या वाढविण्यासाठी हातभार लावणेऐवजी त्यांनी शासनाच्या संस्थेत जाऊन कायदेशीररित्या प्रवेशितांसाठी अन्न, धान्य, फळे, कपडे, औषधे दान देऊन सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन समाज कार्य करून शासनास सहकार्य करावे.

भिक्षा प्रतिबंध कायद्याचा कलम (१६) (१) मधील तरतुदीनुसार त्या-त्या वेळी अंमलात आणलेल्या विहीत काहीही असले, तरी प्रमाणित परिसंस्था चालविण्याकरिता विवक्षित रक्कम देण्याचे ज्या स्थानिक प्राधिकरणाने कबूल केले असेल, ते प्राधीकरण त्या बाबतीत विहीत करण्यात आलेल्या तारखेपूर्वी अशा रक्कमेच्या भरणा राज्य शासनाकडे करेल. जेथे हा कायदा लागू केलेला आहे. शासकीय संस्थेतून दरवर्षी औद्योगिक व शेती विभागाचे वार्षिक उत्पन्न अंदाजे ०३ ते ०४ लाख आहे. दरवर्षी सरासरी अंदाजे ३,००० भीक मागणाऱ्यास पकडले जाते. त्यांपैकी अंदाजे सरासरी १,००० भिक्षेकऱ्यांना स्थानबद्ध केले जाते. १४ शासकीय संस्थांनी मंजूर प्रवेशित संख्या ४१२७ असून इमारत क्षमता १५६० इतकी आहे.

भिक्षेकरी स्वीकार केंद्र व भिक्षेकरी गृहामधील प्रवेशितांच्या संस्थेमध्ये होत असलेली वाढ व त्यांचे पुनर्वसन, पालन पोषणाकरिता

मा. राज्य मानवी आयोग यांचे आदेशानुसार सर्व शासकीय संस्थेत आवश्यक त्या वैद्यकीय सोयीसुविधा, औषधोपचार, समुपदेशन, व्यवसाय प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न चालू असून त्यांचेकडून सहाय्य घेण्यात येत आहे.

निर्वासित छावणी बिर्सी, परमनंट लायबिलिटी होम, बिर्सी जि. गोंदिया, या योजनेखाली भारत पाकिस्तान, युद्धामुळे निर्वासित झालेल्या बांगलादेशीय नागरिकांना अन्न, वस्त्र व निवारा आणि पुनर्वसन भत्ता सुविधा पुरवून त्यांची देखभाल व पुनर्वसन करणे हा या योजनेचा मूळ उद्देश आहे सद्यःस्थितीत २९ कुटुंबे व ९२ सदस्य संख्या आहे. यांना प्रतिवर्षी अनुदान (०१) (०३) परमनंट लायबिलिटी होम बिर्सी (२२३५-२८९६) या लेखाशीर्षाखाली देण्यात येते. (शासन निर्णय, क्रमांक भिप्रशा/२००३/प्र.क्र.-८१, दिनांक १२ जानेवारी २००७).

तक्ता

**भिक्षेकरी**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | मंजूर संख्या | क्षमता | वर्गीकरण | वेतन 2024-2025 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ | २०२६-२०२७ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | **(अ) शासकीय संस्था** | | | | | | |
| १. | शासकीय पुरुष भिक्षेकरी स्वीकार केंद्र, चेंबूर मुंबई | ८५० | ४५० | स्वीकार व वर्गीकरण | २८५५७ | २५५०० | २६११० |
| २. | शासकीय पु. भिक्षेकरी स्वीकार केंद्र. पुणे (१०० पुरूष + १५ स्त्री) | ११५ | ५५ | स्वीकार व वर्गीकरण | २१५२१ | २४१५० | २४७५० |
| ३. | शासकीय पु. भिक्षेकरी स्वीकार केंद्र, नागपूर | ७५ | ५० | स्वीकार व वर्गीकरण | ८८४४ | १२५०० | १३२०० |
| ४. | शासकीय महिला भिक्षेकरी स्वीकार केंद्र, चेंबूर मुंबई | ५५० | २५० | स्वीकार व वर्गीकरण | ११८६८ | १६१५० | १६५८० |
| ५. | शासकीय पु. भिक्षेकरी गृह, विसापूरख अ. नगर | ५८० | ८० | स्वीकार व वर्गीकरण | ९९२८ | १४२२० | १४९२० |
| ६. | शासकीय पु. भिक्षेकरी गृह, पिंपळगाव-पिसा, अ. नगर | ३५० | १५० | स्वीकार व वर्गीकरण | १२२४१ | १४१८० | १५५१० |
| ७. | शासकीय पु. भिक्षेकरी गृह, चिंभळे, अ.नगर | २०० | १५० | अंध, म्हातारे | ३८९८ | ९७५० | १०४५० |
| ८. | शासकीय पु. भिक्षेकरी गृह, घायपातवाडी, अ. नगर | ३०० | १५० | सशक्त | ९२४० | १५३५० | १६०५६ |
| ९. | शासकीय पु. भिक्षेकरी स्विकार केंद्र, सातारा | २०० | १२५ | स्वीकार व वर्गीकरण | १०६१६ | १५०८० | १५७४० |
| १०. | शासकीय पु. भिक्षेकरी गृह, जांभूळ | ३०० | १५० | सशक्त, म्हातारे | ४९७७ | १०३९० | ११०९० |
| ११. | शासकीय पु. भिक्षेकरी गृह, पुई-कोलाड | १०७ | ६० | — | ५८४८ | ११४७० | १२१७० |
| १२. | शासकीय पुरुष भिक्षेकरी गृह केडगाव, सोलापूर | ३०० | २० | — | ४४५४ | ९०९० | ९७९२ |
| १३. | बेगर्स वर्क्स कॅम्प, माळशिरस, सोलापूर | १०० | २० | स्वीकार व वर्गीकरण | १५१८ | १७८० | ८५८० |
| १४. | शा. म. स्वि. केंद्र, नागपूर | १०० | ४० | स्वीकार व वर्गीकरण | २१२३ | ७९४० | ८६५२ |
| | **(ब) स्वयंसेवी संस्था** | ४,१२७ | १५६० | | | — | — |
| १. | निर्वासित छावणी बिर्सी, बांग्लादेशीय, गोंदिया निर्वासित (२९ कुटूंबे, ९२ सदस्य) | ९२ सदस्य | ९२ सदस्य | निर्वासित | ०० | ०० | ०० |
| | **एकूण...** | **४,२२०** | **१,६५३** | **––** | **१३५६२७** | **१९३६५०** | **२०३६००** |

क्रमांक ३५

**प्रतिबंध शाखा**

| (रुपये हजारात) | वेतनेतर | | प्रवेशितांची सरासरी | | |
|---|---|---|---|---|---|
| २०२४-२०२५ | २०२५-२०२६ | २०२६-२०२७ | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ | २०२६-२०२७ |
| (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| ७२०८ | ६६१३ | ७२०० | १०८ | ५० | ६० |
| १३४१ | ३१५८ | ५२०० | २१ | ३० | ३५ |
| १५१५ | ४४७५ | ५२०० | १२ | १८ | २५ |
| ३००३ | ४७७५ | ५२०० | ३५ | १९ | २५ |
| २७४३ | ३७२९ | ४१०० | १२२ | १३ | २५ |
| १४९६ | ३७९० | ३९०० | ६६ | १३ | १८ |
| ४७५ | १८७० | २६०० | १४ | १५ | १७ |
| ११९० | २४५२ | २८११ | ३३ | १३ | १८ |
| ३१०५ | २८२५ | ३१०० | २४ | २० | २५ |
| ७९१ | २८५० | ३१०० | ३ | १२ | १५ |
| १३१७ | ३५०० | ३१०० | १९ | २६ | २८ |
| १५९ | १५० | ३०० | ० | ० | ० |
| ९८ | १७६ | ३०० | ० | ० | ० |
| २४०० | ३२५१ | ३१०० | १७ | ५ | १० |
| ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ११० | २२० | २५० | ९२ सदस्य | ९२ सदस्य | ९२ सदस्य |
| **२६९५१** | **४३८३४** | **४९४६१** | **५६६** | **३२६** | **३९३ सदस्य** |

प्रकरण १२

तक्ता क्रमांक ३६

**महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय स्तर पदे वेतनश्रेणी व श्रेणी वेतन दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | पदनाम | वेतन बँड | पदसंख्या २०२५-२०२६ | पदसंख्या २०२६-२०२७ |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (५) | (६) |
| | **मागणी क्र. एक्स-२**<br>२२५१सचिवालय सामाजिक सेवा<br>०९० सचिवालय | | | |
| | **मागणी क्र. एक्स-२** | | | |
| १. | प्रधान सचिव | S-१५-१८२२००-७९००० | १ | १ |
| २. | सह सचिव | S-२५-३७४००-६७००० | १ | १ |
| ३. | उप सचिव | S-२५-१५६००-३९१०० | १ | १ |
| ४. | अवर सचिव | S-२३-१५६००-३९१०० | ४ | ४ |
| ५. | कक्ष अधिकारी | S-१७-९३००-३४८०० | १० | १० |
| ६. | लेखाधिकारी | S-१६-९३००-३४८०० | १ | १ |
| ७. | निवड श्रेणी लघुलेखक | - | ० | ० |
| | | **एकूण ...** | **१८** | **१८** |
| | **अराजपत्रित वर्ग-३** | | | |
| ८. | उच्च श्रेणी लघुलेखक | S-१५-९३००-३४८०० | ४ | ४ |
| ९. | सहाय्यक कक्ष अधिकारी | S-१४-९३००-३४८०० | १६ | १६ |
| १०. | निम्नश्रेणी लघुलेखक | S-१४-९३००-३४८०० | २ | २ |
| ११. | लिपिक टंकलेखक | S-६-५२००-२०२०० | १७ | १७ |
| १२. | रोखपाल | S-६-५२००-२०२०० | १ | १ |
| १३. | देयक लिपिक | S-६-५२००-२०२०० | १ | १ |
| १४. | वाहन चालक | S-६-५२००-२०२०० | १ | १ |
| | | **एकूण वर्ग-तीन ...** | **४२** | **४२** |
| | **वर्ग-४** | | | |
| १५. | रोनिओ चालक | S-३-४४४०-७४४० | १ | १ |
| १६. | शिपाई | S-१-४४४०-७४४० | ७ | ७ |
| | | **एकूण वर्ग-चार ...** | **८** | **८** |
| | | **एकूण ... वर्ग-१, २, ३ व ४ ...** | **६८** | **६८** |

तक्ता क्रमांक ३७

**(चार) मंत्रालय विभाग : कर्मचारीविषयक गोषवारा**

| | ३१ मार्च २०२५ रोजी असणारी संख्या | | | ३१ मार्च २०२६ रोजी असणारी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्थायी | अस्थायी | एकूण | स्थायी | अस्थायी | एकूण |
| **(एक) तांत्रिक —** | — | — | — | — | — | — |
| राजपत्रित | — | — | — | — | — | — |
| अराजपत्रित | — | — | — | — | — | — |
| एकूण-(एक)... | — | — | — | — | — | — |
| **(दोन) तांत्रिकेतर —** | | | | | | |
| राजपत्रित | १३ | ०५ | १८ | १३ | ०५ | १८ |
| अराजपत्रित | ४१ | ०९ | ५० | ४१ | ०९ | ५० |
| एकूण-(दोन)... | ५४ | १४ | ६८ | ५४ | १४ | ६८ |
| एकूण-(एक)+(दोन)... | ५४ | १४ | ६८ | ५४ | १४ | ६८ |

तक्ता क्रमांक ३८

**महिला व बाल विकास आयुक्तालयीन-अधिकारी/कर्मचारीविषयक पदांचा गोषवारा**

| तपशील | ३१ मार्च २०२५ रोजी असणारी संख्या | | | ३१ मार्च २०२६ रोजी असणारी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्थायी | अस्थायी | एकूण | स्थायी | अस्थायी | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **(एक) तांत्रिक —** | | | | | | |
| राजपत्रित | १६ | १५२ | १६८ | १६ | १५२ | १६८ |
| अराजपत्रित | ३१० | ५४५ | ८५५ | ३१० | ५४५ | ८५५ |
| एकूण-(एक)... | ३२६ | ६९७ | १०२३ | ३२६ | ६९७ | १०२३ |
| **(दोन) अतांत्रिक —** | | | | | | |
| राजपत्रित | ४२ | ३० | ७२ | ४२ | ३० | ७२ |
| अराजपत्रित | ५०२ | ८२६ | १३,२८ | ५०२ | ८२६ | १३२८ |
| एकूण-(दोन)... | ५४४ | ८५६ | १४,०० | ५४४ | ८५६ | १४,०० |
| राजपत्रित | ५८ | १८२ | २४० | ५८ | १८२ | २४० |
| अराजपत्रित | ८१२ | १३,७१ | २१,८३ | ८७० | १३७१ | २१८३ |
| एकूण-(एक)+(दोन)... | ८७० | १५,५३ | २४,२३ | ८७० | १५५३ | २४२३ |

तक्ता क्रमांक ३९

**कार्यक्रम अंदाजपत्रक २०२५-२०२६ करिता महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे व त्या अंतर्गत कार्यालय व संस्थेतील पदांबाबतची माहिती**

| अ. क्र. | पदनाम | सुधारित वेतन मॅर्टिक्समधील वेतनस्तर वेतनस्तर | वेतन श्रेणी | पदसंख्या २०२४-२०२५ | २०२५-२०२६ | २०२६-२०२७ |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | **राजपत्रित अधिकारी वर्ग-१** | | | | | |
| १. | आयुक्त | S-१३ | १२३१००-२१५९०० | १ | १ | १ |
| २. | सह आयुक्त | S-२५ | ६७७००-२०८७०० | १ | १ | १ |
| ३. | उप आयुक्त | S-२३ | ५६१००-१७७५०० | ५ | ५ | ५ |
| ४. | उप-संचालक (अर्थ व सांख्यिकी) | S-२० | ५६१००-१७७५०० | १ | १ | १ |
| ५. | सहाय्यक आयुक्त | S-२० | ५६१००-१७७५०० | ३ | ३ | ३ |
| ६. | सहाय्यक आयुक्त (वि. व ले) | S-२० | ५६१००-१७७५०० | १ | १ | १ |
| ७. | बाल मानस शास्त्रज्ञ | S-२० | ५६१००-१७७५०० | ४३ | ४३ | ४३ |
| ८. | परिवीक्षा अधीक्षक | S-२० | ५६१००-१७७५०० | १ | १ | १ |
| ९. | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी वर्ग-१ | S-२० | ५६१००-१७७५०० | ३० | ३० | ३० |
| १०. | वैद्यकीय अधिकारी-वर्ग १ | S-२० | ५६१००-१७७५०० | २ | २ | २ |
| | **एकूण वर्ग १** | | | **८८** | **८८** | **८८** |
| ११. | लेखा अधिकारी | S-१६ | ४४९००-१४२४०० | १० | १० | १० |
| १२. | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी वर्ग-२ | S-१७ | ४७६००-१५११०० | १२ | १२ | १२ |

| अ. क्र. | पदनाम | सुधारित वेतन मॅर्टिक्समधील वेतनस्तर | | पदसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतनस्तर | वेतन श्रेणी | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ | २०२६-२०२७ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १३. | सांख्यिकी अधिकारी | S-१५ | ४४९००-१४२४०० | २ | २ | २ |
| १४. | वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ | S-१७ | ४७६००-१५११०० | १३ | १३ | १३ |
| १५. | अधीक्षक वर्ग-२ | S-१७ | ४७६००-१५११०० | ६१ | ६१ | ६१ |
| १६. | अधिव्याख्याता | S-१७ | ४७६००-१५११०० | २ | २ | २ |
| १७. | निरिक्षक प्रमाणीत शाळा व संस्था वर्ग-२ | S-१७ | ४७६००-१५११०० | २ | २ | २ |
| १८. | रचना व कार्यपद्धती अधिकारी | S-१७ | ४७६००-१५११०० | १ | १ | १ |
| १९. | सहाय्यक लेखा अधिकारी | S-१५ | ४१८००-१३२३०० | ४२ | ४२ | ४२ |
| २०. | उप-अभियंता | S-१५ | ४१८००-१३२३०० | १ | १ | १ |
| | **एकूण वर्ग २** | | | **१४६** | **१४६** | **१४६** |
| २१. | जिल्हा परिवीक्षा अधिकारी | S-१६ | ४४९००-१४२४०० | ३६ | ३६ | ३६ |
| २२. | अधिक्षक जिल्हा परिवीक्षा अधिकारी | S-१६ | ४४९००-१४२४०० | १८ | १८ | १८ |
| २३. | निरीक्षक प्रमाणित शाळा व संस्था | S-१६ | ४४९००-१४२४०० | ६ | ६ | ६ |
| २४. | कार्यकारी सचिव | S-१६ | ४४९००-१४२४०० | १ | १ | १ |
| २५. | मुख्य अधिकारी | S-१६ | ४४९००-१४२४०० | १ | १ | १ |
| २६. | निम्नश्रेणी लघुलेखक | S-१५ | ४१८००-१३२३०० | ४ | ४ | ४ |
| २७. | प्रेस मॅनेजर | S-१४ | ३८६००-१२२८०० | १ | १ | १ |
| २८. | परिविक्षा अधिकारी/अधिक्षक प.अ | S-१४ | ३८६००-१२२८०० | २६१ | २७० | २७० |
| २९. | कार्यालय अधिक्षक | S-१४ | ३८६००-१२२८०० | ६ | ६ | ६ |
| ३०. | ओव्हरसिअर | S-१४ | ३८६००-१२२८०० | १ | १ | १ |
| ३१. | संरक्षणअधिकारी | S-१४ | ३८६००-१२२८०० | ३७ | ३७ | ३७ |
| ३२. | विधी सल्लागार | S-१४ | ३८६००-१२२८०० | ३७ | ३७ | ३७ |
| ३३. | समुपदेशक | S-१३ | ३५४००-११२४०० | ४७ | ४७ | ४७ |
| ३४. | प्रमुख लिपिक | S-१३ | ३५४००-११२४०० | १३ | १३ | १३ |
| ३५. | उप अधिक्षक | S-१३ | ३५४००-११२४०० | १ | १ | १ |
| ३६. | परिचारिका | S-१३ | ३५४००-११२४०० | ५२ | ५२ | ५२ |
| ३७. | कृषि पर्यवेक्षक | S-१३ | ३५४००-११२४०० | १ | १ | १ |
| ३८. | ग्रंथपाल | S-१० | २९२००-९२३०० | १ | १ | १ |
| ३९. | वरिष्ठ लिपिक | S-८ | २५५००-८११०० | ७६ | ७६ | ७६ |
| ४०. | निदेशक | S-८ | २५५००-८११०० | ५९ | ५९ | ५९ |
| ४१. | सुतार निदेशक | S-८ | २५५००-८११०० | २ | २ | २ |
| ४२. | वायरमन | S-८ | २५५००-८११०० | १ | १ | १ |
| ४३. | टर्नर फिटर | S-८ | २५५००-८११०० | १ | १ | १ |
| ४४. | शिवणकला निदेशक | S-८ | २५५००-८११०० | २ | २ | २ |
| ४५. | प्रेस निदेशक | S-८ | २५५००-८११०० | १ | १ | १ |
| ४६. | शिक्षक | S-८ | २५५००-८११०० | ३२ | ३२ | ३२ |
| ४७. | चित्रकला शिक्षक | S-०८ | २५५००-८११०० | १ | १ | १ |
| ४८. | संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) | S-०६ | १९९००-६३२०० | ३५८ | ३५८ | ३५८ |

तक्ता क्रमांक ३९–(चालू)

| अ. क्र. | पदनाम | सुधारित वेतन मॅर्टिक्समधील वेतनस्तर वेतनस्तर | वेतन श्रेणी | पदसंख्या २०२४-२०२५ | २०२५-२०२६ | २०२६-२०२७ |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| ४९. | डाटा एन्ट्री ऑपरेटर | S-०७ | २१७००-६९१०० | ३७ | ३७ | ३७ |
| ५०. | ट्रॅक्टर चालक | S-०७ | २१७००-६९१०१ | २ | २ | २ |
| ५१. | कनिष्ठ लिपिक | S-०६ | १९९००-६३२०० | १७७ | १७७ | १७७ |
| ५२. | यांत्रिकी | S-०८ | १९९००-६३२०० | १ | १ | १ |
| ५३. | सहाय्यक प्रेस निदेशक | S-०६ | १९९००-६३२०० | १ | १ | १ |
| ५४. | बँड मास्टर | S-०६ | १९९००-६३२०० | १ | १ | १ |
| ५५. | वाहन चालक | S-०६ | १९९००-६३२०० | ४४ | ४४ | ४४ |
| ५६. | कृषि सहाय्यक | S-०८ | २१७००-६९१०१ | ६ | ६ | ६ |
| ५७. | गृहपिता | S-०६ | २१७००-६९१०२ | २ | २ | २ |
| | **एकूण वर्ग ३** | | | **१३२८** | **१३३७** | **१३३७** |
| ५८. | जमादार | S-०३ | १६६००-५२४०० | १४ | १४ | १४ |
| ५९. | वरिष्ठ काळजीवाहक | S-०३ | १६६००-५२४०० | २०२ | २०२ | २०२ |
| ६०. | दफ्तरी | S-०३ | १६६००-५२४०० | १ | १ | १ |
| ६१. | नाईक | S-०३ | १६६००-५२४०० | १ | १ | १ |
| ६२. | स्वयंपाकी | S-०३ | १६६००-५२४०० | ९९ | ९९ | ९९ |
| ६३. | पहारेकरी/मुकादम | S-०१ | १५०००-४७६०० | २१ | २१ | २१ |
| ६४. | शिपाई | S-०१ | १५०००-४७६०० | ५२ | ५२ | ५२ |
| ६५. | कनिष्ठ काळजीवाहक | S-०१ | १५०००-४७६०० | २६७ | २६७ | २६७ |
| ६६. | परिचर | S-०१ | १५०००-४७६०० | २१ | २१ | २१ |
| ६७. | सफाईगार | S-०१ | १५०००-४७६०० | ९३ | ९३ | ९३ |
| ६८. | आया | S-०१ | १५०००-४७६०० | २ | २ | २ |
| ६९. | मदतनीस | S-०१ | १५०००-४७६०२ | ३ | ३ | ३ |
| | एकूण वर्ग ४ | | | ७७६ | ७७६ | ७७६ |
| | **एकूण सर्व** | | | **२३३८** | **२३४७** | **२३४७** |
| | **मानधनी पदे** | | | | | |
| १. | मानद वैद्यकीय अधिकारी | | | ४८ | ४८ | ४८ |
| २. | सुरक्षा रक्षक | | | ८७६ | ८७६ | ८७६ |
| ३. | फिरते सल्लागार | | | १ | १ | १ |
| ४. | तालुका स्तरावरील संरक्षण अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी बहुउद्देशीय कर्मचारी, (बाह्यस्त्रोताद्वारे) | | | ३५८ | ३५८ | ३५८ |
| ५. | तालुका स्तरावरील संरक्षण अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी सहाय्यक, (बाह्यस्त्रोतद्वारे) | | | ३५८ | ३५८ | ३५८ |
| | **एकूण मानधनी पदे** | | | **१६४१** | **१६४१** | **१६४१** |

प्रकरण १३

## एकात्मिक बाल विकास सेवा योजना ( जनरल ) दृष्टिक्षेपात

केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, महिला व बाल विकास विभागाचे आधिपत्याखाली नागरी, ग्रामीण, आदिवासी भागात राबविण्यात येते. ही योजना मुख्यत्वेकरून बालकांच्या पोषण व आरोग्यविषयक दर्जात सुधारणा करण्यासाठी तसेच बालमृत्यूचे व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने सन १९७५-७६ वर्षापासून टप्प्याटप्प्याने वाढ करून ''एकात्मिक बाल विकास सेवा योजना'' प्रकल्पाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. राज्यात ५५३ प्रकल्प कार्यान्वित असुन ग्रामीण क्षेत्रात ३६३, आदिवासी क्षेत्रात ८६ व नागरी क्षेत्रात १०४ प्रकल्प आहेत. त्याअंतर्गत ११०६३१ मोठी अंगणवाडी केंद्रामार्फत लाभार्थ्यांना अंगणवाडीच्या ६ सेवा पुरविण्यात येतात.

ग्रामीण, आदिवासी आणि नागरी क्षेत्रामध्ये सदरची योजना आयुक्तालय, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य नवी मुंबई, यांचे मार्फत राबविण्यात येते. सदर उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :—

**योजनेची उद्दिष्टे :**

(१) ०–६ वर्षे वयोगटातील मुलांचा पोषण व आरोग्यविषयक दर्जा सुधारणे.

(२) मुलांच्या योग्य मानसिक, शारीरिक व सामाजिक विकासाचा पाया घालणे.

(३) बालमृत्यूचे, बाल रोगांचे, कुपोषणाचे प्रमाण कमी करणे.

(४) बाल विकासास चालना मिळावी म्हणून विविध विभागांमध्ये धोरण व अंमलबजावणी याबाबत परिणामकारक समन्वय साधणे.

(५) योग्य अशा पोषण व आरोग्यविषयक शिक्षणाद्वारे बालकांचे सर्वसामान्य आरोग्य व त्यांच्या पोषणविषयी गरजांकडे लक्ष पुरविण्याविषयीची मातांची क्षमता वाढविणे.

### एकात्मिक बाल विकास सेवा योजनेत पुरविण्यात येणाऱ्या सेवा

**तक्ता क्रमांक ४०**

| अ. क्र. | सेवा प्रकार | लाभधारक |
|---|---|---|
| १. | पूरक पोषण आहार | ६ म. ते ६ वर्षे बालके, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता. |
| २. | लसीकरण | ० ते ६ वर्षे बालके, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता, किशोरी मुली. |
| ३. | आरोग्य तपासणी | ० ते ६ वर्षे बालके, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता, किशोरी मुली. |
| ४. | संदर्भ आरोग्य सेवा | ० ते ६ वर्षे बालके, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता. |
| ५. | आरोग्य आणि सकस आहार शिक्षण विषयक | १५ ते ४५ वर्षे वयोगटातील स्त्रिया |
| ६. | पूर्वशालेय शिक्षण | ३ ते ६ वर्षे बालके |

**१. पूरक पोषण आहार :**

ग्रामीण / आदिवासी आणि नागरी प्रकल्पातील सर्व अंगणवाडी केंद्रातील सर्वसाधारण क्षेत्रातील (जनरल) लाभार्थ्यांकरिता शासन निर्णय दिनांक २४-८-२००९ अन्वये निश्चित केलेल्या पूरक पोषण आहाराचा पुरवठा खालील आहाराच्या प्रमाणात व सुधारित दरानुसार करण्यात येत आहे. या सेवेअंतर्गत ६ महिने ते ३ वर्षांपर्यंतची सर्वसाधारण बालके यांना ५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने असलेला आहार घरी नेवून खाण्यासाठी (Take Home Ration ), ६ महिने ते ६ वर्षे पर्यंतची सर्वसाधारण बालकांना ५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने असलेला आहार दिला जातो. त्यामध्ये ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना THR (घरी नेऊन खाण्यासाठी) दिला जातो व ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कमी वजनाच्या बालकांना लाभार्थ्याला नियमित गरम ताजा आहारा अतिरिक्त THR देण्यात येतो सकाळचा नाश्ता व दूपारचे जेवण म्हणून अंगणवाडीत खाऊ घालणे, ६ महिने ते ६ वर्षे पर्यंतची अतितीव्र कमी वजनाच्या बालकांना ८०० उष्मांक आणि २० ते २५ ग्रॅम प्रथिने असलेला आहार दिला जातो. त्यामध्ये ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना THR (घरी नेऊन खाण्यासाठी) दिला जातो व ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना नियमित गरम ताजा आहार देण्यात येतो. तसेच गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना ६०० उष्मांक आणि १८ ते २० ग्रॅम प्रथिने असलेला आहार घरी नेऊन खाण्यासाठी (Take Home Ration ) देण्यात येतो. शासन निर्णयातील निर्देशानुसार THR असो किंवा गरम ताजा आहार असो हा आहार भरपूर उष्मांकयुक्त Energy Dense असे अन्न कि ज्यामधून कमीत कमी आहारामध्ये जास्तीत जास्त उष्मांक मिळेल, तसेच (Micronutrient Fortified Food ) यामध्ये दैनंदिन आवश्यकता भागविण्यासाठी क्षार व जीवनसत्व आहारामध्ये मिसळणे आवश्यक आहे. तसेच अन्न व भेसळ कायदा (PFA) एकात्मिक अन्न व कायदा (IFL) शिशू व बाल पोषणाच्या पद्धती (IYCF) यांनी निर्देशित केलेल्या प्रमाणानुसार असावा असे निर्देशित केलेले आहे.

पाककृती पुढीलप्रमाणे –

(अ) THR पाककृती (घरी नेऊन खाण्यासाठी)

**लाभार्थी गटनिहाय पाककृती खालीलप्रमाणे आहेत.**

**गरम ताजा आहार** (HOT COOK MEAL)

**(अ) ३ ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थी – (सकाळाचा नाश्ता)**

| पाककृतीमधील धान्याचा प्रकार | प्रतीदिन प्रती लाभार्थी द्यावयाचे प्रमाण (वजन ग्रॅम) | उष्मांक (कि. कॅलरीज) | प्रथिने (ग्रॅम) |
|---|---|---|---|
| गहू | ४० | १२८.८० | ४.२४ |
| साखर / गुळ | ८ | ३२.०० | ०.०० |
| सोयाबीन | ३ | २७.०० | ०.०० |
| | **एकूण –१६६** | **१८७.८०** | **४.२४** |

**(ब) ३ ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थी (दुपारचे जेवन)** –

| पाककृतीमधील धान्याचा प्रकार | प्रतीदिन प्रती लाभार्थी द्यावयाचे प्रमाण (वजन ग्रॅम) | उष्मांक (कि. कॅलरीज) | प्रथिने (ग्रॅम) |
|---|---|---|---|
| चना/चवळी/वाटाना | २४ | ७७.०४ | ४.५१ |
| मूगडाळ/मसूर डाळ/तुर डाळ | १० | ३२.६० | २.४० |
| तांदूळ | ३८ | १३५.३९ | ३.०४ |
| मिरची पावडर | २ | ४.७५ | ०.२५ |
| हळद पावडर | २ | ५.६१ | ०.१५ |
| मीठ | ४ | ०.०० | ०.०० |
| सोयाबीन तेल | ७ | ६३.०० | ०.०० |
| **एकूण –** | | **३१८.३९** | **१०.३६** |

सदर पाककृती वरीलप्रमाणे ठेऊन त्यासाठी जिल्हानिहाय / विभागनिहाय कच्चे धान्य व किराणा माल पुरविण्यासाठी निविदा राबविणे आवश्यक आहे.

**(क) घरपोच आहार (THR) पाककृती**

| अ.क्र. | लाभार्थी गट | | पाककृती | आहाराचा दर (प्रती मेट्रिक) | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील सर्वसाधारण बालके (नियमित आहार) | (i) | Energy Dense Moong Dal Khichdi Premix fortified with essential micronutrients | ७४९७० | ५०० | १२ ते १५ |
| | | (ii) | Energy Dense Tur Dal Khichdi Premix fortified with essential micronutrients | ६६७८० | | |
| | | (iii) | Multi mix cereals and Protein | ५५७५५ | | |
| | | (iv) | Multi mix cereals and Protein Premix (Millet Base) | ५५७५५ | | |
| २. | ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कुपोषित बालके (अतिरिक्त आहार) | (i) | Energy Dense Moong Dal Khichdi Premix fortified with essential micronutrients | ७४९७० | ३०० | ८ ते १० |
| ३. | गर्भवती व स्तनदा माता आणि ४ आकांक्षित जिल्ह्यातील किशोरवयीन मुली | (i) | Energy Dense Moong Dal Khichdi Premix fortified with essential micronutrients | ७२८७० | ६०० | १८ ते २० |
| | | (ii) | Energy Dense Tur Dal Khichdi Premix fortified with essential micronutrients | ६४३६५ | | |
| | | (iii) | Multi mix cereals and Protein | ५३६५५ | | |
| | | (iv) | Multi mix cereals and Protein Premix (Millet Base) | ५२०२७.५०० | | |

उपरोक्त पूरक पोषण आहार महिन्यातून किमान २५ दिवस व वर्षातून ३०० दिवस देण्यात येतो.

**२. लसीकरण :**

या सेवेअंतर्गत ६ वर्षा आतील सर्व बालकांना वयानुसार सहा बालरोगांपासून संरक्षण करण्यासाठी क्षय रोग प्रतिबंधक, डिपीटी, पोलिओ, गोवर लस देण्यात येतात. तसेच गरोदर स्त्रियांना धनुर्वातापासून संरक्षण करण्यासाठी धनुर्वात प्रतिबंधक लस देण्यात येते. लसीकरण कार्यक्रम राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत अंगणवाडी सेविकांच्या पुढाकाराने राबविण्यात येतो.

**३. आरोग्य तपासणी :**

या सेवेअंतर्गत ६ वर्षातील सर्व बालके, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांची दर महिन्यात आरोग्य तपासणी आरोग्य विभागाकडून आरोग्य तपासणी करण्यात येते. तीव्र कमी वजनाच्या बालकांची वर्षातून किमान दोन वेळा आरोग्य तपासणी करण्यात येऊन औषधोपचार करण्यात येतो. अंगणवाडी केंद्रास प्रती अंगणवाडी केंद्रास प्रमाणे मेडिसिन किट पुरविण्यात येते.

**४. आरोग्य संदर्भ सेवा :**

या सेवेअंतर्गत तीव्र कमी वजनाची बालके, आजारी बालके, गरोदर व स्तनदा माता यांना गरजेप्रमाणे उपचारार्थ जवळच्या उपकेंद्रात, प्राथमिक आरोग्य केंद्रांत, ग्रामीण रुग्णालयात पाठवून संदर्भ सेवा देण्यात येतात.

**५. आरोग्य आणि सकस आहार विषयक शिक्षण :**

१५–४५ वर्षे वयोगटातील स्त्रियांना बालकांचा विकास साधण्याचे दृष्टीने पोषण आहार व आरोग्य विषयी आरोग्य शिक्षण देण्यात येते.

**६. पूर्व शालेय शिक्षण :**

३–६ वर्षे वयोगटातील बालकांच्या भौतिक व सामाजिक विकास साधण्याचे दृष्टीने तसेच शालेय शिक्षणात गोडी निर्माण करण्याचे दृष्टीने अनौपचारिक शिक्षण देण्यात येते. सदरचे शिक्षण आकार अभ्यासक्रमाप्रमाणे देण्यात येते.

**नवसंजीवन प्रकल्प :––**

राज्यातील अतिसंवेदनशील आदिवासी क्षेत्रातील धारणी, चिखलदरा (अमरावती जिल्हा), अक्कलकुवा यामध्ये तीन प्रकल्प आहेत. (अक्कलकुवा, अक्कलकुवा मोलगी, अक्कलकुवा–२), धडगाव यामध्ये देखील ३ प्रकल्प आहेत. (धडगाव, धडगाव कुंटामोही, धडगाव–२), तळोदा (नंदुरबार जिल्हा), एटापल्ली, भामरागड, गडचिरोली जिल्हा, नाशिक, हरसूल (नाशिक जिल्हा), तलासरी, डहाणू यामध्ये २ प्रकल्प (डहाणू व डहाणू कासा), जव्हार यामध्ये २ प्रकल्प (जव्हार व जव्हार–२), मोखाडा, शहापूर यामध्ये २ प्रकल्प (शहापूर व शहापूर डोलखांब), मुरबाड यामध्ये २ प्रकल्प (मुरबाड व मुरबाड–२), वाडा यामध्ये २ प्रकल्प (वाडा व वाडा–२), एकूण १५ नवसंजीवन प्रकल्प २४ प्रकल्पांमध्ये विभागले गेलेले आहेत.

सर्वसाधारणपणे ग्रामीण व शहरी क्षेत्रांत ८०० ते १००० व आदिवासी क्षेत्रात ३०० ते ८०० लोकसंख्येसाठी एक अंगणवाडी केंद्र सुरू करण्यात येते. त्याचप्रमाणे १५० पेक्षा जास्त व ४०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या वस्तीत एक मिनी अंगणवाडी केंद्र सुरू करता येते व आदिवासी क्षेत्रात १५० ते ३०० च्या दरम्यान लोकसंख्या असलेल्या वस्तीत एक याप्रमाणे मिनी अंगणवाडी केंद्र सुरू करण्यात येते.

**(अ) ग्रामीण प्रकल्प :––**

राज्यातील ३६४ ग्रामीण प्रकल्प जिल्हा परिषद व पंचायत समित्यामार्फत राबविण्यात येतात. ही योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद, पंचायत समिती अधिनियम, १९६२ च्या कलम १२३ अन्वये जिल्हा परिषदांना अभिकरण तत्त्वावर राबविण्यासाठी सोपविण्यात आली आहे. ही योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदांना प्रतिवर्षी ५% अभिकरण शुल्क देण्यात येते. राज्यातील ग्रामीण प्रकल्पातील अंगणवाडी पोषण केंद्राची संख्या, लक्षित लाभार्थ्यांची एकूण संख्या व प्रत्यक्ष लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची संख्या स्वतंत्र तक्त्यामध्ये देण्यात आली आहे.

ग्रामीण प्रकल्पात ० ते ६ वर्षे वयोगटातील मुला-मुलींच्या कुपोषणाच्या सद्यःस्थितीची तपशिलवार आकडेवारी स्वतंत्र तक्त्यामध्ये देण्यात आली आहे.

**(ब) आदिवासी प्रकल्प :––**

राज्यातील ८५ आदिवासी प्रकल्प जिल्हा परिषद मार्फत राबविण्यात येतात. ही योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६२ च्या कलम १२३ अन्वये जिल्हा परिषदांना अभिकरण तत्त्वावर राबविण्यासाठी सोपविण्यात आली आहे. ही योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदांना प्रतिवर्षी ५% अभिकरण शुल्क देण्यात येते. राज्यातील ग्रामीण प्रकल्पातील अंगणवाडी पोषण केंद्रांची संख्या लक्षित लाभार्थ्यांची एकूण संख्या व प्रत्यक्ष लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची संख्या स्वतंत्र तक्त्यामध्ये देण्यात आली आहे.

आदिवासी प्रकल्पात ० ते ६ वर्षे वयोगटातील मुला-मुलींच्या कुपोषणाच्या सद्यःस्थितीची तपशिलवार आकडेवारी स्वतंत्र तक्त्यात देण्यात आली आहे.

**(क) नागरी प्रकल्प :––**

राज्यात १०४ नागरी प्रकल्प असून, नागरी विभागातील गलिच्छ वस्त्यांमधील सकस आहार योजना व एकात्मिक बाल विकास सेवा योजना राबविण्यात येते.

(१) बाल विकास प्रकल्प अधिकारी व मुख्यसेविका यांचेकडून अंगणवाडी केंद्रांना, तसेच आयुक्तालयातील अधिकारी हे देखील या प्रकल्पास व अंगणवाडी केंद्रास अचानक भेटी देऊन लाभार्थ्यांची पाहणी व मार्गदर्शन केले जाते.

राज्यातील नागरी प्रकल्पातील अंगणवाडी पोषण केंद्रांची संख्या, लक्षित लाभार्थ्यांची एकूण संख्या व प्रत्यक्ष लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची संख्या स्वतंत्र प्रपत्रामध्ये देण्यात आली आहे.

नागरी प्रकल्पात ० ते ६ वर्षे वयोगटातील मुला-मुलींच्या कुपोषणाच्या सद्यःस्थितीची तपशिलवार आकडेवारी स्वतंत्र तक्त्यात देण्यात आली आहे.

**प्रशिक्षण कार्यक्रम :––**

प्रशिक्षित मनुष्यबळ एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीकरिता अत्यावश्यक आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची व्याप्ती व कर्मचाऱ्यांची मोठी संख्या लक्षात घेता शिक्षणाच्या सुविधा या कार्यक्षमपणे तसेच वेळोवेळी उपलब्ध करून देण्यासाठी खालील प्रकारची यंत्रणा सध्या अस्तित्वात आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | कार्यरत असलेली अंगणवाडी कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्रे | ३० |
| २. | कार्यरत असलेली मध्यमस्तर प्रशिक्षण केंद्रे | ५ |

## एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत राबविण्यात येणारे विविध उपक्रम व योजना

### (१) किशोरवयीन मुलींसाठी योजना (SAG)

सन २०२२-२०२३ पासून राज्यातील गडचिरोली, नंदुरबार, उस्मानाबाद, वाशिम या ४ आकांक्षित जिल्ह्यातील ४३ प्रकल्पांमध्ये सुधारित किशोरवयीन मुलींसाठी योजना (SAG) सुरु करण्यात आलेली आहे.

सदर योजने अंतर्गत किशोरवयीन मुलींना स्वयंविकास आणि सबलीकरणाकरिता सक्षम करणे, त्यांच्या पोषणाची व आरोग्याची स्थिती सुधारणे, त्यांच्यामध्ये आरोग्य, स्वच्छता, पोषण, पौगंडावस्थेतील प्रजनन, आणि लैगिंक आरोग्य, कुटुंब व मुलांची काळजी याबाबत जागृती करणे, त्यांच्या गृह कौशल्ये, जीवन कौशल्ये आणि व्यावसायिक कौशल्यांमध्ये सुधारणा करणे, शाळाबाह्य किशोरावस्थेतील मुलींना औपचारिक/अनौपचारिक शिक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणणे. त्यांना सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र, सामाजिक आरोग्य केंद्र, टपाल कार्यालय, बँक, पोलीस ठाणे इत्यादी सार्वजनिक सेवांबाबत माहिती देणे आणि मार्गदर्शन करणे

गडचिरोली, नंदुरबार, उस्मानाबाद, वाशिम या ४ जिल्ह्यातील १४ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींसाठी पोषण आहारांतर्गत घरपोच आहार म्हणून कच्चे धान्य दिले जाते. तसेच जीवन कौशल्य, आहार व आरोग्य विषयक माहिती व व्यवसाय प्रशिक्षण याबाबतचे प्रशिक्षण दिले जाते. किशोरवयीन मुलींना प्रति लाभार्थी प्रति दिन रु. ९.५० प्रमाणे केंद्र शासन ५०% व राज्य शासन ५०% असा खर्च केला जातो.

### (२) भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना :

अनुसूचित क्षेत्रातील आहारातील उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे स्त्रियांमध्ये कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण जास्त असून आदिवासी समाजामध्ये याचे प्रमाण ३३.१ टक्के एवढे असल्याचे निदर्शनास आले. आदिवासी स्त्रियांमध्ये गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये वजनवाढीचे प्रमाण कमी असल्यामुळे या कालावधीत मातेचे आरोग्य व पोषण चांगले राहणे आवश्यक आहे, कारण त्याचा परिणाम जन्माला येणाऱ्या बालकावर देखील होतो आणि म्हणून दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना दिनांक १ डिसेंबर, २०१५ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. सदर योजनेत अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाडी/मिनी अंगणवाडी क्षेत्रातील सर्व गरोदर मातांना गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीत व स्तनदा माता यास पहिल्या तिमाहीत एक वेळ चौरस आहार देण्यात येतो. शासन निर्णय दिनांक २ ऑगस्ट, २०१६ नुसार महिलांना लाभ देण्याचा कालावधी वाढवून स्त्री गरोदर असल्याचे निश्चित झाल्यापासून तिला लाभ दिला जातो तसेच स्तनदा मातेस बाळंतपणाच्या नंतर पुढील सहा महिन्यांपर्यंत सदर योजनेचा लाभ दिला जातो. सदर योजना १६ आदिवासी जिल्ह्यातील ८५ एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत कार्यक्षेत्रात राबविण्यात येत होती. शासन निर्णय दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ नुसार हे कार्यक्षेत्र वाढवून अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गावे ही यात समाविष्ट केली गेली.

तसेच शासन निर्णय दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ नुसार अनुसूचित क्षेत्रातील व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना अंडी/केळी/ऋतुमानानुसार पुरवणारा टप्पा २ सुरू करण्यात आला.

**योजनेची उद्दिष्टे**

(१) अनुसूचित क्षेत्रात गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांच्या आरोग्याची काळजी घेणे.

(२) कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण कमी करणे.

(३) कुपोषणाला निर्मूलन.

(४) स्त्रियांमधील ऍनिमियाचे प्रमाण कमी करणे.

**योजनेचे लाभार्थी (अंगणवाडीत नोंदविलेले)**

(१) गरोदर माता

(२) स्तनदा माता

(३) ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थी

**लाभाचा प्रकार :**

(१) गरोदर व स्तनदा मातेस महिन्यातून २५ दिवस चौरस आहार दिला जातो.

(२) ७ महिने ते ६ वर्ष वयाच्या बालकांना १ अंडी (मांसाहारी मुलांकरिता) किंवा २ केळी (शाकाहारी मुलांकरिता ऋतुमानानुसार फळ) दिले जाते.

**(३) माझी कन्या भाग्यश्री योजना :**

सदर योजना अधिक्रमित करून ''लेक लाडकी योजना'' सुरू करण्यात आलेली आहे.

**लेक लाडकी योजना :** माझ्री कन्या भाग्यश्री (सुधारीत) ही योजना अधिक्रमित करून महिला व बालविकास विभाग शासन निर्णय दिनांक ३० ऑक्टोबर,२०२३ अन्वये राज्यात मुलींच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी ही नवीन योजना सुरू करण्यात आली असून, पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात मुलींच्या जन्मानंतर टप्प्याटप्प्यामध्ये अनुदान देण्यात येवून लाभार्थी मुलींचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला ७५ हजार रुपये १,०१,०००/- ऐवढी रक्कम देण्यात येईल.

**सदर योजनेची उदिष्ट्ये खालीलप्रमाणे राहतील :**

(१) मुलींच्या जन्मास प्रोत्साहन देवून मुलींचा जन्मदर वाढविणे.

(२) मुलींच्या शिक्षणास चालना देणे.

(३) मुलींचा मृत्यूदर कमी करणे व बालविवाह रोखणे.

(४) कुपोषण कमी करणे

(५) शाळाबाह्य मुलींचे प्रमाण ० (शून्य) वर आणण्यासाठी प्रोत्साहित करणे.

सदर योजनेअंतर्गत खालील अटी व शर्ती व त्याकरीता नमूद आवश्यक कागदपत्रे यांच्या आधारे पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबात जन्मलेल्या मुलींसाठी

मुलींच्या जन्मानंतर **५ हजार रुपये,**

इयत्ता पहिलीत **६ हजार रुपये,**

सहावीत **७ हजार रुपये,**

अकरावीत **८ हजार रुपये,**

तर लाभार्थी मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला **७५ हजार रुपये,**

याप्रमाणे एकूण रुपये **१,०१,०००/-** एवढी रक्कम देण्यात येईल.

**(अ) अटी व शर्ती**

१) अटी ही योजना पिवळ्या व केशरी शिधापत्रिका धारक कुटुंबामध्ये दिनांक १ एप्रिल, २०२३ रोजी व त्यानंतर जन्माला येणाऱ्या एक अथवा दोन मुलींना लागू राहील तसेच एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लागू राहील.

२) पहिल्या आपत्याच्या तिसऱ्या हप्त्यासाठी व दुसऱ्या आपत्याच्या दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज सादर करतेवळी माता/पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

३) तसेच दुसऱ्या प्रसूतीच्या वेळी जुळी आपत्ये जन्मला आल्यास एक मुलगी किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. मात्र त्यानंतर माता / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील.

४) दिनांक १ एप्रिल,२०२३ पूर्वी एक मुलगी / मुलगा आहे व त्यानंतर जन्माला आलेल्या दुसऱ्या मुलीस किंवा जुळ्या मुलींना (स्वतंत्र) ही योजना अनुज्ञेय राहील. मात्र माता / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील.

५) लाभार्थींचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असणे आवश्यक राहील.

६) लाभार्थी बँक खाते महाराष्ट्र राज्यात असणे आवश्यक आहे.

७) लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. १ लाखा पेक्षा जास्त नसावे.

**(ब) आवश्यक कागदपत्रे :**

१) लाभार्थीचा जन्माचा दाखला.

२) कुटुंबप्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न १ लाखापेक्षा जास्त नसावे.) याबाबत तहसिलदार / सक्षम अधिकारी यांचा दाखला आवश्यक राहील.

३) लाभार्थीचे आधार कार्ड (प्रथम लाभावेळी ही अट शिथील राहील.)

४) पालकाचे आधार कार्ड

५) बँकेच्या पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.

६) रेशनकार्ड पिवळे अथवा केशरी रेशनकार्ड साक्षांकित प्रत.

७) मतदान ओळखपत्र (शेवटच्या लाभाकरीता १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर मुलीचे मतदार यादीत नाव असल्यास दाखला)

८) संबंधित टप्यावरील लाभाकरिता शिक्षण घेत असल्याबाबतचा संबधित शाळेचा दाखला (Bonafied)

९) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया प्रमाणपत्र (''अ'' येथील अटी शर्तीमधील क्रमांक २ येथील अटीनुसार )

१०) अंतिम लाभाकरिता मुलीचा विवाह झालेला नसणे आवश्यक राहील (अविवाहित असल्यास लाभार्थीचे स्वयंघोषणापत्र)

**(४) ग्राम बाल विकास केंद्र (VCDC)**

सदर योजना सन २०१७ पासून आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रात राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. राज्यातील अतितीव्र कुपोषित (बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडी स्तरावर दिनांक १ जुलै, २०१८ पासून ग्राम बाल विकास केंद्र सुरू करण्यात आली आहेत. या अंतर्गत कुपोषित बालकांना एका महिन्याकरिता अंगणवाडीत दिवसभर ठेवण्यात येते. अंगणवाडी बालकांना दररोज नियमित ३ वेळेच्या आहाराव्यतिरिक्त अतिरिक्त ३ वेळा पौष्टीक आहार देण्यात येतो. अंगणवाडीत बालकांना आवश्यकतेनुसार डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार करण्यासाठी तसेच आरोग्य विभागाच्या मदतीने सर्वप्रकारच्या औषधोपचार करण्यात येतो. त्यामध्ये बालकांना एनर्जी डेक्स न्युट्रीशियस फुड हा शास्त्रोक्त पध्दतीने तयार केलेला आहार देण्यात येत आहे व त्याचे ग्रोथ मॉनिटरींग करण्यात येत आहे.

**''नागरी बाल विकास केंद्र (UCDC)''**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ग्रामीण भागात सॅम बालकांना सर्वसाधारण श्रेणीत आणण्यासाठी सुरु असलेल्या ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) च्या धर्तीवर राज्यात नागरी बाल विकास केंद्र (UCDC) सुरु करण्यास महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१९/ प.क्र.१२९/का-५(ए-६९८१२१०), दि.५ मार्च, २०२४ अन्वये शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये सॅम बालकांना पूरक पोषण आहारासोबत ENDF आहाराचा पुरवठा करण्यात येणार आहे. शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार आयुक्त, एबाविसेयो या कार्यालयामार्फत ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) व नागरी बाल विकास केंद्र (UCDC) मध्ये ENDF पुरवठ्यासाठी निविदा राबविण्यात आली आहे. सद्यस्थितीत निविदा मंजूरीस्तव शासनाकडे प्रस्तावित आहे.

**(५) पूर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण :**

पूर्व बाल्यावस्था म्हणजेच जीवनातील पहिला सहा वर्षाचा जडणघडणीचा काळ असतो. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या ६ सेवांपैकी पूर्व शालेय अनौपचारिक शिक्षण ही एक सेवा आहे. या सेवेच्या नावात बदल करून आता पूर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण (ECCE) असे करण्यात येऊन सन २०१६ पासून सर्व अंगणवाडी केंद्रात ''आकार'' बाल शिक्षण क्रमाद्वारे अंगणवाडी केंद्रात येणाऱ्या ३ ते ६ वर्षे वयाच्या २८ लाख बालकांना शिक्षण देण्यात येत आहे. पूर्व बाल्यावस्थेतील शिक्षणाकरिता या विभागाने शिक्षण विभाग, युनिसेफ, निपसीड व या विषयातील तज्ञ व्यक्ती यांचे सहकार्याने ''आकार'' विशेष बाल शिक्षणक्रम तयार करून राज्यातील सर्व मुख्यसेविका/पर्यवेक्षिका व अंगणवाडी सेविका यांना ''आकार'' बाल शिक्षणक्रमाचे ६ दिवसांचे विशेष प्रशिक्षण देण्यात आलेले आहे

**(६) Public Financial Management System (PFMS) :**

राज्यातील २ लाख अंगणवाडी सेविका/मदतनीस यांचे मासिक मानधन वितरणास पूर्वी सुमारे ६ महिने होणारा विलंब, त्यांची आर्थिक व मानसिक कुचंबणा व त्यामुळे योजनेच्या दैनंदिन कामकाजातील अडथळे यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या हेतुने मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व मंत्री, महिला व बाल विकास यांनी मानधन वितरणाचे काम PFMS प्रणाली अंतर्गत करण्यास मान्यता दिली.

शासनाचे पत्र दिनांक २ मार्च, २०१६ अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना त्यांचे दरमहाचे मानधन दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून केंद्र शासनाचे PFMS (Public Financial Management System/सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली) या प्रणालीमार्फत त्यांचे आधारकार्ड संलग्न बँक खात्यामध्ये (Direct Beneficiary Transfer) थेट रित्या जमा करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दिनांक १४ फेब्रुवारी, २०१७ अन्वये अंगणवाडी सेविका/मदतनीस यांचे मानधन केंद्र शासनाच्या PFMS प्रणालीद्वारे आयुक्तालयामार्फत अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

राज्यातील ५५३ ग्रामीण/नागरी प्रकल्पातील संपूर्ण अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे मानधन आयुक्तालयाने एकत्रितरित्या आहरित करून त्यांचे बँक खात्यामध्ये प्रदान करणेस्तव हजेरी घेण्यासाठी आवश्यक असलेली संगणकीय प्रणाली एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयाने विकसित केलेली आहे. सदर प्रणालीचे उद्‌घाटन दिनांक ३ जुलै, २०१७ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते करण्यात आले. अशाप्रकारे PFMS प्रणालीमधून मानधन अदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. सदरचे कामकाज माहे जुलै, २०१७ पासून सुरू करण्यात आले आहे.

**(अ) आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न करतेवेळी प्रणालीमध्ये खालीलप्रमाणे टप्पे आहेत.**

(१) सेविका/मदतनीस यांनी स्थानिक बँकेला विहित नमुन्यातील अर्ज भरून देणे.

(२) बँकेने त्यांचेकडील प्रणालीमध्ये आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न करणे.

(३) स्थानिक बँकेने त्यांचे विभागीय स्तरावरील बँकेस व रिजर्व बँक ऑफ इंडिया च्या कोअर बँकिंग सर्व्हरशी माहिती (CBS Server) Share करणे.

(४) CBS Server मधील सदरची माहिती NPCI, New Delhi (National Payment Corporation India, New Delhi) च्या सर्व्हरशी Share करणे.

(५) वरीलप्रमाणे NPCI सर्व्हरमध्ये आधारकार्ड संलग्न खात्याची माहिती उपलब्ध असले तर संबंधित सेविका/मदतनीस यांची नोंदणी (Registered) PFMS मध्ये पूर्ण होते असे Registration पूर्ण झालेनंतरच त्या सेविकेला मानधन प्रदान करणे शक्य होते.

**(ब) आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न** (Seeding) **करतेवेळी खालील तांत्रिक अडचणींमुळे प्रक्रियेमध्ये नोंदणी नाही व विलंब लागतो.**

(१) बँक खाते Active नसलेने किंवा काही कारणास्तव बंद.

(२) बँक सर्व्हर कडून Core Banking Server वर Data Transfer न होणे.

(३) १२ अंकी आधार कार्ड क्रमांक स्वतः ऐवजी घरातील इतर व्यक्तिचा देणे.

(४) अंगणवाडी सेविकांचे नावावर चुकून मदतनीस यांचा तपशिल संगणकात भरणे.

(५) अंगणवाडी मदतनीसांची सेविका पदावर पदोन्नती झाल्यावर पुर्वीचा तपशील दुरूस्त करणे .... माहिती भरणे.

(६) संगणकामधील Data Corrupt होणे.

**(क) ज्या अंगणवाडी सेविका/मदतनीस यांचे आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न आहेत त्या सेविका व मदतनीस यांची नोंदणी केंद्र शासनाच्या PFMS प्रणालीमध्ये करण्यात आलेली आहे. राज्यातील एकूण २.०२ सेविका/मदतनीस यांचेपैकी आज अखेर १.९९ लाख एवढ्या सेविका व मदतनीस यांची नोंदणी PFMS प्रणालीमध्ये पूर्ण करण्यात आलेली आहे.**

**(७) पोषण अभियान :**''पोषण अभियान'' हा मा. प्रधानमंत्री यांचा देशातील समग्र पोषणावर आधारित महत्त्वाच्या कार्यक्रम केंद्र शासनाच्या मान्यतेने महिला व बाल विकास विभागामार्फत महाराष्ट्र राज्यात सुरू करण्यात आले आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत सन २०१८-१९ पासून राज्यातील ३० जिल्ह्यांतील ८५ अंगणवाड्यांत पोषण अभियान राबविण्यात येत आहे. तसेच उर्वरित ६ जिल्ह्यांमध्ये सन २०१९-२० या आर्थिक वर्षात पोषण अभियानाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. पोषण अभियान अंतर्गत आगामी ३ वर्षात **कुपोषणाचे प्रमाण ६% नी (प्रति वर्ष २% प्रमाणे) कमी करणे तसेच लहान बालके, किशोरवयीन मुली व महिलांमधील रक्तक्षय (ॲनेमिया) चे प्रमाण ९% नी (प्रती वर्ष ३% प्रमाणे) कमी करणे व जन्मतः कमी वजनाचे बालकांचे प्रमाण (LBW) ६% नी (प्रती वर्ष २% प्रमाणे) कमी करणे** ही प्रमुख उद्दिष्टे ठेवण्यात आलेली आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत पोषण अभियानाची राज्यात अंमलबजावणी करणे महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय यांनी शासन निर्णय क्र. एबावि-२०१८/प्र.क्र.२७/का-०६ दिनांक ११/७/२०१८ अन्वये शासन निर्णय निर्गमित केला आहे. या शासन निर्णयान्वये राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये पोषण अभियान अंतर्गत विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

पोषण अभियान अंतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात येत असून त्यामध्ये ग्राम विकास विभाग, आरोग्य विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग इ. विभागांचा समावेश करण्यात आलेला आहे. यासाठी जिल्हा व गट (Block) स्तरावर अभिसरण समिती (Convergence Committee) गठीत करण्यात आलेली आहे.

पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरून (Incremental Learning Ap) (ILA), Community Based Event (CBE), Information Communication Technology-Enable Time Monitoring व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत. Information Community Technology-enabled Real Time Monitoring (ICT-RTM) या कार्यक्रमांतर्गत सर्व अंगणवाडी सेविकांना अँड्रॉईड बेस्ड मोबाईल फोनचा डाटा प्लॅनसह पुरवठा करण्यात आलेला असून त्याकरिता पोषण ट्रॅकर तयार करण्यात आलेले आहे. सदर सॉफ्टवेअर वापराबाबतचे सर्व अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. सद्यःस्थितीत अंगणवाडीचा अभिलेख लेखी स्वरुपात रजिस्टरमध्ये ठेवण्यात येतो. सॉफ्टवेअरच्या वापरामुळे सदरचा अभिलेख डिजीटाईज करण्यात येणार असून भविष्यात फक्त एकच रजिस्टर अंगणवाडीत ठेवण्यात येणार आहे. तसेच अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांचे तंतोतंत वजन व उंची घेण्याकरिता (१) Infantometer, (२) Stadiometer, (३) Mechanical Weighing Scales (infant), (४) Digital Weighing Scales (mother & child) असे वाढ/विकास निरीक्षण साधने (Growth Monitoring Devices) अंगणवाडी केंद्रास उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

पोषण अभियान हे जनतेचे आंदोलन व्हावे, या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन त्यामध्ये पंचायतराज संस्था, महिला बचत गट, स्थानिक स्वयंसेवी संस्था इत्यादीचा सहभाग घेण्यात येत आहे. जन आंदोलन हा पोषण अभियान या कार्यक्रमाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. जन मानसांत कुपोषण निर्मुलन, पोषक आहाराचे सेवन, निव्वळ स्तनपान, बालकांकरिता वरचा आहार, किशोरी व गरोदर/स्तनदा माता यांचेकरिता पोषण आहार, बालक महिला व किशोरी यांचेमधील रक्तक्षयाचे प्रमाण कमी करणे इत्यादी विषयांबाबतची व्यापक प्रमाणात जनजागृती व लोकसहभागातून लोक चळवळीची उभारणी करणे व ती निरंतर चालू ठेवणे हा पोषण अभियानातील जन आंदोलनाचा महत्त्वाचा उद्देश आहे.

पोषण अभियानाचे प्रभावी संनियंत्रण व अंमलबजावणी करणे करिता संस्थात्मक संरचना केंद्र, राज्य, जिल्हा व प्रकल्प स्तरावर करण्यात येत असून केंद्र स्तरावर केंद्रीय पोषण संसाधन कक्ष (National Nutrition Resource Centre) व राज्य स्तरावर राज्य पोषण संसाधन कक्ष (State Nutrition Resource Centre) स्थापित केलेले आहे.

**(८) Village Health Sanitation and Nutrition Day (VHSND) :-**

इतर विभागाच्या समन्वय व अभिसरणातून Village Health Sanitation and Nutrition Day (VHSND) महिन्यातून एकदा प्रत्येक अंगणवाडी केंद्रात आयोजित करण्यात येत आहेत.

वृद्धी संनियंत्रण आणि THR घरपोच आहाराचे वाटप करणे, लाभार्थी THR सेवन करत असल्याबाबतची गृहभेट देऊन खात्री करणे.

गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना ANC (Antenatal Care), PNC (Post Natal Care) बाबत माहिती देणे.

लाभार्थ्यांचे हिमोग्लोबीन तपासणे व त्यांना लोहयुक्त गोळ्यांचे (IFA Tablets) चे वाटप करणे.

समुदायाला आहार व आरोग्य शिक्षण या विषयाचे समुपदेशन करणे.

संदर्भ सेवेची आवश्यकता असलेल्या लाभार्थ्यांची निवड करणे व निवड केलेल्या लाभार्थ्यांना संदर्भ सेवेकरिता पाठविणे.

**(९) बेबी केअर किट :** शासन निर्णय क्र. एबावि-२०१८/प्र.क्र.१५१/का-६ दि.२९ डिसेंबर २०१८ नुसार महाराष्ट्र राज्यात शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र/शासकीय रुग्णालयात गरोदरपणी नाव नोंदणी केलेल्या व त्याठिकाणी प्रसुती होणाऱ्या नवजात बालकांना पहिल्या प्रसुतीच्या वेळी मुलगा किंवा मुलगी जन्मल्यानंतर त्यांना मोफत शासनतर्फे रुपये २०००/- इतक्या रक्कमेपर्यंत बेबी

केअर कीट बॅग उपलब्ध करुन देणेबाबत मान्यता दिलेली आहे. प्रत्येकी बेबी केअर किटमध्ये (१) लहान मुलांचे कपडे (२) लंगोट (३) लहान मुलांची झोपण्याची लहान गादी (४) लहान मुलांचे टॉवेल (५) तापमापन यंत्र इलेक्ट्रॉनिक्स थर्मामिटर (६) लहान मुलांना अंगाला लावावयाचे तेल २५० मि.ली. (७) मच्छरदाणी (८) लहान मुलांसाठी गरम ब्लँकेट (९) लहान चटई प्लास्टीक (१०) लहान मुलांचा शॅम्पो - ६० मि.ली. (११) लहान मुलांची खेळणी-खुळखुळा (१२) लहान मुलांची नखे काढण्यासाठी नेलकटर (१३) लहान मुलांसाठी हातमोजे व पायमोजे (१४) लहान मुलांच्या आईसाठी हात धुण्याचे लिक्वीड (१५) लहान मुलाला गुंडाळून ठेवण्यासाठी कापड/आईसाठी लोकरीचे कापड (१६) लहान मुलांसाठी बॉडी वॉश लिक्वीड (१७) सर्व साहित्य ठेवण्यासाठी लहान बॅग इ. साहित्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात दिलेल्या शासन मान्यतेनुसार ४००८७५ बेबी केअर किट व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात २२४२६० बेबी केअर किट, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात ४००८७५ बेबी केअर किट तसेच सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात ४००८७५ बेबी केअर किटचा पुरवठा ५५३ प्रकल्प स्तरावर करण्यात आलेला आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ६००६०० बेबी केअर किटचा पुरवठा करण्यात आला आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ६००६०० बेबी केअर किटचा पुरवठा करण्यात आला आहे.

**(१०) आदर्श अंगणवाडी केंद्र (स्मार्ट अंगणवाडी किट) :**

शासन निर्णय क्र. एबाविं-२०१६/प्र.क्र.९७/का-६ दि. ११ एप्रिल, २०१७ नुसार आदर्श अंगणवाडी योजना लागू करण्यात आली आहे. अंगणवाड्यांचा दर्जा सुधारुन व त्यांच्या पायाभूत सोयी-सुविधांमध्ये वाढ करुन त्यांना आदर्श अंगणवाडीमध्ये रुपांतरित करणेसाठी स्मार्ट आंगणवाडी किटमध्ये सौर उर्जा संच, अंगणवाडी इमारतीसाठी शैक्षणिक साहित्य, ई-लर्निंग, पायाभूत सुविधा LED TV USB port and Pendrive बालकांसाठी खुर्च्या व टेबल बालकांसाठी स्वच्छ भारत संच, वॉटर प्युरिफायर (वीज विरहीत), इमारत बाह्य रंगरंगोटी, सुशोभिकरण, शौचालय दुरुस्ती, परिसर स्वच्छता, किरकोळ दुरुस्ती इ. बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सन २०१८ पासून पुढील ४ वर्षाकरिता दरवर्षी ५ हजार केंद्रांचे आदर्श अंगणवाडी रुपांतर करण्यात येत आहे. अंगणवाडी केंद्रातील आदर्श अंगणवाडी रुपांतर करण्यासाठी प्रती अंगणवाडी रु. १,६५,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षात १,२८० अंगणवाड्यांना स्मार्ट अंगणवाडी किट सन २०२०-२१ मध्ये १२५० स्मार्ट अंगणवाडी किट सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात ३७२० स्मार्ट अंगणवाडी किटचा पुरवठा झालेला आहे. सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात ५००० स्मार्ट किटचा पुरवठा झालेला आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ५६०५ स्मार्ट किटचा पुरवठा झालेला आहे.

**(११) अंगणवाडी सेविका मदतनीस या मानधनी कर्मचाऱ्यांना LIC योजनेंतर्गत एक रक्कमी लाभ देण्याची योजना :**

अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस या मानधनी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती/राजीनामा/मृत्यू/सेवेतून काढून टाकल्यानंतर अथवा मुख्य सेविका या पदावर पदोन्नती होईपर्यंत LIC योजनेंतर्गत एक रकमी लाभ देण्याबाबतची योजना शासननिर्णय दिनांक ३०/४/२०१४ अन्वये सुरू करण्यात आली.

LIC मार्फत देण्यात येणारे लाभ

| अ. क्र. | LIC मार्फत देण्यात येणारे लाभ | अंगणवाडी सेविका | मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस |
|---|---|---|---|
| १ | वयाची ६५ वर्षे पूर्ण होऊन सेवानिवृत्त झाल्यानंतर अनुज्ञेय एकरकमी लाभ | रु. १ लाख | रु. ७५ हजार |
| २ | राजीनामा/सेवेतून काढून टाकणे | प्रत्येक पूर्ण सेवा केलेल्या एका वर्षातील त्या वेळी घेत असलेले मानधन (जास्तीत जास्त रु. १ लाख) तथापि किमान ५ वर्ष सेवा पूर्ण करणे आवश्यक | प्रत्येक पूर्ण सेवा केलेल्या एका वर्षातील त्यावेळी दरमहा घेत असलेले मानधन (जास्तीत जास्त रु. ७५ हजार) तथापि किमान ५ वर्षे सेवा करणे आवश्यक |
| ३ | सेवेत कार्यरत असतांना मृत्यू पावल्यास | रु. १ लाख त्यांच्या वैध वारसदारास | ७५ हजार त्यांच्या वैध वारसदारास |

**निकाली काढलेली प्रकरणे :**

| अ. क्र. | वर्ष | लाभ मिळालेल्या अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/मदतनीस यांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | राजीनामा/सेवानिवृत्ती | मृत्यु | एकूण |
| १ | २०१४-२०१५ | २ | १ | ३ |
| २ | २०१५-२०१६ | ४४४ | ८८ | ५३२ |
| ३ | २०१६-२०१७ | १७११ | २२६ | १९३७ |
| ४ | २०१७-२०१८ | ११७२ | १७० | १३४२ |
| ५ | २०१८-२०१९ | २५२० | २८९ | २८०९ |
| ६ | २०१९-२०२० | १६४० | ३२६ | १९६६ |
| ७ | २०२०-२०२१ | ४०३३ | १८८ | ४२२१ |
| ८ | २०२१-२०२२ | १ | २५६ | २५७ |
| ९ | २०२२-२०२३ | ७०६८ | १०४२ | ८११० |
| १० | २०२३-२०२४ | १०५८ | ८५८ | १९१६ |
| ११ | २०२४-२०२५ | २८५८ | ३१८ | ३१७६ |
| १२ | २०२५-२०२६ (नोव्हेंबर २०२५ पर्यंत) | २५४९ | २८३ | २८३२ |
| | एकूण | २५०५६ | ४०४५ | २९१०१ |

सदर योजनेसाठी जीवन विमा महामंडळ यांना रु. ८१,०८,३३,७००/- इतका निधी देण्यात आलेला आहे. अंगणवाडी कर्मचारी यांचे एकरकमी लाभाचे दावे तात्काळ निकाली काढण्याकरिता शासनाची मान्यता घेण्यात आली आहे. सध्यास्थितीत एलआयसी ऑनलाईन प्रणालीद्वारे एकरकमी लाभांचे प्रलंबित दावे निकाली काढण्यासाठी जीवन विमा महामंडळ यांना रुपये १०० कोटी निधी माहे मार्च २०२२ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सन २०१४ ते मार्च २०२२ पर्यंतचेच सेवानिवृत्ती / राजीनामा / मृत्यूबाबतचे एकरकमी लाभाचे प्रस्ताव निकाली काढण्यात येत आहेत.

**१२)** PMJJBY / PMSBY **शासन प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना / प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना :**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस या मानधनी कर्मचाऱ्यांना PMJJBY / PMSBY योजनेअंतर्गत लाभ देण्याबाबतची केद्र पुरस्कृत योजना आहे.

उपरोक्त दोन्ही योजना केंद्रपुरस्कृत असल्याने त्याकरिता केंद्र व राज्य हिस्सा अनुक्रमे ६० : ४० याप्रमाणात निधी खर्च करावयाचा आहे. सदर निधी संबंधित अंगणवाडी कर्मचाऱ्याच्या बँक खात्यामध्ये जमा करावयाचा असून संबंधित अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी PMJJBY (प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना) करिता प्रती वर्ष रूपये ४३६ व PMSBY (प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना) करिता प्रतीवर्ष रूपये २० याप्रमाणे विमा हप्ता त्यांनी निवडलेल्या बँकामध्ये जमा करणे आवश्यक आहे. तसेच केंद्रशासनाच्या दिनांक २७.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन ज्या बँकखात्यामध्ये जमा करण्यात येते. त्याच बँक खात्यामध्ये खालील योजनांचा प्रिमियमची रक्कम जमा करण्याबाबत सूचना आहेत.

| अ.क्र. | योजनेचे नाव | अटी व शर्ती | लाभ |
|---|---|---|---|
| १. | PMJJBY (प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना) | वय वर्षे १८ ते ५० वयोगटातील अंगणवाडी कर्मचाऱ्याचा कोणत्याही कारणाने मृत्यू. | रु. २ लाख |
| | | वय वर्षे १८ ते ५० वयोगटातील अंगणवाडी कर्मचाऱ्याचा कोणत्याही कारणाने मृत्यू | सानुग्रह पद्धतीने विमा दावे निकाली |
| २. | PMSBY(प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना) | वय वर्षे १८ ते ५९ वयोगटातील अंगणवाडी कर्मचाऱ्याचा अपघाती मृत्यू अथवा कायमचे पूर्ण अपंगत्व | रु. २ लाख |
| | | वय वर्षे १८ ते ५९ वयोगटातील अंगणवाडी कर्मचाऱ्याला अपघातात कायमचे अंशतः अपंगत्व | रु. १ लाख |

वरील योजनेअंतर्गत मंजूरीसाठी एकूण ७०२ प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्यात आलेले आहेत.

**१३) अंगणवाडी पाळणाघर योजना** (Anganwadi-Cum Creche / PALANA) :

कामावर जाणाऱ्या व इतर ठिकाणी काम करणऱ्या महिलांना कामात व्यत्यय न येता कामावर लक्ष केंद्रीत करता यावे यासाठी त्यांचे ० ते ६ वयोगटातील मुलांना सांभाळण्यासाठी पाळणाघर योजना सुरू करण्यात आली.

सदर योजना ही राजीव गांधी राष्ट्रीय पाळणा घर योजने अंतर्गत राज्यात एकूण १६७० पाळणाघरे (केंद्रशासनामार्फत अनुदानित २३३, राज्यसमाज कल्याण बोर्डामार्फत ७७६, भारतीय आदीम जाती सेवक संघ नागपूर ४०१, महाराष्ट्र राज्य बालकल्याण परिषद नाशिक यांच्या मार्फत ३३०) अशी सुमारे १६७० पाळणाघरे स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येत होती.

केंद्र शासनाने सदर योजना समाजकल्याण बोर्डामार्फत न राबविता संबंधित राज्याच्या महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्याचाव निर्णय घेतला आहे. (२५ बालकी असलेले १ पाळणाघर - १ युनिट धरण्यात येते.) राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजनेअंतर्गत असलेल्या पाळणाघरांची संबंधित जिल्हा / प्रकल्प स्तरीय एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अधिकारी / कर्मचारी यांच्या मार्फत तपासणी केल्यानंतर सुमारे ७५९ पाळणाघरे सुरु असल्याचे आढळून आले. केंद्र शासनाच्या सुधारित निकषानुसार राष्ट्रीय पाळणाघर योजनेच्या पाळणाघराकरिता वितरित करावयाच्या निधीमध्ये केंद्र हिस्सा ६० टक्के राज्य हिस्सा ३० टक्के व संस्थेचा हिस्सा १० टक्के असे प्रमाण आहे.

**सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील दिनांक १ जानेवारी २००७ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत ३ महिन्याचे अनुदान**

| अ. क्र. | तपशिल | केंद्र शासनाची रक्कम ६०% (लाखात) | राज्य शासनाची रक्कम ३०% (लाखात) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | महिला व बालविकास विभागामार्फत प्राप्त झालेली रक्कम | ४०७.०१ | २०३.५० | ६१०.५१ |
| २ | आयुक्त एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे मार्फत जिल्हा स्तरावर एकूण ७५९ पाळणाघरांसाठी वितरित केलेली रक्कम | १७१.४६ | ८५.७२ | २५७.१८ |
| ३ | वितरित केलेल्या निधीपैकी जिल्हा स्तरावरून प्राप्त झालेल्या अहवालानूसार पाळणाघरासाठी लागणारा आवश्यक निधी | ७.५६ | ५.०५ | १२.६१ |

राज्यात राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजनेअंतर्गत सुरू असलेल्या व मान्यता स्तगीत ठेवलेल्या सर्वच पाळणाघरांची मान्यता महिला व बालविकास विभाग शा.नि.क्र.एबावि-२०१७/प.क्र.३३८/का-६ दिनांक ७ जानेवारी, २०१९ अन्वये १ एप्रिल २०१७ पासून रद्द करण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाचे दिनांक १४ जुलै, २०२२ च्या पत्रानुसार मिशन शक्ती अंतर्गत सामर्थ्य या उपयोजनेअंतर्गत Palana-Creche Facility या योजनेचा समावेश करण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत ज्या अंगणवाडी केंद्रामध्ये पुरेशी जागा, पिण्याच्या पाण्याची सोय, लाईटची सोय तसेच पुरेशी बालकांची संख्या २५ अशा ठिकाणी पाळणाघरे सुरू करण्यात येते. केंद्र शासनाचे दिनांक १४ जुलै, २०२२ च्या पत्रान्वये पाळणाघरे सुरू करावीत अशा सुचना आहेत.

**सन २०२४-२५ या वर्षासाठी पाळणाघरासाठी आवश्यक असणारी तरतूद**

| अ.क्र. | तपशिल | केंद्र शासनाची रक्कम ६०% (लाखात) | राज्य शासनाची रक्कम ४०% (लाखात) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | १७५ पाळणाघरांसाठी आवश्यक निधी | ३९६.०० | २६४.०० | ६६०.०० |

तक्ता क्रमांक ४१

**प्रशिक्षणाबाबत राज्याची सद्यःस्थिती :– माहे ऑक्टोबर २०२४ अखेर**

| अ. क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | पायाभूत प्रशिक्षण झालेल्यांची संख्या | उजळणी प्रशिक्षण झालेल्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | बा. वि. प्र. अ. | ५५३ | २४० | २२५ | २२२ |
| २. | सहा. बा. वि. प्र. अ. | ११ | ११ | ११ | ११ |
| ३. | मुख्यसेविका | ३,८९९ | २,५०० | २,०९७ | २,२०९ |
| ४. | अंगणवाडी मदतनीस | १,१०,६३१ | ९७,३८८ | ९१,३३२ | ८३,३८९ |
| ५. | अंगणवाडी सेविका | १,१०,६३१ | १,०४,९९२ | ८७,१६६ | ९५,२३२ |

योजने अंतर्गत काम करणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांना सेवेत, भरती झाल्यावर मूलभूत पायाभूत प्रशिक्षण व त्यानंतर २ वर्षाने उजळणी प्रशिक्षण विविध स्तरावर देण्यात येते.

**मूलभूत प्रशिक्षणाबाबत माहिती :–**

**बाल विकास प्रकल्प अधिकारी, मुख्यसेविका, अंगणवाडी सेविका/मदतनिस/मिनी अंगणवाडी सेविका तसेच अंगणवाडी प्रशिक्षण केंद्र/मध्यम स्तर प्रशिक्षण केंद्राचे निदेशक यांचेसाठीचे प्रशिक्षण कालावधीबाबतची माहिती :–**

तक्ता क्रमांक ४२

| प्रशिक्षण घटक | विषयाची तोंडओळख (Induction Training (एकवेळ) | पायाभूत प्रशिक्षण (एकवेळ) | उजळणी प्रशिक्षण (प्रत्येक दोन वर्षानंतर) |
|---|---|---|---|
| सेविका | ८ दिवस | ३२ दिवस | ७ दिवस |
| मदतनिस | ... | ८ दिवस | ५ दिवस |
| पर्यवेक्षिका | ७ दिवस | ३२ दिवस | ७ दिवस |
| CDPO/ACDPO | ७ दिवस | ३२ दिवस | ७ दिवस |
| Instructors of AWTCs | ... | ११ दिवस | ७ दिवस |
| Instructors of MLTCs | ... | ११ दिवस | ७ दिवस |

**योजने अंतर्गत यंत्रणेची रचना**
**( ग्रामीण / आदिवासी क्षेत्र)**

राज्यस्तर : महिला व बाल विकास विभाग

↓

एकात्मिक बाल विकास सेवा योजना

↓

जिल्हास्तर : जिल्हा ए. बा. वि. से. योजना

↓

प्रकल्पस्तर : ए. बा. वि. प्रकल्प

↓

सेक्टरस्तर : मुख्यसेविका

↓

अंगणवाडी : अंगणवाडी सेविका, मदतनीस

बाल्यावस्था हा मानवाच्या वाढीच्या व विकासाच्या टप्प्यातील अत्यंत महत्त्वाचा कालावधी आहे. गरोदरपणामध्ये स्त्रियांस व जन्मानंतर बालकांस पहिल्या २ वर्षात योग्य आहार न मिळाल्यास त्याचे दुरगामी परिणाम हे शारीरिक मानसिक व बौद्धिक विकासावर होत असतात. लहान वयात (२ वर्षाच्या आतील) कुपोषणामुळे कमी प्रतिकारशक्ती (Poor Immunity), कमी बुद्ध्यांक (Poor IQ ), कमी शैक्षणिक कामगिरी ( Poor School Performance), कमी एकाग्रता (Poor Concentration), कमी उंची (Poor Hight). कमी शारीरिक वाढ (Poor body building), कमजोरपणा, कमी उत्पादकता, कमी उत्पन्न, संवाद कौशल्याची कमतरता (Poor communication skill, vocabulary), कमी समज (Poor understanding of issues, concepts), अडचणींना समजण्याची कमी क्षमता, स्नायुंची कमजोरी (Poor Physical / Mental co ordination) असे विपरीत परिणाम होतात. भारतातील बऱ्याचं भागात कित्येक ठिकाणी पिढ्यानपिढ्या उपयुक्त वेळेस मुलांना योग्य आहार व योग्य पद्धत न मिळाल्यामुळे अशाच प्रकारचे परिणाम सर्वसाधारण लोकांमध्ये दिसतात. उदा., सर्वसाधारणपणे उंची ५ फुटापेक्षा कमी असणे, गरोदर मातांची उंची कमी असल्यामुळे धोकादायक बाळंतपणे होणे (High Risk Delivery) मोठ्या संख्येने कमी वजनाची मुले जन्माला येणे, शाळेत शिकण्यास अडचणी, इत्यादी. यासाठी या योजने अंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

**आरंभ**

**लक्ष्य गट : ०-३ वर्षे**

**प्रकल्प सुरू होण्याची तारीख / वर्षे : २०१८-१९**

आरंभ प्रकल्पाअंतर्गत ०-३ वयोगटातील बालके, गरोदर माता, स्तनदान माता, आजी-आजोबा व बाबा पालकांचा सहभाग बालकाच्या संगोपनात आवश्यक असल्याकारणाने व ०-३ या वयोगटात २ वर्षापर्यंत ७५ टक्के मेंदूची वाढ होत असल्याकारणाने आरंभ-सुरूवातीचे क्षण मोलाचे हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

**आरंभ उपक्रमाचे ठळक वैशिष्ट्ये**

१. बाळाचे पहिले १००० दिवस - सुरुवातीचे क्षण मोलाचे

२. बालकांची वाढ व विकास यांचे आकांक्षीकरण

३. बालकांचा सर्वांगीण विकास, बालकांची काळजी, पूर्व उद्दीपन (Early Stimulation) याबाबत पालक / सांभाळकर्ते व समुदाय यांचे सक्षमीकरण

४. मेंदू विकास, पोषक आहार व आरोग्य, शारीरिक विकास-स्पर्श-संवाद-खेळ यावर भर, अंमलबजावणी-डिजिटल संदेश, गृहभेटी, पालक सभा आणि ''पालक मेळावा'' याद्वारे पालक, सांभाळकर्ते व समुदाय यांचे सक्षमीकरण.

महाराष्ट्राची भावी पिढी सुदृढ, निरोगी व बुद्धीवान होण्यासाठी व राज्यातील कुपोषण निर्मुलनासाठी शासन विविध मार्गांनी प्रयत्न करत आहे. अजुनही लोकांना पहिल्या दोन वर्षातील आहाराचे महत्त्व कळलेले नाही. त्यामुळे कुपोषणाची समस्या अजुनही कायम आहे. काही वर्षापासून ''ग्राम बाल विकास केंद्र'' आयोजित करण्यात येत आहे. तसेच वर्ष २०११-१२ मध्ये राजमाता जिजाऊ कुपोषण मुक्त ग्राम अभियान राबविण्यात आले परंतु या दोन्ही कार्यक्रमात ३ ते ६ वर्ष वयोगटाच्या मुलावर अधिक लक्ष देण्यात आले परंतु कुपोषण मुलतः पहिल्या दोन वर्षातच निर्माण होते.

**मुलांचे वजन कमी झाले असल्यास करावयाची कृती**

कमी वजनाची (MUW) आणि तीव्र कमी वजनाच्या (SUW) बालकांसाठी आहार :- (ह्या बालकांना)

(१) वजनात वाढ होण्यासाठी अधिक उष्मांकाच्या पाककृतीचा समावेश करावा.

(२) शरिराची योग्य पद्धतीने वाढ होण्यासाठी प्रथिनांची, योग्य उष्मांकाची जिवनसत्वे असावीत.

(३) रोग प्रतिकारक शक्तीची/क्षमतेची वाढ होण्यासाठी जीवन सत्वाची गरज असते. त्यामुळे अशा बालकांच्या जेवणात खालीलप्रमाणे करण्यात यावा.

**उष्मांक वाढविण्यासाठी :**

अशा बालकांच्या जेवणात खालील गोष्टी अतिरिक्त प्रमाणात मिसळल्यास उष्मांक वाढविण्यासाठी मदत होते : तेल, तेलबिया, साखर, गूळ, केळी, बटाटे, रताळे, तूप इत्यादी.

**प्रथिने वाढविण्यासाठी :**

(अ) आहारामध्ये पातळ वरणापेक्षा घट्ट डाळीचा वापर करावा.

(ब) विविध डाळींचा वापर करणे.

(क) मांसाहारी पदार्थ, अंडी, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ इत्यादी.

(ड) प्रक्रिया केलेले सोयाबीन

**सोयाबीन प्रक्रियेची पद्धत खालीलप्रमाणे आहे :**

१. सोयाबीन रात्रभर पाण्यात भिजवावे.

२. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यावरचे साल काढून पाणी फेकून द्यावे.

३. सावलीत सुकवून खमंग भाजून घ्यावे.

४. गरजेनुसार वाळवून १० किलो गव्हामध्ये १ किलो अशा प्रमाणात वापरणे.

**रोग प्रतिकार शक्ती / क्षमता वाढविण्यासाठी ( लोह वाढविण्यासाठी ) :**

(अ) आळीव, हिरव्या पालेभाज्या, सोयाबीन, बाजरी, मांसाहारी पदार्थ, अंडी, शेपू इत्यादी.

(ब) अन्न शिजवताना लोखंडी भांड्यांचा वापर करणे.

(क) आठवड्यातून एकदा लोहयुक्त गोळ्यांचे सेवन करणे.

(ड) आहारामध्ये आवळा, पेरू, लिंबू, संत्री, मोसंबी, शेवगा, टोमॅटो असे जीवनसत्त्व-क युक्त पदार्थांचा समावेश केल्यामुळे पदार्थांतील लोहाचे शोषण होण्यास मदत होते.

(इ) जेवणाच्या आधी, जेवणासोबत किंवा जेवणानंतर किमान एक तास चहा अथवा कॉफी यांचे सेवन करू नये. असे केल्यास पदार्थांतील लोहाचे शोषण होत नाही. आयोडीन वाढविण्यासाठी आहारामध्ये नेहमी आयोडीन युक्त मिठाचाच वापर करावा.

**जीवनसत्त्व 'अ' वाढविण्यासाठी :**

(अ) गाजर, पपई, लाल भोपळा, आंबट चुका, चंदन बटवा, नागवेलीची पाने, कोंथिबीर, चवळीची पाने, कडीपत्ता, शेवग्याची पाने, मेथी, शेलगामची पाने इत्यादी.

(ब) बालकास ९ महिने पूर्ण झाल्यावर दर सहा महिन्यांनी जीवनसत्त्व 'अ' चा डोस देणे.

**कॅल्शियम वाढविण्यासाठी :**

(अ) नाचणी, दूध व दुग्धजन्य पदार्थ, तेलबिया, पालेभाज्या, सुके मांस इत्यादी.

(ब) **वारंवारिता :** लहान बालकांच्या पोटाचा आकार लहान असल्यामुळे त्यांना दिवसातून ६ वेळा आहार देणे.

**सौम्य कुपोषित (MAM) आणि तीव्र कुपोषित (SAM) बालकांसाठी खालीलप्रमाणे अतिरिक्त बाबी कराव्यात :**

१. दिवसभरातून ८ वेळा आहार देणे.

२. सूक्ष्म जीवनसत्त्वे असलेले द्रव्य टॉनिक स्वरूपात देणे.

३. मोड आलेले कडधान्याचा वापर करणे.

४. अधिक काळजीसाठी अमायलेजयुक्त पीठ देणे.

**अमायलेजयुक्त पीठ बनविण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे :**

१. गहू आणि मूग वेगवेगळे रात्रभर पाण्यात भिजवावे.

२. नंतर २४ तास मूग मोड येण्यासाठी बांधून ठेवणे, तसेच गहू ४८ तास मोड येण्यासाठी बांधून ठेवावे.

३. मोड आलेले गहू आणि मूग वाळवावा आणि नंतर मंद आचेवर खमंग भाजून वेगवेगळे दळावे.

४. ह्या पिठाचा ४:१ किंवा ३:१ ह्या प्रमाणात पाक कृतीत वापर करावा.

**टीप :** पावसाळ्यात आणि हिवाळ्यात मूग व गव्हास मोड येण्यास जास्त वेळ लागू शकतो.

**बालके आजारी पडू नयेत म्हणून खालील गोष्टी कराव्यात :**

१. बालकांना पिण्यास उकळून थंड केलेले पाणी द्यावे.

२. बालकांना जेवण भरवण्यापूर्वी साबणाने हात स्वच्छ धुवावे.

३. गावामध्ये नेहमी स्वच्छता असेलच असे नाही म्हणून सहा महिन्यांनी बालकांना जंत नाशक औषध देणे.

४. बालकांच्या विष्ठेची योग्य विल्हेवाट लावावी.

**मुले आजारी पडल्यास :**

१. मुले आजारी पडल्यावर सुद्धा आधी प्रमाणे जेवण देत रहावे.

२. आजारातून बरे झाल्यावर त्या बालकास एक वेळेस जास्त आहार देणे.

३. अतिसार झाल्यानंतर झिंकचा डोस द्यावा.

४. स्तनपान करणारे बालकांना नियमित स्तनपान सुरु ठेवावे.

**''अंगणवाडी केंद्रांचे सक्षम अंगणवाडीमध्ये श्रेणीवर्धन करणे''**

केंद्र शासनाचे निर्देशानुसार राज्यातील आकांक्षित जिल्ह्यांमध्ये केंद्र शासनाने निवड केलेल्या स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रात १) पोषण वाटीका २) रेन वॉटर हार्वेस्टिंग ३) आ.ओ.युनिट ४) एल.ई. डी ५) ऑदर इन्फास्ट्रक्चर इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता अंगणवाडी केंद्रांचे सक्षम अंगणवाडीमध्ये श्रेणीवर्धन करणे ही नवीन योजना कार्यान्वित करणेत आलेली आहे.

त्यानुषंगाने अंगणवाडी केंद्रांचे सक्षम अंगणवाडीमध्ये श्रेणीवर्धन करणेस आकांक्षित जिल्ह्यांमध्ये केंद्र शासनाने निवड केलेल्या स्वमालकीच्या अंगणवाडीच्या केंद्रांना खालील सुविधा/साहित्य उपलब्ध करुन देण्यात येते.

| अ.क्र. | सक्षम अंगणवाडी योजनेंतर्गत उपलब्ध करुन | मंजूर रक्कम (केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०%) द्यावयाच्या सुविधा/साहित्य |
|---|---|---|
| १. | पोषण वाटीका | रु.१०,०००/- प्रती अंगणवाडी प्रती वाटीका |
| २. | रेन वॉटर हार्वेस्टिंग | रु.१६,०००/- प्रती अंगणवाडी प्रती युनिट |
| ३. | आर.ओ.युनिट | रु.१०,०००/- प्रती युनिट |
| ४. | एल.ई. डी. | रु. २५,०००/- प्रती LED |
| ५. | ऑदर इन्फास्ट्रक्चर | रु.३९,००० प्रती अंगणवाडी |

**''प्रधान मंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान PVTG अंतर्गत ठिकाणी अंगणवाडी केंद्र सुरु करणेबाबत''**

